# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र

**सत्र–४ : पेपर क्रमांक** DSE 19

# बिगर सरकारी संस्था आणि विकास

**(Non-Government Organisations (NGOs) and Development)**

**एम. ए. भाग–२ : समाजशास्त्र**

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार सुधारित अभ्यासक्रम
शैक्षणिक वर्ष २०२३–२४ पासून

© **कुलसचिव,** शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर (महाराष्ट्र)
**प्रथमावृत्ती :** २०१५
द्वितीय (सुधारित) आवृत्ती : २०२२
**सुधारित आवृत्ती :** २०२३
एम. ए. भाग २ (सत्र ४ : बिगर सरकारी संस्था आणि विकास) करिता
सर्व हक्क स्वाधीन. शिवाजी विद्यापीठाच्या परवानगीशिवाय कोणत्याही प्रकाराने नक्कल करता येणार नाही.

**प्रती : २००**

■

**प्रकाशक**
**डॉ. व्ही. एन. शिंदे**
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर : ४१६ ००४

■

**मुद्रक**
**श्री. बी. पी. पाटील**
अधीक्षक,
शिवाजी विद्यापीठ मुद्रणालय,
कोल्हापूर : ४१६ ००४

■

ISBN- 978-81-8486-662-9

★ दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र आणि शिवाजी विद्यापीठ याबद्दलची माहिती पुढील पत्त्यावर मिळू शकेल.
शिवाजी विद्यापीठ, विद्यानगर, कोल्हापूर-४१६ ००४ (भारत)

## दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र
## शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**■ सल्लागार समिती ■**

**प्रा. (डॉ.) डी. टी. शिर्के**
कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) पी. एस. पाटील**
प्र-कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) प्रकाश पवार**
राज्यशास्त्र अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एस. विद्याशंकर**
कुलगुरू, केएसओयू,
मुक्तगंगोत्री, म्हैसूर, कर्नाटक-५७० ००६

**डॉ. राजेंद्र कांकरिया**
जी-२/१२१, इंदिरा पार्क,
चिंचवडगांव, पुणे-४११ ०३३

**प्रा. (डॉ.) सीमा येवले**
गीत-गोविंद, फ्लॅट नं. २,
११३९ साईक्स एक्स्टेंशन,
कोल्हापूर-४१६००१

**डॉ. संजय रत्नपारखी**
डी-१६, शिक्षक वसाहत, विद्यानगरी, मुंबई विद्यापीठ,
सांताक्रुझ (पु.) मुंबई-४०० ०९८

**प्रा. (डॉ.) कविता ओझा**
संगणकशास्त्र अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) चेतन आवटी**
तंत्रज्ञान अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एस. एस. महाजन**
अधिष्ठाता, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एम. एस. देशमुख**
अधिष्ठाता, मानव्य विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) श्रीमती एस. एच. ठकार**
प्रभारी अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्राचार्या (डॉ.) श्रीमती एम. व्ही. गुळवणी**
प्रभारी अधिष्ठाता, आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. व्ही. एन. शिंदे**
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. ए. एन. जाधव**
संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्रीमती सुहासिनी सरदार पाटील**
वित्त व लेखा अधिकारी,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) डी. के. मोरे** (सदस्य सचिव)
संचालक, दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


**समाजशास्त्र अभ्यासमंडळ**

अध्यक्ष – **डॉ. अर्चना राजकुमार कांबळे**
द न्यू कॉलेज, १०६२, ए वॉर्ड, शिवाजी पेठ, कोल्हापूर

- **डॉ. श्रीमती प्रतिमा एस. पवार**
  समाजशास्त्र अधिविभाग,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- **डॉ. प्रल्हाद एम. माने**
  समाजशास्त्र अधिविभाग,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- **डॉ. आनंद लक्ष्मण गाडीवड्ड**
  देवचंद कॉलेज, अर्जुननगर,
  ता. कालग, जि. कोल्हापूर
- **डॉ. श्रीमती भाग्यश्री मल्लिकार्जुन पाटील**
  यशवंतराव चव्हाण कॉलेज, (केएमसी) कोल्हापूर
- **डॉ. श्रीमती सविता माधवराव गिरे**
  दादासाहेब जोतिराम गोडसे आर्टस, कॉमर्स, सायन्स कॉलेज,
  वडूज, ता. खटाव, जि. सातारा
- **डॉ. वसंत कृष्णा मोरे**
  मोहनराव पतंगराव पाटील महाविद्यालय, बोरगांव,
  ता. वाळवा, जि. सांगली
- **डॉ. कृष्णाजी मारूती देसाई**
  श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय, २९६८, 'सी',
  दसरा चौक, कोल्हापूर
- **डॉ. अर्जुन पांडुरंग जाधव**
  दत्ताजीराव कदम आर्टस, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज,
  इचलकरंजी, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर
- **डॉ. संदिप मुरलीधर चौधरी**
  समाजशास्त्र अधिविभाग,
  एसबीइएस कॉलेज ऑफ आर्टस ॲण्ड कॉमर्स,
  छत्रपती संभाजी नगर
- **डॉ. सुगत शेशराव बनसोडे**
  श्री. शिव-शाहू कॉलेज सरूड,
  ता. शाहुवाडी, जि. कोल्हापूर
- **डॉ. मधुकर गंगाराम धतूरे**
  विठ्ठलराव पाटील महाविद्यालय, कळे,
  ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर
- **डॉ. रमेश हिंदुराव पाटील**
  श्रीमती कुसुमताई राजारामबापू पाटील कन्या महाविद्यालय,
  इस्लामपूर, जि. सांगली
- **डॉ. अभिजित पाटील**
  ७ए-३०१, अशोक नगर, दादलानी पार्क जवळ,
  बाळकुम, ठाणे (वेस्ट)-४००६०८

# प्रस्तावना

एम. ए. भाग-२, सत्र ४ साठी 'बिगर सरकारी संस्था आणि विकास' या ऐच्छिक पेपरची निवड करणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांचे मी मनःपूर्वक स्वागत करतो.

''बिगर सरकारी संस्था आणि विकास'' या पेपरमध्ये चार घटकांचा समावेश केला आहे. त्यामध्ये प्रामुख्याने बिगर शासकीय संघटना आणि भारतातील ऐच्छिक संघटना, प्रकल्प आणि कार्यक्रम व्यवस्थापन आर्थिक स्त्रोत आणि वित्तीय संस्था, बिगर शासकीय संघटनांची विकासातील भूमिका या घटकांचा समावेश केला आहे.

शेवटी मी सर्वप्रथम मा. कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राचे संचालक प्रा. डॉ. डी. के. मोरे, तसेच हा पेपर पूर्ण करणारे इतर सहकारी प्राध्यापक आणि दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रातील सर्व प्रशासकीय सेवकांचे मोलाचे सहकार्य मिळाले. वरील सर्वांना त्यांच्या सहकार्याबद्दल धन्यवाद.

**■ संपादक ■**

**डॉ. मच्छिंद्र सकटे**
सौ. मंगलाताई रामचंद्र जगताप कॉलेज,
उंब्रज, जि. सातारा

**प्रा. प्रकाश जगताप**
सरदार बाबासाहेब माने महाविद्यालय,
रहिमतपूर. जि. सातारा

## अभ्यास घटकांचे लेखक

| लेखन सहभाग | सत्र–३<br>घटक क्रमांक |
|---|---|
| **प्रा. सौ. शामला रघुनाथ माने**<br>छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा | १ |
| **प्रा. प्रकाश जगताप**<br>सरदार बाबासाहेब माने महाविद्यालय, रहिमतपूर | १, ३ |
| **प्रा. आनंद लक्ष्मण गाडीवड्ड**<br>देवचंद कॉलेज, अर्जुननगर, ता. कागल, जि. कोल्हापूर | २ |
| **प्रा. डॉ. एम. एस. शिंदे**<br>छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा | ४ |

**■ संपादक ■**

**डॉ. मच्छिंद्र सकटे**
सौ. मंगलाताई रामचंद्र जगताप कॉलेज,
उंब्रज, जि. सातारा

**प्रा. प्रकाश जगताप**
सरदार बाबासाहेब माने महाविद्यालय,
रहिमतपूर. जि. सातारा

# अनुक्रमणिका


| घटक क्रमांक | घटकाचे शीर्षक | पान क्रमांक |
|---|---|---|
| १. | बिगर शासकीय संघटना आणि भारतातील ऐच्छिक संघटना | १ |
| २. | प्रकल्प आणि कार्यक्रम व्यवस्थापन | २५ |
| ३. | आर्थिक स्त्रोत आणि वित्तीय संस्था | ४० |
| ४. | बिगर शासकीय संघटनांची विकासातील भूमिका | ५१ |

## ■ विद्यार्थ्यांना सूचना

प्रत्येक घटकाची सुरुवात उद्दिष्टांनी होईल. उद्दिष्टे दिशादर्शक आणि पुढील बाबी स्पष्ट करणारी असतील.

१. घटकामध्ये काय दिलेले आहे.

२. तुमच्याकडून काय अपेक्षित आहे.

३. विशिष्ट घटकावरील कार्य पूर्ण केल्यानंतर तुम्हाला काय माहीत होण्याची अपेक्षा आहे.

स्वयं मूल्यमापनासाठी प्रश्न दिलेले असून त्यांची अपेक्षित उत्तरेही देण्यात आलेली आहेत. त्यामुळे घटकाचा अभ्यास योग्य दिशेने होईल. तुमची उत्तरे लिहून झाल्यानंतरच स्वयं अध्ययन साहित्यामध्ये दिलेली उत्तरे पाहा. ही तुमची उत्तरे (किंवा स्वाध्याय) आमच्याकडे मूल्यमापनासाठी पाठवायची नाहीत. तुम्ही योग्य दिशेने अभ्यास करावा, यासाठी ही उत्तरे 'अभ्यास साधन' (Study Tool) म्हणून उपयुक्त ठरतील.

प्रिय विद्यार्थी,

हे स्वयंअध्ययन साहित्य या पेपरसाठी एक पूरक अभ्याससाहित्य म्हणून आहे. असे सूचित करण्यात येते की, विद्यार्थ्यांनी २०२३-२४ पासून तयार केलेला नवीन अभ्यासक्रम पाहून त्याप्रमाणे या पेपरच्या सखोल अभ्यासासाठी संदर्भपुस्तके व इतर साहित्याचा अभ्यास करावा.

# घटक : १

# बिगर शासकीय संघटना आणि भारतातील ऐच्छिक संघटना

## (Non Governmental Organizations (NGOs) and Voluntary Organizations in India)

**अनुक्रमणिका :**


१.० उद्दिष्ट्ये

१.१ प्रस्तावना

१.२ विषय विवेचन

- १.३.१ बिगर शासकीय संघटनांचे स्वरूप, संकल्पना आणि व्याख्या
- १.३.२ ऐच्छिक संघटना व लोकांच्या संघटनेची संकल्पना
- १.३.३ समुदाय संघटनेची संकल्पना
- १.३.४ भारतातील ऐच्छिक संघटनांची ऐतिहासिक वाढ
- १.३.५ संस्था नोंदणी अधिनियम

१.३ सारांश

१.४ सरावासाठी प्रश्न

१.५ अधिक वाचनासाठी पुस्तके


## १.० उद्दिष्ट्ये :

या घटकाच्या अभ्यासानंतर आपणास,

१. बिगर शासकीय संघटनांची संकल्पना समजून घेण्यास मदत होईल.

२. ऐच्छिक संघटनांची संकल्पना व लोकांच्या संघटना ही संकल्पना समजावून घेता येईल.

३. समुदाय संघटनेची संकल्पना समजावून घेता येईल.

४. भारतातील ऐच्छिक संघटनांची ऐतिहासिक वाढ कशी होत गेली हे समजावून घेता येईल.

## १.१ प्रस्तावना :

अलिकडच्या काळामध्ये स्वयंसेवी संघटना या नागरी समाजाचा अविभाज्य घटक बनल्या आहेत. संपूर्ण समाजाच्या विकासामध्ये स्वयंसेवी संघटना महत्त्वपूर्ण भूमिका बजावत आहेत. या संघटना लोकाभिमुख क्रिया करून कोणालाही लाभाची किंवा नफ्याची अपेक्षा न बाळगता समाजामध्ये आज मोठ्या प्रमाणामध्ये कार्यरत आहेत. शासनाची मदत न घेता किंवा कमीत कमी मदत घेऊन विकास करण्यावर स्वयंसेवी संघटना काम करीत असतात. शासनाकडून दुर्लक्षित राहिलेल्या किंवा खोळंबून राहिलेल्या कामावर स्वयंसेवी संघटना प्रामुख्याने आपले लक्ष केंद्रित करतात म्हणूनच आज जगभरामध्ये स्वयंसेवी कार्याला महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले आहे.

## १.२ विषय विवेचन :

प्रस्तुत घटकामध्ये आपण बिगर शासकीय संघटनेचे (स्वयंसेवी संघटना) स्वरूप व संकल्पना, ऐच्छिक संघटना, लोकांच्या संघटना, समुदाय संघटना व भारतातील ऐच्छिक संघटनांची ऐतिहासिक वाढ कशी होत गेली हे अभ्यासणार आहोत.

### १.३.१ बिगर शासकीय संघनांचे स्वरूप, संकल्पना आणि व्याख्या :

**(Nature, Concept and Definitions of NGOs)**

बिगर शासकीय संघटनांच्या स्वरूपामध्ये विविधता दिसून येते. बिगर शासकीय संघटनांची विविधता ही पुढील मुद्यांवरून स्पष्ट होते. संघटनांचा आकार (Size), सदस्यता (Membership), निधी स्त्रोत (Funding Sources), विविध राजकीय पक्षांशी स्वयंसेवी संघटनांचे असलेले संबंध (Relationship with Political Parties), संघटनेचे तत्त्वज्ञान (Philosophy), संघटनेची ध्येये (Goals), आणि कार्यक्रम (Programmes) यामध्ये सर्व स्वयंसेवी संघटनांमध्ये विविधता दिसून येते. प्रत्येक स्वयंसेवी संघटनेचा आकार, सदस्य संख्या, निधी मिळविण्याचे मार्ग, तत्त्वज्ञान, ध्येये व कार्यक्रम राबविण्याच्या पद्धती यामध्ये विविधता दिसून येते.

अनेक विचावंतांनी बिगर शासकीय संघटनांचे वर्गीकरण केले आहे. यश आणि चतुर्वेदी (१९८३) यांनी तीन प्रकारे बिगर शासकीय संघटनांचे वर्गीकरण केले आहे त्यामध्ये (१) टेक्नो मॅनेजिरिअल (Techno-Managerial), (२) सुधारणावादी (Reformist), (३) जहालवादी (Radical) या संघटनांचा समावेश होतो.

हिरवे (१९९५) यांनी (१) कल्याणवादी संघटना (यामध्ये आरोग्य आणि शिक्षण क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या संघटना) (२) विकास संघटना (३) सक्षमीकरण क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या संघटना असे बिगर शासकीय संघटनांचे वर्गीकरण केले आहे.

कोर्टन (१९९०) यांनी बिगर शासकीय संघटनांच्या वर्गीकरणामध्ये (१) पुर्नवसन आणि कल्याणकारी संघटना आणि समुदाय संघटना असे वर्गीकरण केले आहे.

ईलियट (१९८७) यांनी विकास (Development), चॅरिटी (Charity) आणि सक्षमीकरण

(Empowerment) संघटना असे वर्गीकरण केले आहे.

डॉ. डी. एन. धनागरे यांनी स्वयंसेवी संघटनांचे (1) Social Welfarism, (2) Radical Nationalism, (3) Socialist Orientation या तीन प्रकारामध्ये वर्गीकरण केले आहे.

स्वयंसेवी संघटना या नोंदणीकृत व अनोदनोंणीकृत असतात. ज्या संघटना कायदेशीररित्या पंजीकृत झालेल्या असतात त्यांना लेखी घटना असते. या संघटनांच्या कामकाजाचे नियम निश्चित असतात. त्यांची कार्यकारिणी असते व त्यामधून पदाधिकाऱ्यांची निवड प्रक्रिया निश्चित केली जाते तसेच अशा नोंदणीकृत संघटनांना निधी देण्यास पात्र मानले जाते तसेच शासन आणि आंतरराष्ट्रीय वित्तसंस्था अशा नोंदणीकृत संघटना मान्यता देते.

दुसऱ्या बाजूला मात्र असंख्य संघटना, गट स्थानिक पातळीवर मोठ्या प्रमाणात काम करीत असतात. या संघटना, गटांची कायदेशीररित्या नोंदणी झालेली नसते. त्यांची लेखी घटना नसते परंतु या संघटना उत्स्फूर्तपणे समाजहितासाठी काम करीत असतात भूकंप, अतिवृष्टी, दुष्काळ, पाणी टंचाई, रोगराई या नैसर्गीक आपत्तीवेळी तसेच अपघात, दंगल, जाळपोळ, युद्धजन्य परिस्थिती या मानवनिर्मित अरिष्टांवेळी कोणत्याही प्रकारचा निधी नसताना, कोणतीही निश्चित दिशा नसताना या संघटना व गट उत्स्फूर्तपणे काम करीत असतात.

**स्वयंसेवी संघटना आणि सामाजिक चळवळी :**

सामाजिक चळवळी आणि स्वयंसेवी संघटना, गट यांच्यामध्ये एक प्रकारचा अन्योन्य संबंध असतो. स्थानिक पातळीवर एखादा प्रश्न घेऊन एक स्वयंसेवी गट तयार होणे आणि त्या गटाने नंतर जनजागृतीचे व्यापक अभियान म्हणून व्यापक पातळीवर चळवळ विकसित करणे तर कधी उत्स्फूतपणे लोक संघटित होतात. काही मागण्यांसाठी, अन्यायाच्या प्रतीकारासाठी, जुलमाचा निषेध करण्यासाठी अशा चळवळीमध्ये जे नेतृत्व तयार होते त्याच्या भोवती अनेक स्वयंसेवी संघटना, गट उभे होतात. त्यामुळे स्वयंसेवी संघटनांच्या सद्यस्थितीचा विचार सामाजिक-राजकीय चळवळींचा संदर्भातच आपल्याला करावा लागतो.

आज अशा स्वयंसेवी संघटना आणि चळवळी नागरी समाजाचा अविभाज्य घटक बनल्या आहेत. नागरी समाजाच्या कार्यामध्ये स्वयंसेवी संघटना महत्त्वपूर्ण भूमिका बजावत आहेत. ह्या संघटना लोकाभिमुख राहून कोणत्याही लाभाची किंवा नफ्याची अपेक्षा न बाळगता कार्यरत असतात. समाजामध्ये स्वयंशासन, अनुशासन पाळण्यावर, शासनाची कमीत कमी मदत घेऊन विकास करण्यावर स्वयंसेवी गटांचा आणि संस्थांचा भर असतो. राज्यसंस्थेकडून दुर्लक्षित राहिलेल्या किंवा खोळंबून राहिलेल्या कामावर स्वयंसेवी संघटना प्राधान्याने आपले लक्ष केंद्रित करतात. म्हणूनच विविध देशातील राज्यसंस्था व सरकारे तसेच दोन किंवा अधिक देशामध्ये परस्पर सहयोगाने विकास घडवून आणणाऱ्या आंतरराष्ट्रीय संघटना, वित्तीय संस्था देखील स्वयंसेवी संघटनांचे स्थान व त्यांची आवश्यकता आज मान्य करीत आहेत. दैनिक सामाजिक व्यवहारांमध्ये अशा संस्था व संघटनांचे स्थान अटळ आहे असे मानले जात आहे.

**स्वयंसेवी गट वाढण्याची कारणे :**

प्रसिद्ध समाजशास्त्रज्ञ डॉ. डी. एन. धनागरे यांनी त्यांच्या ''संकल्पनांचे विश्व आणि सामाजिक

वास्तव'' या पुस्तकामध्ये आर. के. श्रीवास्तव, अशोक राज आणि त्यांच्या सहकारी संशोधकांनी भारतातील स्वयंसेवी संघटनांचे स्वरूप, प्रकार त्यांना मिळणारा निधी आणि त्यांची विकास कार्यातील भूमिका या विषयावर सादर केलेल्या अहवालामध्ये सादर केलेल्या स्वयंसेवी गट आणि संस्थांच्या संख्यावाढीची कारणमिमांसा करताना पुढील चार महत्त्वाच्या अरिष्टांचा उल्लेख केला आहे. ती अरिष्टे पुढीलप्रमाणे -

**१) शासनप्रणित विकास कार्यक्रम राबविण्याऱ्या नोकरशाहीचे अपयश :**

राज्यशासन जेव्हा जनकल्याणाच्या योजना, विकासगंगा जेव्हा वंचित लोकांपर्यंत पोहचविण्यात तसेच दारिद्र्य निर्मूलन व रोजगाराच्या संधीमध्ये वाढ होण्यासाठीच्या प्रयत्नांमध्ये कमी पडते किंवा शासनास यामध्ये अपयश येते त्यावेळी राज्यशासन यंत्रणेखेरीज पर्याय म्हणून स्वयंसेवी संघटना उभ्या राहतात.

**२) जागतिक बाजारपेठेत व अर्थव्यवस्थेतील मंदी :**

१९७० च्या दशकानंतर जागतिक बाजारपेठेत आणि एकंदर अर्थव्यवस्थेत जबरदस्त मंदीची लाट आली त्यामुळे विकासप्रक्रियेला खरी खीळ बसली. या काळात राज्यसंस्था आणि शासनाची इच्छा असूनही जनकल्याण योजनांसाठी आवश्यकतेप्रमाणे निधी उपलब्ध करून देण्यात राज्यसंस्था अपयशी ठरली. परिणामी स्वयंसेवी संघटना, गट कार्यरत झाल्या आणि समाजातील दुर्बल घटक त्यांच्याकडे आशेने पाहू लागले.

**३) पर्यावरणाचे अरिष्ट :**

अनेक पर्यावरणवाद्यांनी पर्यायी विकासाची आणि विशेष म्हणजे शाश्वत विकासाची संकल्पना प्रभावीपणे मांडली तेव्हा पर्यावरणातील अरिष्ट हे देखील स्वयंसेवी संघटनांच्या संख्येत वाढ होण्याचे एक महत्त्वाचे कारण आहे.

**४) भांडवलशाही विचारप्रवाहाची सरशी व समाजवादी विचारसरणीची पिछेहाट**

१९९० च्या दशकात सोव्हिएट संघराज्याचे विघटन झाले, शीतयुद्ध संपुष्टात आले आणि जागतिक पातळीवर अमेरिकी संघराज्याचे राजकीय वर्चस्व निर्विकारपणे सिद्ध झाले. आर्थिक व्यवस्थेत भांडवलशाही विचारप्रवाहाची सरशी आणि समाजवादी विचारसरणीची पिछेहाट या घडामोडीतून एक नवे वैचारिक अरिष्ट निर्माण झाले.

**स्वयंसेवी संघटनांचे प्रकार :**

स्वयंसेवी संघटनांचे त्यांच्या कार्यानुसार विविध प्रकार पाडले जातात. त्यामध्ये प्रामुख्याने विकासाभिमुख काम करणाऱ्या संघटना, जनजागृती करणाऱ्या संघटना, प्रभावी नेत्याच्या छायेत वाढणाऱ्या संघटना, सामाजिक कार्य करणाऱ्या संघटना, स्त्री मुक्तीच्या क्षेत्रात काम करणाऱ्या संघटना असे प्रामुख्याने पाच प्रकार पडतात त्याचे विवेचन पुढीलप्रमाणे :

**१) विकासाभिमुख काम करणाऱ्या संघटना :**

काही संघटना विकासाभिमुख काम करणाऱ्या असतात. त्या ग्रामपातळीवर काम करणाऱ्या असोत

किंवा शहरामध्ये काम करणाऱ्या असोत, प्रश्न पाण्याचा, रस्त्याच्या बांधकामाचा, आरोग्य किंवा शिक्षण प्रसाराचा, रोजगारीचा असेल. गरजू नागरिकांना संघटीत करणे, त्यांना प्रश्नांची माहिती देणे, त्यांचे प्रबोधन करणे, प्रशिक्षण देणे आणि प्रत्यक्ष कृतीसाठी त्यांना सिद्ध करणे, या स्वरूपाची भूमिका विकासात्मक काम करणाऱ्या स्वयंसेवी संस्था घेतात.

**२) जनजागृती करणाऱ्या संघटना :**

काही संघटना फक्त माहिती देणे, जनजागृती करण्यास हातभार लावणे आणि इतर गटांशी संपर्क, समन्वय साधने एवढेच काम करीत असतात. पर्यावरण क्षेत्रामध्ये असे काम करणाऱ्या अनेक स्वयंसेवी संघटना आहेत.

**३) प्रभावी नेत्याच्या छायेत वाढणाऱ्या संघटना :**

बहुतांशी स्वयंसेवी संघटना या एखाद्या प्रभावी नेत्याच्या छायेत वाढत असतात. कै. विलासराव साळुंखे यांची पाणी पंचायत आणि श्री. अण्णा हजारेंचा राळेगणसिद्धी येथील यशस्वी झालेला ग्रामविकासाचा बहुचर्चित प्रयोग ही याची उदाहरणे देता येतील.

**४) सामाजिक कार्य करणाऱ्या संघटना :**

काही संघटना या सामाजिक क्षेत्रामध्ये कार्य करीत असतात. उदा. आरोग्याच्या बाबतीत आनंदवन (वरोडा) येथे बाबा आमटे यांचे कुष्ठरोग्यावर उपचार करून त्यांचे योग्य पुनर्वसन करण्याचे काम अत्यंत चांगले आहे.

**५) स्त्री मुक्तीच्या क्षेत्रात काम करणाऱ्या संघटना :**

स्त्री मुक्तीच्या क्षेत्रात आज अनेक स्वयंसेवी संघटना कार्यरत आहेत. स्त्री आधार केंद्र, नारी समता मंच किंवा जनवादी महिला आघाडी अशा अनेक संघटना आहेत. यापैकी काही संघटना या महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारातून प्रेरणा घेऊन काम करणाऱ्या आहेत तर काही संघटना या जात, वर्ग आणि लिंगभाव या तीनही घटकांचा एकत्रितपणे विचार करून स्त्रीवादाची मांडणी करण्यावर भर देतात. काही संघटना या मार्क्सवादी विचाराने प्रेरित तर काही संघटना या समाजवादाच्या आधारे आपली वैचारिक मांडणी करतात.

### १.३.२ ऐच्छिक संघटनेची संकल्पना आणि लोकांच्या संघटना

**(The concept of Voluntary Organizations and People's Organizations)**

ऐच्छिक संघटना म्हणजे लोकांनी एकत्रित येऊन तयार केलेला असा समूह की, जो ऐच्छिकपणे किंवा सरकारी मदतीशिवाय गरजू लोकांना मदत करणे व त्यांच्या गरजा भागविण्यासाठी साधनांची उपलब्धता करतो. ऐच्छिक संघटना या व्यक्तिगत स्वरूपात किंवा व्यक्तीच्या समूहाने व्यक्तींच्या किंवा समुदायाच्या विकासासाठी निर्माण होतात. या संघटना खासकरून समाजातील दुर्लक्षित घटकांकडे अधिक लक्ष देतात. ऐच्छिक संघटना या ऐच्छिक क्रिया करण्यासाठी निर्माण होतात.

(Voluntary organizations means a group of people working together voluntary

to help the needy persons with their available needs and resources. Voluntary organizations are initiated by individuals or groups of individuals voluntary for development. Particularly for the disadvantaged sections of society. Voluntary organizations is organized for voluntary action.)

**ऐच्छिक संघटनेची व्याख्या (Definition of Voluntary Organizations)**

**David L. Sills -** According to the David L. Sills, "Voluntary organization is a group of persons organized on the basis of voluntary membership without state control for the furtherance of some common interest of its members."

डेव्हीड एस. सिल्स् यांच्या मते, ''समाज सदस्यांच्या समान हेतू पूर्तेतेसाठी राज्याच्या निमंत्रणाशिवाय किंवा मदतीशिवाय ऐच्छिक सदस्यत्वाच्या आधारे तयार झालेला लोकांचा ऐच्छिक समूह म्हणजे ऐच्छिक संघटना होय.''

**ऐच्छिक संघटनांचे स्वरूप (Natures of Voluntary Ogrnaizations)**

ऐच्छिक संघटनांचे स्वरूप हे आपणास पुढील मुद्यांच्या आधारे स्पष्ट करता येईल.

**१) लोकांचा समूह (A group of people)**

ऐच्छिक संघटना या लोकांचा समूह असतात.

**२) खास उद्देश (Specific Purpose)**

ऐच्छिक संघटनांचा खास असा उद्देश असतो की ज्याच्या आधारे त्या समाजाच्या हितासाठी काम करतात.

**३) विविध क्षेत्रामध्ये काम (Work in multiple field)**

ऐच्छिक संघटना या समाजाच्या विविध क्षेत्रामध्ये काम करीत असतात. समाजातील लोकांना असणाऱ्या समस्या सोडविण्यासाठी तसेच विविध समुदायांच्या कल्याणकारी विकासासाठी त्या विविध क्षेत्रामध्ये काम करतात.

**४) नोंदणीकृत किंवा अनोंदणीकृत संघटना**

**(May be registered, may not be registered)**

ऐच्छिक संघटना या नोंदणीकृत असतात तर काही संघटना या अनोंदणीकृत असतात.

**५) समाज कल्याणाचे कार्यक्रम राबविण्यावर भर**

**(Their programmes are based on social welfare)**

ऐच्छिक संघटना या प्रामुख्याने समाज कल्याणाचे कार्यक्रम राबविण्यावर भर देतात.

**६) दान देणाऱ्या संघटनांकडून ऐच्छिक संघटनांना निधी प्राप्त होतो**

**(Voluntary organizations receive funds from donor agencies)**

ऐच्छिक संघटनांना आपले समाज कल्याणासाठी कार्यक्रम राबविण्यासाठी दान देणाऱ्या संघटनांकडून निधी प्राप्त होतो.

**७) ऐच्छिक संघटना स्वत:साठी योजना तयार करतात**

**(They make plans and programmes by their own)**

ऐच्छिक संघटना या स्वत:साठीचे नियोजन तसेच समाज कल्याणकारी कार्यक्रमांचे नियोजन स्वत: करतात.

**८) ऐच्छिक संघटना या अनौपचारिक असतात**

**(Voluntary organizations are non-formal)**

ऐच्छिक संघटना या अनौपचारिकरित्या आपले काम करीत असतात.

**९) सदस्यांच्या सहकार्यावर या संघटना काम करतात**

**(Having cooperation among the members)**

ऐच्छिक संघटना या आपल्या संघटनेच्या सदस्यांच्या सहकार्यावर अवलंबून असतात व या संघटना सदस्यांच्या सहकार्यावरच समाजहितोपयोगी कार्यक्रम राबवित असतात.

**ऐच्छिक संघटनांची वैशिष्ट्ये (Characteristics of Voluntary Organizations)**

**१) सदस्यत्व पूर्णत: ऐच्छिक असते**

**(Membership of voluntary organizations are purely voluntary)**

ऐच्छिक संघटनांचे सदस्यत्व हे पूर्णत: ऐच्छिक असते. या संघटनांचे सदस्यत्व स्विकारण्यासाठी कोणत्याही प्रकारचे बंधन नसते.

**२) लोकांच्या गरजांनुसार या संघटना निर्माण होतात**

**(Voluntary organizations are formed through the initiative of persons interest)**

ऐच्छिक संघटना या लोकांना निर्माण होणाऱ्या समस्या तसेच गरजांनुसार निर्माण होतात व त्यानुसार त्या कार्यरत असतात.

**३) नफा मिळविणे हे या संघटनांचा उद्देश नसतो**

**(Voluntary organizations are neither formed nor run for profit making)**

ऐच्छिक संघटना या नफा मिळविण्यासाठी तयार होत नाहीत. नफा मिळविण्याच्या उद्देशाने त्या

समाजहिताचे उपक्रम राबवित नाहीत.

### ४) ऐच्छिक संघटनांचे नियम हे ते स्वत: तयार करतात

**(Voluntary organizations are governed by their own set of rules)**

ऐच्छिक संघटना या आपल्या संघटनेसाठीचे नियम हे स्वत: तयार करतात.

### ५) लोकांच्या अगदी जवळ या संघटना असतात

**(They are more closer to people)**

ऐच्छिक संघटना या समाजातील लोकांसाठी काम करीत असलेने त्यांचा प्रत्यक्ष संपर्क हा लोकांबरोबर निर्माण होतो त्यामुळे त्या लोकांच्या अगदी जवळ असतात.

## १.३.३ समुदाय संघटनेची संकल्पना (Concept of community based organization)

समुदाय संघटना या सामान्यपणे सर्वत्र "Community Based Organization" या नावाने ओळखल्या जातात. समुदाय संघटना या प्रामुख्याने नागरी समाजाचा एक भाग असतात. नफा किंवा फायदा मिळविणे हे या संघटनांचे उद्दिष्ट नसते. समुदाय संघटना या सर्वसाधारणपणे एका स्थानिक समुदायासाठी काम करताना दिसून येतात. या संघटना समुदायाच्या समस्या सोडविण्यासाठी तसेच समुदायातील लोकांच्या कल्याणासाठी काम करीत असतात. या संघटना आपले काम हे स्वच्छेने करतात तसेच सामाजिक कार्यासाठी लागणारा निधी हा त्या स्वत: गोळा करतात.

समुदाय संघटनांची रचना व कार्ये ही भिन्न भिन्न असतात. भारतामध्ये व जगातील सर्व समुदाय संघटनांची कार्ये व उद्दिष्ट्ये ही भिन्न आहेत. समुदाय संघटना या त्या त्या समुदायातील समस्यांनुसार काम करतात तसेच त्या समस्या सोडवण्यासाठी सातत्याने प्रयत्न करतात. म्हणूनच समुदाय संघटनांची रचना व कार्ये ही भिन्न असतात. ज्या प्रदेशातील समुदायासाठी त्या काम करतात त्यानुसार त्यांची रचना व कार्ये ठरलेली असतात. समुदाय संघटनांपैकी काही संघटनांची लिखित घटना असते व त्या संघटना आपल्या लिखित घटनेनुसार काम करतात. लिखित घटना असणाऱ्या समुदाय संघटनांची एक कार्यकारिणी असते. ही कार्यकारिणी कमिटी या नावाने ओळखली जाते. काही संघटनांची कार्यकारिणी ही लहान तर काहींची कार्यकारिणी मोठी असते. या संघटना औपचारिकपणे आपले काम करीत असतात. तर दुसरीकडे काही समुदाय संघटनांची लिखित घटना नसते. या संघटना समुदायामध्ये निर्माण होणाऱ्या समस्यांनुसार निर्माण होऊन त्यावर काम करतात. या संघटना आपले काम हे अनौपचारिकरित्या करीत असतात.

समुदाय संघटनांचा उदय हा विकसनशील देशामध्ये मोठ्या प्रमाणात झालेला दिसून येतो. या संघटनांना "Bottom-up-Organizations" असे संबोधिले जाते. या संघटना प्रामुख्याने समुदायातील लोकांच्या स्थानिक गरजा कोणत्या आहेत हे ओळखून त्या पूर्ण करण्यासाठी कार्यरत असतात. समुदाय संघटना या आरोग्य, शिक्षण, लोकांचा वैयक्तिक विकास व संपूर्ण समुदायाच्या कल्याणासाठी कार्यरत आहेत. या संघटना समुदायाच्या शाश्वत विकासासाठी झटत असतात. लोकांना शाश्वत शिक्षण, आरोग्य मिळावे म्हणून त्या प्रयत्न करतात. समुदाय संघटनांची उदाहरणे म्हणून जगभर क्लब, शाळेतील समूह,

चर्चमधील समूह, धार्मिक संघटना, युवकांच्या संघटना या प्रसिद्ध आहेत.

विकसनशील राष्ट्रांमध्ये समुदाय संघटना या प्रामुख्याने एच.आय.व्ही., एडस् च्या जाणीव जागृतीवर भर देतात. तसेच समुदायातील लोकांच्या मानवी हक्कांसाठी, आरोग्य केंद्रे, मुलांच्या विकासावर भर देताना दिसून येतात. याबरोबरच पाणी व स्वच्छतेच्या सुविधांसाठी व लोकांच्या आर्थिक प्रश्नांवर प्रामुख्याने भर देताना दिसून येतात. भारतामध्ये पश्चिम बंगालमधील काही समुदाय संघटना या आदिवासी समुदायाच्या विकासासाठी काम करीत आहेत.

समुदाय संघटनांना मिळणारा निधी हा दानाच्या स्वरूपात मोठ्या प्रमाणात उपलब्ध होतो तसेच शासकीय पातळीवर देखील या संघटनांना निधी उपलब्ध करून दिला जातो. समुदाय संघटनांपैकी काही संघटना या शासकीय मदतीशिवाय काम करतात या संघटनांना निधी हा वैयक्तिक दानाच्या स्वरूपात तसेच विविध संस्थांनी दिलेल्या देणगीच्या स्वरूपात प्राप्त होतो.

### १.३.४ भारतातील स्वयंसेवी / ऐच्छिक संघटनांची ऐतिहासिक वाढ

### (Historical Growth of Voluntary Organisations in India)

भारतातील स्वयंसेवी संघटनांच्या स्वयंसेवी कार्याचा इतिहास हा जुना आहे. हिंदू धर्मामध्ये दान देण्यास अत्यंत महत्त्वाचे धार्मिक कार्य मानले गेले आहे. मोक्ष प्राप्तीसाठी हिंदू धर्मामध्ये दान देणे हे महत्त्वाचे मानले जाते. भारतामध्ये श्रीमंत व्यक्ती ह्या आपल्या आयुष्याच्या शेवटी आपणास मोक्ष मिळावा या उद्देशाने मोठ्या प्रमाणात समाजातील गरजू व्यक्तींना दान धर्म करीत असत त्यांच्या गरजा भागविण्यासाठी त्यांना मदत करत असत.

भारतामध्ये स्वयंसेवी क्रिया (Voluntary Action) या विविध रूपामध्ये केल्या जात असल्याचे दिसून येते. उदाहरणार्थ अचानक उद्‌भवलेली नैसर्गिक आपत्ती (दुष्काळ, पूर, भुकंप) यावेळी समाजातील अनेक लोक हे नैसर्गीक आपत्तीमुळे बाधा पोचलेल्या लोकांसाठी स्वयंसेवी वृत्तीने काम करीत असत त्यांना विविध प्रकारची मदत दिली जात असे. सुरवातीस स्वयंसेवी संघटनांचा उगम हा जगभरामध्ये सर्वत्र सारखाच झालेला दिसून येतो. सुरवातीच्या काळातील स्वयंसेवी संघटना या प्रत्यक्षपणे लोकांना मदत पोहचविण्याच्या कार्यामध्ये गुंतलेल्या होत्या. गरीब लोकांसाठी अन्न, आरोग्य सेवा, निवास व्यवस्था या कार्यामध्ये अनेक स्वयंसेवी संघटना पूर्वी काम करीत होत्या. भारतातील स्वयंसेवी क्रिया या मानवतावादी दृष्टीकोनातून मोठ्या प्रमाणात केल्या जात असत. १६ व्या व १७ व्या शतकामध्ये राजा व श्रीमंत व्यक्ती या समाजातील गरजू व्यक्तींच्या गरजा भागविण्यासाठी मोठ्या प्रमाणात दान धर्म करीत असत तसेच इतर लोकांना दान धर्म करण्यासाठी प्रेरित करीत असत.

### १९ व्या शतकातील स्वयंसेवी संस्थांची कृती (Voluntary Action in 19th Century)

१९ व्या शतकामध्ये स्वयंसेवी प्रेरणेने दान मोठ्या प्रमाणात दिले जात होते. हे दान धार्मिक क्रियांच्या माध्यमातून दिले जात असे या काळात स्वयंसेवी क्रिया करण्यासाठी समुदाय व शेजार धर्म याद्वारे प्रेरणा मिळत असे. खेड्यातील लोकांसाठी पिण्याच्या पाण्याच्या व्यवस्थेसाठी विहिरी खोदणे, पाण्याचे टँक तयार करणे, गरिब व गरजूंसाठी अन्नाची व्यवस्था करणे, दूधाची व्यवस्था करणे इ. अनेक क्रिया या स्वयंसेवी

उद्देशाने केल्या जात होत्या. या काळामध्ये लोकांना राहण्यासाठी तसेच त्यांना आश्रय मिळण्यासाठी धर्मशाळा मोठ्या प्रमाणावर स्थापन झाल्या. समुदाय संघटनांनी समाजातील गरीब व गरजूंसाठी मोफत अन्न मिळण्याची व्यवस्था तसेच त्यांच्या शिक्षणाच्या सुविधा व राहण्याची व्यवस्था केली जात असे. या काळामध्ये समुदाय संघटना या स्वयंसेवी कार्यासाठी लागणारा निधी हा स्वत: उभा करीत असत व त्यातून दवाखाने, शाळा व अनाथालयांची निर्मिती करून समाजातील गरजूंना त्याचा लाभ मिळवून देण्यासाठी प्रयत्न करीत असत. स्वयंसेवी क्रिया व सेवाभावी वृत्ती लोकांमध्ये वाढविण्यामध्ये भारतीय संस्कृतीचा मोलाचा वाटा आहे.

**समाजसुधारक व स्वयंसेवी संस्थांच्या कृती (Reformers and Voluntary Action)**

१९ व्या शतकामध्ये स्वयंसेवी क्रिया प्रामुख्याने तीन मार्गांनी केल्या जात होत्या. त्यामध्ये (१) धार्मिक सुधारणा, (२) सामाजिक सुधारणा आणि (४) स्वयंसेवी काम या तीन मार्गांनी प्रामुख्याने स्वयंसेवी क्रिया केली जात होती. १९ व्या शतकातील समाज सुधारकानी आपले लक्ष व संपूर्ण शक्ती ही समाजातील वाईट प्रथा, परंपरा, चालीरिती नष्ट करण्यासाठी खर्च केली. समाजातील जाती प्रथा नष्ट करण्यासाठी समाजसुधारकांनी विशेष प्रयत्न केले.

भारतीय समाज सुधारकांनी स्वयंसेवी क्रियांच्या आधारे समाज कल्याणासाठी अत्यंत मोलाचे योगदान दिले. भारतातील प्रमुख समाजसुधारकांमध्ये राजा राममोहन रॉय, महर्षी देवेंद्रनाथ टागोर, स्वामी दयानंद सरस्वती, सईद अहमद खान, ईश्वरचंद विद्यासागर, केशवचंद्र सेन, रामकृष्ण परमहंस, स्वामी विवेकानंद, महात्मा जोतीबा फुले, रानडे, महर्षी कर्वे आणि विठ्ठल रामजी शिंदे यासारख्या समाजसुधारकांनी स्वयंसेवी क्रिया करून समाज सुधारण्यासाठी प्रयत्न केले.

राजा राम मोहन रॉय यांनी १९ व्या शतकाच्या प्रारंभी भारतात सर्वप्रथम धार्मिक व सामाजिक सुधारणेचा पाया घातला. आधुनिक भारताचा निर्माता या उपाधिने त्यांना गौरविले जाते. भारतातील धर्मसुधारणेचे व समाजसुधारणेचे ते आद्प्रर्वतक होत. राजा राममोहन रॉय यांनी इ.स. १८१५ मध्ये आखील सभेची स्थापना केली. इ.स. १८१८ पासून त्यांनी सतीच्या अनिष्ट व अमानुष प्रथेविरूद्ध प्रचाराची जोरदार आघाडी उभारली. सतीची चाल धर्माविरोधी आहे, असे त्यांनी अनेक धर्मग्रंथाचा आधार घेऊन प्रतिपादन केले ही प्रथा कायद्याने बंद करावी म्हणून इंग्रज सरकारचे मन वळविण्याचा प्रयत्नही त्यांनी केला. १८२८ मध्ये त्यांनी ब्राम्हो समाजाची संघटना स्थापन केली. या संघटनेच्या स्थापनेपासून याची प्रेरणा घेऊन धर्म सुधारणेच्या कार्यासाठी अनेक भारतीय विचारवंत पुढे आले. राजाराम मोहन रॉय यांनी समाजसुधारणेच्या क्षेत्रात अत्यंत मोलाचे कार्य केले. १९ व्या शतकाच्या सुरवातीला भारतीय समाजात अनेक अनिष्ट प्रथा, परंपरा रूढी होत्या. आपल्या समाजाची अधोगती थांबविण्यासाठी या चालिरिती, प्रथा परंपरांचे उच्चाटन झाले पाहिजे असे त्यांचे मत होते. म्हणून त्यांनी या प्रथा, चालिरिती, रूढी विरूद्ध प्रचाराची जोरदार मोहीम उघडली. सतीसारखी दृष्ट प्रथा बंद पाडण्यासाठी त्यांनी खूप प्रयत्न केले. याशिवाय बालविवाह, बाल हत्या, केशवपन, बहुपत्नीत्व यासारख्या प्रथानांही त्यांनी विरोध केला. भारतीय समाजातील स्त्रीयांवर होणाऱ्या अन्यायाविरूद्ध त्यांनी आवाज उठविला. त्यांनी विधवा पुनर्विवाहाचे समर्थन करून समाजातील विधवांना न्याय मिळावा यासाठी प्रयत्न केले. राजा राममोहन रॉय यांच्या समाजसुधारणेच्या कार्याची मुख्य

प्रेरणा त्यांची मानवतावादी दृष्टी हीच होती म्हणूनच त्यांना 'मानवतावादी समाजसुधारक' असे म्हटले जाते.

राजा राममोहन रॉय यांचे शिक्षण क्षेत्रातील कार्यही अतिशय मोलाचे आहे. त्यांच्या प्रयत्नांमुळेच कलकत्यात हिंदू कॉलेजची स्थापना झाली. भारतीयांना इंग्रजी शिक्षण द्यावे असा त्यांनी आग्रह धरला आणि त्याकरिता सरकार दरबारी प्रयत्न केले. भारतीयांनी जुन्या विद्या व धर्मग्रंथ यांच्या अध्ययनातच गुरफुटून न पडता गणित व भौतिक शास्त्रे यांचे शिक्षण घ्यावे, असे त्यांनी सांगितले होते.

महर्षी देवेंद्रनाथ टागोर हे राजा राममोहन रॉय यांच्यानंतरचे ब्राम्हो समाजाचे महत्त्वाचे नेते होते. राजा राममोहन रॉय यांच्या पश्चात ब्राम्ही समाजाचे कार्य पुढे चालविण्याची जबाबदारी त्यांनी पार पाडली. देवेंद्रनाथ टागोर हे नास्तिक होते. ईश्वर एकच असून तो सर्वशक्तीमान आहे. ईश्वराला प्रिय असणारे कार्य करून आणि त्याच्यावर प्रेम करून त्याची उपासना करता येते असे त्यांनी सांगितले होते. त्यांचा मूर्तीपूजेला विरोध होता तसेच तीर्थयात्रा व इतर धार्मिक कर्मकांड इत्यादी गोष्टींनाही त्यांनी आपला विरोध दर्शविला होता. इंग्रजी शिक्षणाच्या प्रसारामुळे आपल्या ठिकाणी बुद्धीवादी दृष्टीकोन विकसित होत असताना आपण अडाणी लोकांप्रमाणे दगड किंवा लाकडाच्या तुकड्यास देव मानून त्यांची पूजा करणे मूर्खपणाचे आहे असे त्यांनी म्हटले आहे.

ब्राम्हो समाजाने धर्माचा विचार न करता संपूर्ण मानवजातीसाठी कार्य करावे, अशी राजा राममोहन रॉय यांची अपेक्षा होती. परंतु देवेंद्रनाथ टागोर यांनी मात्र ब्राम्हो समाजाने हिंदू धर्मियांवरच आपले लक्ष केंद्रीत करण्याच्या गरजेवर भर दिला. त्यांनी वेदविचार पायाभूत मानून हिंदू धर्मात सुधारणा घडवून आणण्याच्या कार्याला त्यांनी प्राधान्य दिले होते. ब्राम्हो समाजाच्या तत्वज्ञानावरील ख्रिस्ती धर्माचा प्रभाव कमी करण्याचे क्षेय देवेंद्रनाथ टागोर यांनी दिले जाते.

स्वामी दयानंद सरस्वती यांचे भारतातील धर्मसुधारणेच्या चळवळीत मोलाचे योगदान आहे. त्यांनी धर्मसुधारणेच्या कार्याची प्रेरणा ब्राम्हो समाजाकडून घेतली तसेच त्याच्या अनेक शाखा स्थापन केल्या पुढे त्यांनी आपला वेगळा संप्रदाय निर्माण करण्याचे ठरविले त्यानुसार त्यांनी मुंबई येथे १० एप्रिल १८७५ रोजी आर्य समाजाची स्थापना केली. त्यांनी हिंदू धर्मातील जाती व्यावस्था, उच्च-नीच, भेदभाव, मूर्तीपूजा तसेच समाजातील अनिष्ठ प्रथा व परंपरा यावर त्यांनी कडक टीका केली. त्याचबरोबर त्यांनी विधवाविवाह, आंतरजातीय विवाह, स्त्रीशिक्षण या गोष्टींचा पुरस्कार केला.

हिंदू धर्मातील विकृती व दोष दूर करून त्यास शुद्ध स्वरूप प्राप्त करून देण्याचा प्रयत्न स्वामी दयानंद सरस्वतींनी केला. या प्रयत्नास संघटित स्वरूप आणण्याच्या उद्देशानेच त्यांनी आर्य समाजाची स्थापना केली. आपले विचार लोकांपर्यंत पोहचविण्यासाठी त्यांनी 'सायार्थ प्रकाश' नावाचा ग्रंथही लिहिला.

केशवचंद्र सेन हे ब्राम्हो समाजाच्या प्रमुख नेत्यांपैकी एक होत. समाजसुधारणेचे कट्टर पुरस्कर्ते म्हणून ते ओळखले जातात. एकोणिसाव्या शतकात समाजसुधारणेची चळवळ गतिमान बनविण्यात त्यांनी महत्त्वाचा वाटा उचलला होता. ब्राम्हो समाजाला लोकप्रियता मिळवून देण्यातही त्यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली होती. केशवचंद्र सेन यांनी समाजसुधारणेची मोहीम मोठ्या उत्साहाने चालू ठेवली. त्यांनी समाजातील स्त्रियांची स्थिती सुधारावी असा आग्रह धरला त्या दृष्टीने बालविवाह, बहुपत्नीत्व यासारख्या प्रथांना विरोध केला तसेच विधवा विवाह, आंतरजातीय विवाह, स्त्रीशिक्षण यांचा पुरस्कार केला. स्त्रियांच्या

शिक्षणासाठी त्यांनी शिक्षण संस्था स्थापन केल्या. समाजातील या अनिष्ट प्रथांवर कायद्याने बंदी घालावी यासाठीही त्यांनी प्रयत्न केले होते.

स्वामी विवेकानंदानी इ.स. १८९६ मध्ये 'रामकृष्ण मिशन'ची स्थापना केली. आपले गुरू रामकृष्ण परमहंस यांचा संदेश सर्वत्र पोहचविणे, समाजातील उपेक्षित घटकांची सेवा करणे आणि समाजसुधारणेच्या कार्याला चालना देणे हे या संस्थेच्या स्थापनेमागील प्रमुख उद्देश होते. जगातील सर्वच धर्म सत्य असून ते एकाच ध्येयाप्रत जाण्याचे वेगवेगळे मार्ग आहेत. स्वामी विवेकानंदांनी जगात ठिकठिकाणी रामकृष्ण मिशनच्या शाखा स्थापन केल्या. त्यांनी दलित व पिडीत वर्गाच्या उद्धाराला प्राधान्य दिले होते. ज्या लोकांना पोटभर अन्न मिळत नाही त्यांना धर्म सांगणे हा निव्वळ मूर्खपणा होय, असे त्यांनी म्हंटले आहे. म्हणूनच त्यांनी रामकृष्ण मिशनच्या वतीने समाजसेवेचे व्रत अंगिकारले होते. दलितांची व पिडीतांची सेवा ही त्यांच्या दृष्टीने केवळ भूतदया नव्हती, तर तो पवित्र अशा धार्मिक कार्याचा एक आवश्यक भाग होता. त्यांच्या या दृष्टीमुळेच रामकृष्ण मिशनच्या वतीने त्यांनी ठिकठिकाणी अनाथाश्रम, रूग्णालये, वसतीगृहे यांची स्थापना केली. दुष्काळ, महापूर, रोगराई यासारख्या नैसर्गीक आपत्तीच्या काळात संकटग्रस्तांना मदतीचा हात देण्यातही रामकृष्ण मिशनने पुढाकार घेतला.

महाराष्ट्रातील बहुजन समाजाचे आणि पददलित जनतेचे उद्धारकर्ते म्हणून महात्मा जोतीबा फुले यांचे नेहमीच स्मरण केले जाते. महात्मा फुल्यांच्या काळात भारतीय समाजातील स्त्रियांची स्थिती अतिशय वाईट होती. समाजाने स्त्रियांना सर्व प्रकारचे हक्क नाकारले होते. स्त्रियांना शिक्षण मिळाल्याखेरीज त्यांचा उद्धार होणार नाही म्हणून त्यांनी स्त्री शिक्षणाचे कार्य प्रथम हाती घेतले. इ.स. १८४८ मध्ये महात्मा फुल्यांनी पुण्यात मुलींची पहिली शाळा सुरू केली. १८५१ मध्ये त्यांनी दुसरी मुलींच्यासाठी शाळा सुरू केली. फुल्यांनी विधवा पुनर्विवाहाचा पुरस्कार करून इ.स. १८६४ मध्ये पुण्याच्या गोखले बागेत पुनर्विवाह घडवून आणला. अस्पृश्यांना उच्चवर्गीयांकडून वाईट वागणूक दिली जात होती. अस्पृश्यांवरील अन्याय दूर करण्यासाठी त्यांना प्रथम शिक्षण दिले पाहिजे याची जाणीव महात्मा फुले यांना झाली, म्हणूनच त्यांनी अस्पृश्यांना शिक्षण देण्याचे कार्य हाती घेतले. इ.स. १८५२ मध्ये त्यांनी पुण्यामध्ये अस्पृश्यांच्या मुलांसाठी दोन शाळा उघडल्या. १८५३ साली त्यांनी महार, मांग इ. लोकांस विद्या शिकविण्याकरीता मंडळी या नावाची एक संस्था स्थापन केली. या संस्थेच्या वतीने अस्पृश्यांसाठी काही शाळा चालविण्यात आल्या. अस्पृश्यांची सामाजिक स्थिती सुधारण्यासाठी त्यांच्यात जागृती घडवून आणणे आवश्यक आहे, ही गोष्ट महात्मा फुल्यांनी ओळखली व त्यामुळे त्यांनी अस्पृश्यांमधीलच काही मंडळींना हाताशी धरून त्या दृष्टीने प्रयत्न चालविले. त्यांनी अस्पृश्यांमध्ये शिक्षणाची गोडी उत्पन्न केली. उन्हाळ्यात अस्पृश्यांचे पाण्याविना अतिशय हाल होत असत त्यासाठी त्यांनी १८६८ मध्ये आपल्या घरातील पाण्याचा हौद अस्पृश्यांसाठी खुला केला.

ब्राम्हणांनी धर्मग्रंथ निर्माण करून समाजव्यवस्थेच्या सर्व क्षेत्रांत आपले वर्चस्व प्रस्थापित केले. त्यांनी सर्व सोयी सवलती आपणाकडे घेतल्या आणि शुद्रांना कायमचे गुलाम बनविले. भारतीय समाजातील जातीभेदाचे मुळ ब्राम्हणांच्या स्वार्थी धर्मांधतेत आणि अहंकारात आहे. ब्राम्हणी वर्चस्वामधूनच समाजात पराकोटीची विषमता निर्माण झाली असे मत फुल्यांनी मांडले. सामाजिक विषमता, अन्याय व शोषण यांवर आधारलेल्या प्रचलित समाजव्यवस्थेत बदल घडवून आणावयाचा असेल तर शुद्र व कनिष्ठ वर्गांनी संघटित

होऊन ब्राम्हणी वर्चस्वा विरूद्ध संघर्ष केली पाहिजे असे महात्मा फुल्यांनी म्हंटले आहे. या प्रकारचा संघर्ष जर करावयाचा असेल तर बहुजन समाजाची स्वत:ची संघटना हवी. ही गरज ओळखून त्यांनी २४ सप्टेंबर १८७३ रोजी पुण्यात 'सत्यशोधक समाज'ची स्थापना केली.

थोडक्यात, महात्मा फुल्यांनी आपले संपूर्ण आयुष्य पददलित जनतेच्या व बहुजन समाजाच्या उद्धारासाठी खर्च केले. महाराष्ट्रात स्त्री-शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवणारा समाजसुधारक, अस्पृश्यांच्या मुलांसाठी शाळा उघडून त्यांना शिक्षणाचे दरवाजे खुले करणारा पहिला दलित उद्धारक, शेतकऱ्यांची दु:खे वेशीवर टांगणारा पहिला शेतकरींचा कैवारी, शुद्र व बहुजन समाजाच्या वेदनांना वाचा फोडणारा बहुजन समाजातील पहिला नेता अशा अनेक विशेषणांनी त्यांचा गौरव केला जातो.

भारतात स्त्रियांच्या उद्धारासाठी ज्या महापुरूषांनी आपले उभे आयुष्य खर्ची घातले अशा महापुरूषांपैकी महर्षी धोंडो केशव कर्वे हे एक होत. त्यांनी विधवा विवाहाचा प्रसार केला व त्यांनी स्वत: एका विधवेशी विवाह करून समाजापुढे एक आदर्श घालून दिला. इ.स. १८९९ मध्ये त्यांनी 'अनाथ बालिकाश्रम' नावाची संस्था स्थापन केली १९०७ मध्ये हिंगणे येथे 'महिला विद्यालयाची' स्थापना केली. स्त्रियांसाठी एक स्वतंत्र विद्यापीठ स्थापन करावे अशी त्यांनी इच्छा होती. त्यानुसार त्यांनी इ.स. १९१६ मध्ये महिला विद्यापीठाची स्थापना केली. इ.स. १९२० मध्ये शेठ विठ्ठलदास ठाकरसी यांनी आपल्या मातोश्री श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी यांच्या स्मरणार्थ १५ लाख रूपयांची देणगी या विद्यापीठाला दिली. पुढे या विद्यापीठाचे श्रीमती 'नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ' (S.N.D.T.) रूपांतर झाले. आज या विद्यापीठातून हजारो स्त्रिया उच्च शिक्षणाचा लाभ घेत आहेत.

**ब्रिटीश कालखंड**

भारतामध्ये स्वयंसेवी संघटना व सामाजिक क्षेत्रातील कार्य हे ब्रिटीश शासनाच्या कालखंडापासून मोठ्या प्रमाणात सुरू झाले. भारतातील पहिली स्वयंसेवी संघटना Friend-in-Need Society मद्रास ही होय. भारतीय स्वयंसेवी संघटनेच्या इतिहासातील अत्यंत महत्त्वपूर्ण घटना म्हणजे १८६० साली झालेला Societies Regulation Act होय. भारतातील स्वयंसेवी संघटनांच्या वाढीमध्ये तसेच स्वयंसेवी क्रियांमध्ये ख्रिश्चन मिशनऱ्यांची भूमिका अत्यंत महत्त्वपूर्ण मानली जाते. भारतामध्ये विशेषत: दक्षिणेमध्ये भारतीय ख्रिश्चन मिशनरीज व पाश्चात्य ख्रिश्चन मिशनरीजनी शिक्षण संस्था व दवाखान्यांची निर्मिती मोठ्या प्रमाणात करून समाजातील वंचित, दुर्बल घटकांना मदत केली. तसेच शिक्षण, आरोग्य, समाजकल्याण, अनाथ मुले, अपंग व्यक्ती, आजारी व्यक्ती यांच्या कल्याणासाठी देखील अनेक स्वयंसेवी संघटना निर्माण झाल्या. प्रत्येक जातीने आपल्या जातीतील लोकांच्या कल्याणासाठी मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करून देऊन आपल्या जातीतील लोकांच्या कल्याणासाठीचे विविध उपक्रम राबविले.

२० व्या शतकामध्ये महात्मा गांधीनी सुरू केलेल्या स्वातंत्र्य चळवळीचे योगदान हे स्वयंसेवी क्रियेमध्ये अत्यंत मोलाचे आहे. गांधीजींच्या नेतृत्वाखाली अनेक स्वयंसेवक तयार झाले व त्यांनी अत्यंत महत्त्वपूर्ण कार्य केले. स्वयंसेवी संघटनांच्या विकासामध्ये गांधीजींचे योगदान महत्त्वपूर्ण मानले जाते. महात्मा गांधीजींनी सत्तेचे विकेंद्रीकरण करून समाजातील सर्व स्तरातील लोकांना सत्तेचा लाभ मिळवून दिला. गांधीजींनी पुढील महत्त्वाच्या संघटनांची निर्मिती केली त्यामध्ये (१) हरिजन सेवक संघ, (२) ग्राम उद्योग

संघ, (३) हिंदूस्थानी तालीम संघ, (४) सर्व सेवा संघ या संघटना स्थापन करून त्याद्वारे स्वयंसेवी क्रिया करण्यात आल्या. हरिजन सेवक संघातर्फे समाजातील अस्पृश्यांसाठी मोलाचे कार्य केले. ग्राम उद्योग संघाच्या माध्यमातून ग्रामीण भागामध्ये लहान लहान उद्योगांची निर्मिती करून ग्रामीण भागातील लोकांना रोजगार उपलब्ध करून दिला. सर्व सेवा संघाच्या माध्यमातून गांधीजींनी समाजातील सर्व स्तरातील लोकांच्या कल्याणासाठीचे प्रयत्न केले.

**स्वातंत्र्यानंतरच्या कालखंडातील स्वयंसेवी क्रिया**

**(Voluntary Action during Post-Independence Perod)**

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतरच्या कालखंडात स्वयंसेवी संघटनांच्या दृष्टीकोनात व संरचनेत बदल झाला. या काळामध्ये स्वयंसेवकांनी वेगवेगळ्या विषयांना हाती घेऊन समाज कार्य केले. स्वातंत्र्यानंतर भारताने कल्याणकारी राज्याची संकल्पना स्विकारली. शासकीय पातळीवर विविध प्रकारच्या कल्याणकारी योजना या काळात आखल्या गेल्या. या काळात स्वायत्त संस्थांना स्वयंसेवी कामकाज करण्यासाठी प्रेरित करण्यात आले. सेंट्रल वेलफेअर बोर्ड व इंडियन कौन्सिल ऑफ सोशल वेलफेअर या संघटनेद्वारे यासाठी प्रेरणा देण्यात आली. महात्मा गांधीजी, ख्रिश्चन मिशनरीज, रामकृष्ण मिशन यांनी ज्या संस्था स्थापन केल्या त्या संस्थांनी आपले कार्य पुढे जोमाने सुरू ठेवले.

भारतामध्ये अनेक स्वयंसेवी संघटना स्थापन झाल्या त्यामध्ये इंडियन रेड क्रॉस सोसायटी, यंग मेन्स् ख्रिश्चन असोसिएशन, यंग वुमेन ख्रिश्चन असोसिएशन, हरिजन सेवक संघ, कस्तुरबा गांधी नॅशनल मेमोरियल ट्रस्ट, इंडीयन कौन्सिल ऑफ सोशल वेलफेअर, इंडियन कौन्सिल ऑफ चाईल्ड वेलफेअर, युथ होस्टेल असोसिएशन व असोसिएशन ऑफ सोशल हेल्थ यासारख्या अनेक संघटनांचा स्वयंसेवी कार्यामध्ये मोलाचा वाटा आहे.

## १.३.५ संस्था नोंदणी अधिनियम १८६०

सध्या फार मोठ्या प्रमाणावर सार्वजनिक संस्था स्थापन होत आहेत. सामाजिक जीवनाची, सहकार्याची व जनकल्याणाची भावना एकूण समाजात जागृत झालेली आहे, ही समाधानाची बाब आहे. परंतु ही संस्था स्थापन करून तिची नोंदणी करण्यासंबधी जो कायदा तो म्हणजे संस्था नोंदणी अधिनियम, १८६० होय.

एखादी संस्था स्थापन करावयाची असेल तर कायद्याने त्या संस्थेची नोंदणी करणे आवश्यक आहे म्हणूनच नोंदणीच्या कायद्यात संस्था नोंदणी अधिनियम, १८६० या कायद्यास अतिशय वेगळे महत्त्व प्राप्त झाले आहे. परंतु मुंबई पब्लिक ट्रस्ट्स ॲक्टच्या अंमलबजावणीपासून संस्था नोंदणी कायद्यातील तरतुदीकडे दुर्लक्ष होताना दिसून येते. हा कायदा मुंबई पब्लिक ट्रस्ट्स ॲक्ट अंमलात येण्यापूर्वी सर्व सार्वजनिक संस्था नोंदणी कायद्याच्या आदिपत्याखाली येत होत्या. यामध्ये संस्थेच्या सभासदांची यादी ठेवणे व ती प्रत्येक वर्षी सहाय्यक निबंधकास सादर करणे आणि संस्थेच्या सभासदांना संस्थेचे दप्तर पाहण्याचा व कागदपत्रांच्या नकला मिळण्याचा जो अधिकार आहे त्याची नव्याने जाणीव होणे हा कायद्याचा उद्देश आहे.

१. मानव हा समाजप्रिय प्राणी आहे त्यामुळे समूहात, समाजात राहताना त्याला काही विशिष्ट गोष्टींचं सामाजिक हिताच्या दृष्टीने पालन करणे, सहकाराच्या भावनेने राहणे आवश्यक आहे.

२. समाजस्वास्थ्य साधणे व सामाजिक उत्तरदायकत्वाची भावना जोपासणे.

३. सामाजिक संस्था स्थापन करण्यासाठी नियोजन व नियंत्रण गरजेचे आहे.

४. कायद्याची अंमलबजावणी करण्यासाठी स्वतंत्र विभागाची स्थापना करणे गरजेचे आहे.

भारतीय समाजामध्ये अगदी प्राचीन काळापासून खाजगी व सामाजिक संस्था अस्तित्वात असून त्या कार्यरत असलेल्या दिसून येतात. संस्था नोंदणी अधिनियम, १८६० याच्या सालावरून हे लक्षात येते की, हा कायदा ब्रिटीश सरकारच्या काळात अस्तित्वात आलेला दिसून येतो. थोडक्यात, ज्या संस्था या कायद्यान्वये नोंदणीकृत करून घेतलेल्या नसतील अशा संस्थाना कायदेशीर अस्तित्व प्राप्त होत नाही. भारताने ज्यावेळेस राज्यघटनेचा स्वीकार केला त्यावेळेपर्यंत जे कायदे अस्तित्वात होते. ते कायदे भारतीय राज्यघटना कलम ३७२ प्रमाणे अद्यापि अंमलात आहेत. परंतु असे कायदे जर लोकसभेने अथवा राज्य विधानसभेने रद्द केले असतील तर ते भारतात अथवा राज्यात अंमलात राहत नाहीत व त्यांचा अंमल संपतो. आणि जे कायदे लोकसभा अथवा राज्य विधानसभेने स्वीकृत केले असतील त्यांचा अंमल चालूच राहतो. महाराष्ट्र राज्य शासनाने हा कायदा स्वीकृत केलेला असून त्यामध्ये काही दुरूस्त्या ही केलेल्या आहेत, त्यामुळे हा संस्था नोंदणी अधिनियम, १८६० चा कायदा महाराष्ट्र राज्यात लागू आहे.

या कायद्यान्वे संस्था दोन प्रकारच्या स्थापन करता येतात. त्या खालीलप्रमाणे -

१) खाजगी व २) सामाजिक संस्था

**१) खाजगी संस्था** - अशा संस्थामध्ये फक्त त्या विशिष्ट संस्थेचे जे सभासद असतील. त्या सभासदांपुरतीच मर्यादित असते. त्याचा उपयोग सर्वसामान्य जनतेला होत नाही.

**२) सामाजिक संस्था** - अशा संस्था या धर्मादाय स्वरूपाच्या असतात. अशा संस्थांचा उद्देश हा सामाजिक उन्नती करणे, जनकल्याण साधने, सामाजिक स्थैर्य प्राप्त करणे हा असतो.

महाराष्ट्रात ज्या सामाजिक संस्था आहेत अशा सर्व संस्था मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५०. कलम २ (१३) च्या व्याख्येत मोडतात, पर्यायाने अशा सर्व संस्था, संस्था नोंदणी अधिनियम, १८६० अन्वये नोंदविल्या असतील तर त्या संस्थांना मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० (दि बॉम्बे पब्लिक ट्रस्ट ॲक्ट, १९५०) अन्वये नोंदणी करून घेणे क्रमप्राप्त आहे. अशा सर्व संस्थांची नोंदणी अधिनियम १८६० कलम २० मध्ये निश्चित केलेल्या कार्यासाठीच आणि त्यातील तरतुदीप्रमाणे ज्या संस्था स्थापन केलेल्या असतील अशा संस्थांचीच नोंदणी केली जाते. यामध्ये सर्वसामान्यपणे कला, विज्ञान, संशोधन, शिक्षण, संस्कृतिसंवर्धन, इत्यादीसाठी संस्था स्थापन करता येतात.

**कलमांचे विवरण -**

| | |
|---|---|
| १. ज्ञापन-विधानपत्र (मेमारॅण्डम) | २. संस्थेचे निवेदन पत्र |
| ३. संस्थेची नोंदणी | ३. अ. नाम सदृश्यतेबाबत |
| ४. कार्यकारी मंडळ यादी सादर करणेबाबत | ४. अ. निबंधकाने माहिती मागविणे |
| ५. संस्थेची मालमत्ता कशी विहित होते | ६. संस्थेच्या बाबतीत कायदेशीर कारवाई |

७. दावा रद्द (अबेट) होण्याबाबत
८. हुकुमनामा बजावणीबाबत
९. नियमानुसार दंड वसुलीबाबत
१०. सभासदांवर दावा दाखल करणे
११. संस्थेबाबत सभासदांनी गुन्हा केल्यास
११. ब. माहिती अथवा विवरणपत्र दाखल केलेल्या गुन्ह्याबाबत
११. क. निबंधकाच्या पूर्वपरवानगीशिवाय गुन्हा दाखल करता येत नाही
१२. संस्थेचे नाव -प्रयोजन इत्यादीत बदल करण्याबाबत
१२. अ. संस्थेच्या नावातील बदल नोंदविणे
१२. ब. नाव बदलल्यानंतरची कायदेशीर पूर्तता
१२. क. बदल केलेल्या नावाचे प्रमाणपत्र
१२. ड. हिशोब ठेवणे व ऑडीट करणे
१२. इ. ऑडीटरचे कर्तव्य
१३. संस्थेच्या विसर्जनाबाबत
१४. विसर्जित झालेल्या संस्थेच्या सभासदास नफा वा फायदा न मिळणे
१५. सभासद व अपात्रता
१६. नियामक मंडळ (गव्हर्निंग कौन्सिल) व्याख्या
१७. अधिनियमापूर्वी स्थापन झालेल्या संस्था
१८. पूर्वीच्या संस्थेने ज्ञापन दाखल करणे
१९. कागदपत्रांची तपासणी
२०. कोणत्या संस्था नोंदविता येतात
२०. अ. शैक्षणिक संस्थाबाबत
२०. ब. (१) खास संस्थाबाबत निर्देश
२०. ब. (२) त्याबाबत राजपत्रात अधिसूचना जारी करण्याबाबत
२१. रजिस्ट्रार ऑफ कंपनीज कडील चौकशी प्रकरणाबाबत
२२. नियम

**महाराष्ट्र संस्था नोंदणी उपविधी, १९७१**

१. संक्षिप्त नाव व व्यापी
२. व्याख्या
३. क्षेत्र व त्याची व्याप्ती
४. ज्ञापन कलम २ प्रमाणे दाखल करणे
५. फी भरण्याची पध्दती
६. नोंदणीचा दाखला (प्रमाणपत्र) नमुना
७. नियामक मंडळाची यादी पाठविणे
८. कलम ४ अ प्रमाणे माहितीपत्रक पाठविणे
९. हिशोब ठेवण्यासंबधी
१०. ऑडीट करण्यासंबधी
११. ऑडीट कसे करावे
१२. ऑडीट रिपोर्ट पाठविण्याची कालमर्यादा
१३. कागदपत्रांची तपासणी
१४. कागदपत्रांच्या नकलांबाबत
१५. सभासदांच्या यादीबाबत

**संस्था नोंदणी कशी करावी –**

संस्था नोंदणी करण्यासाठीचा अर्ज नमुना

ज्ञापन (विधानपत्र) नमुना

सोबत जोडावयाचा दाखला नमुना

सोबत जोडावयाचे समतिपत्र नमुना

सोबत जोडावयाचे अधिकारपत्र नमुना

सोबत जोडावयाचे प्रतिज्ञापत्र नमुना

सोबत जोडावयाचा फी माफी अर्ज

सोबत जोडावयाचे हमीपत्र नमुना

कार्यालयीन पत्ता

**न्यायालयीन निवडे निर्णयाविधी (केस लॉ)**

थोडक्यात, अशा संस्था की ज्या संस्था नोंदणी अधिनियम, १८६० अन्वये नोंदविल्यानंतर त्या संस्था मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० प्रमाणे नोंदविल्या गेल्या असतील, अशा सर्व संस्थांची प्रकरणे व चौकशी करताना या कायद्यातील तरतुदींना प्राधान्य देणे गरजेचे आहे. पर्यायाने अशा सर्व संस्थांना तरतुदी लागू करून निर्णय देणे आवश्यक ठरते.

**अ) साहित्यिक, वैज्ञानिक आणि धर्मादाय सोसायट्यांच्या नोंदणी करिता अधिनियम –**

साहित्य, विज्ञान किंवा ललितकला यांच्या वाढीसाठी आणि उपयुक्त ज्ञानाचा प्रचार व प्रसार यासाठी धर्मादाय सोसायट्यांची कायदेविषयक परिस्थिती सुधारणे गरजेचे आहे. त्यासाठी खालील अधिनियम निश्चित करण्यात येत आहेत.

**१. निबंधक** – या अधिनियमाला अनुसरून एक सोसायटी निबंधक नेमला जातो. आणि त्यांच्या मार्फत कर्तव्य व कामे पार पडण्यासाठी इतर अधिकारी नेमले जातात.

**२. सोसायटी निबंधक सहायक निबंधक** – राज्य शासन एखाद्या व्यक्तीला अधिसुचनेद्वारे सोसायटी निबंधक म्हणून नेमू शकते आणि त्या व्यक्ती द्वारे तिला दिलेले अधिकार, कर्तव्ये, कामे पार पडू शकते. त्याचबरोबर शासनाच्या किंवा विशेष आदेशांच्या सहाय्याने प्रशासनावर देखरेख ठेऊन कायद्याची अंमलबजावणी करेल.

राज्य शासनाच्या आदेशानुसार निश्चित केलेल्या क्षेत्राकरिता 'सोसायटी सहाय्यक निबंधक' म्हणून एखाद्या व्यक्तीची नियुक्त केली जाते आणि तिला कायद्याच्या आधारे काही कर्तव्ये व कामे पार पाडण्याचा अधिकार दिला जातो.

**ब) संस्थापन समयलेख आणि नोंदणी याद्वारे बनविण्यात आलेल्या सोसायट्या –**

१) साहित्य, विज्ञान किंवा ललितकला व धर्मादाय प्रयोजनाकरिता कायद्याच्या कलम २० मध्ये सांगितलेल्या कोणत्याही प्रयोजनासाठी सात किंवा त्यापेक्षा जास्त व्यक्ती एकत्र येऊन एक सोसायटी बनवू शकतात.

२) अशा संस्थापन समयलेखामध्ये सोसायटीचे नाव, सोसायटीची उद्दिष्टे, नियामक, परिषद, संचालक, समिती अथवा सोसायटीच्या नियमाद्वारे ज्याच्याकडे तिच्या कारभाराचे व्यवस्थापन सोपविण्यात आलेले आहे. अशा सर्व नियामक मंडळ यांची नावे, पत्ते व व्यवसाय. सोसायटीचे नियम व विनिमय यांची यथातथ्य प्रत म्हणून नियामक मंडळाच्या किमान तीन सदस्यांची प्रमाणित केलेली एक प्रत संस्थापन समयलेखाबरोबरच दाखल करावी लागते.

**३) नोंदणी आणि फी –** असा समयलेख आणि प्रमाणपत्र प्रत दाखल करण्यात आल्यानंतर निंबधक, या अधिनियमान्वये त्या सोसायटीची नोंदणी करतो व तसे स्वत:च्या स्वाक्षरीने प्रमाणित करतो. अशा प्रत्येक नोंदणीबद्दल निंबधकाकडे पन्नास रूपये फी किंवा राज्य शासन कोणत्याही क्षेत्रात एखादी शैक्षणिक संस्था, चालवण्याच्या हेतूने स्थापन केलेल्या सोसायटीच्या नोंदणीसाठी, जर तिची उद्दिष्टे त्या अधिनियमाच्या १ल्या भागान्वये स्थापन केली असेल तर अशी फी द्यावी लागणार नाही किंवा भरावी लागणार नाही.

**४) व्यवस्थापक मंडळाची वार्षिक सूची दाखल करणेबाबत** – सोसायटीच्या नियमानुसार ज्या दिनांकाला सोसायटीची वार्षिक सर्वसाधारण सभेसाठी उपबंध करण्यात आलेला नसेल तर, जानेवारी महिन्यात, किंवा दरवर्षी एकदा नियामक, परिषद, संचालक, समिती किंवा त्या त्या वेळी ज्याच्याकडे सोसायटीच्या कारभाराचे व्यवस्थापन सोपवण्यात आलेले असे अन्य नियामक मंडळ यांची नावे, पत्ते व व्यवसाय यांची एक सुची निबंधक, यांच्याकडे दाखल करावी लागेल.

१) जी माहिती निबंधकाकडे पाठविली जाते त्यामध्ये कोणता तपशील असणे गरजेचे आहे. आणि किती कालांतराने अशी माहिती पाठवावी लागेल या गोष्टींची निश्चित केलेल्या नियमाद्वारे पाठविणे गरजेचे आहे.

२) पोटकलम (१) मध्ये निश्चित करण्यात आलेली नोटीस टपालाद्वारे, बजावता येते.

३) या कलमाच्या आधारे जी माहिती जमा केलेली असते ती माहिती ज्या संस्थेच्या संदर्भात असते अशा संस्थेच्या लेखी संमती शिवाय किंवा त्यामधील कोणताही तपशील विशिष्ट सोसायटीच्या संबंधातील तपशील आहे हे ओळखणे ज्यामुळे शक्य होईल अशा रितीने प्रसिध्द करता येणार नाही.

४) भारतीय दंड संहिता कलम ११क खालील किंवा भारतीय दंड संहिता (१८६०चा ४५) या अन्वये खालील खटल्याच्या प्रयोजना शिवाय एरव्ही निबंधक किंवा निश्चित केलेला इसम याच्याशिवाय कोणालाही कोणतीही माहिती पाहता येणार नाही.

**५) सोसायटीची मालमत्ता कशा प्रकारे निश्चित असेल** – या अधिनियमाद्वारे नोंदणी केलेल्या सोसायटीची मालमत्ता जर विश्वस्तांकडे निहित नसेल तर, अशी मालमत्ता दिवाणी व फौजदारी याप्रकारच्या कार्यवाहीमध्ये ती त्या सोसायटीच्या नियामक मंडळाची मालमत्ता मानली जाऊ शकते.

**६) सोसायट्यांनी किंवा त्यांच्या विरूध्द दाखल करावयाचे दावे** – या अधिनियमान्वये नोंदणी केलेल्या सोसायटीचे नियम व विनियम यांद्वारे निश्चित करण्यात आले अध्यक्ष, कार्याध्यक्ष किंवा मुख्य कार्यवाह किंवा विश्वस्त यांच्या नावाने करावयाचे दावे. आणि असे निश्चित केले नसल्यास, नियामक मंडळाकडून त्या प्रसंगापुरते जो नियुक्त करण्यात येईल अशा व्यक्तीच्या नावाने त्या सोसायटीला दावा लावता येईल किंवा त्या सोसायटीच्याविरूध्द दावा लावता येईल.

**७) दावे अवसान न पावणे –** कोणत्याही न्यायालयात दाव्याची कार्यवाही चालू असताना तो दावा जिच्या विरूध्द दाखल केला आहे. अशी व्यक्ती मृत्यू पावल्या नंतर किंवा ज्या पदावर ज्या पदाच्या विरूध्द दावा लावला असेल ती व्यक्ती त्या पदावर राहत नसल्यामुळे असा दावा बंद पडणार नाही तर असा दावा उत्तराधिकारच्या नावाने चालू ठेवण्यात येईल.

**८) न्यायनिर्णयाची बजावणी सोसायटी विरूध्द करणे** – सोसायटीने निश्चित केलेल्या व्यक्तीच्या किंवा अधिकाऱ्याच्या विरूध्द न्यायालयाने निश्चित केलेली रक्कम त्यांच्याकडून वसूल न करता सोसायटी कडून वसूल केली जाईल.

**९) उपविधी अन्वये लागू होणाऱ्या दंडाची वसुली** – सोसायटीच्या कोणत्याही नियमाच्या भंगाबद्दल कोणत्याही द्रव्य दंड आकारण्यात येईल की जो देणे शक्य आहे.

**१०) सदस्य हे तिराहीत व्यक्ती म्हणून दावा लावला जाण्यास पात्र** – सोसायटीच्या सदस्याने वर्गणीची रक्कम भरली नसेल किंवा थकवली असेल अशा सदस्या विरूध्द दावा दाखल करता येईल. तसेच जो सदस्य सोसायटीची कसलीही मालमत्ता स्वत: जवळ बाळगेल, नष्ट करेल किंवा हानी पोहचवेल अशा सदस्या विरूध्द ही दावा दाखल करता येईल.

**११) अपराधांबद्दल दोषी असणारे सदस्य तिराहीत व्यक्ती प्रमाणे शिक्षा होण्यास प्राप्त** – सोसायटीचा जो सदस्य सोसायटीचा पैसा किंवा मालमत्ता, चोरील, हडप करील, अफरातफर करील किंवा जाणीवपूर्वक मालमत्ता नष्ट करील या व अशा अपराधाच्या संबंधात तिच्यावर खटला भरून शिक्षेस पात्र होईल.

**१२) नावातील बदलाची नोंदणी** – सोसायटीच्या नावात बदल करण्याबाबत चा प्रस्ताव कलम १२ द्वारे निबंधकाकडे पाठवता येईल. परंतु कलम ३ क अन्वये प्रस्ताव सदर केला असेल निबंधक नावातील बदलाची नोंदणी करण्याचे नाकारू शकतो. सोसायटीच्या नावातील बदलामुळे सोसायटीच्या हक्कावर परिणाम होणार नाही. किंवा सोसायटीविरूध्द केलेली कोणतीही कारवाई सदोष ठरणार नाही. त्याचबरोबर अधिनियम १९५० च्या अन्वये कामकाजाची व्यवस्था जाच्याकडे सोपविण्यात आलेली आहे. त्याने रीतसर हिशोब ठेवावे लागतील. तसेच निबंधकाने दिलेल्या नमुन्यात, मार्च महिन्याच्या ३१ तारखेस आणि दरवर्षी सनदी लेखाकार अधिनियम १९४९ च्या अन्वये हिशोबांची लेखापरीक्षा करता येईल.

**१३) सोसायट्यांचे विसर्जन करणे व त्यांचा कारभार निस्तरणे** – कोणत्याही सोसायटीच्या किमान तीन– पंचमांश सदस्यांना सोसायटी विसर्जित करता येईल. त्याचबरोबर सोसायटीच्या नियमानुसार मालमत्तेची विल्हेवाट करण्यासाठी आवश्यक ती सर्व उपाय योजना करता येईल. परंतु सोसायटी विसर्जित करण्यासाठी बोलवण्यात आलेल्या सर्व साधारण सभेमध्ये तीन – पंचमांश सदस्यांनी सोसायटी विसर्जन करण्याची इच्छा व्यक्त केल्या

शिवाय सोसायटी विसर्जित करता येणार नाही किंवा या अधिनियमान्वये नोंदणी केलेल्या कोणत्या सोसायटीस शासनाच्या संमती शिवाय सोसायटी विसर्जित करता येणार नाही.

**१४) सदस्याची व्याख्या व निरस्त सदस्य** - सोसायटीचा सदस्य म्हणजे ''ज्या व्यक्तीला सोसायटीचे नियम व विनियम यानुसार प्रवेश देण्यात आलेला असून, जिने सोसायटीची वर्गणी भरलेली असेल अथवा सदस्यांच्या पदावर किंवा यादीवर सही केलेली असेल व तसेच जिने अद्याप सोसायटीचे नियम व विनियम यानुसार राजीनामा दिलेला नसेल अशी व्यक्ती होय''

**१५) नियामक मंडळ याची व्याख्या** - नियामक मंडळ म्हणजे नियामक, परिषद, समिती, संचालक, विश्वस्त व ज्याच्याकडे सोसायटीचे नियम व विनियम यानुसार सोसायटीच्या कारभाराचे व्यवस्थापनाचे काम सोपवले असेल अशी व्यक्ती होय.

**१६) अधिनियमापूर्वी बनवण्यात आलेल्या सोसायट्यांची नोंदणी** - साहित्यिक, वैज्ञानिक किंवा धर्मादाय प्रयोजनासांठी स्थापन केलेली आणि १८५० चा अधिनियम ४३ या अन्वये नोंदणी केलेली कोणतीही सोसायटी अथवा नोंदणी न केलेली अशी कोणतीही सोसायटी यानंतर केव्हाही या अधिनियमाखाली नोंदता येऊ शकेल. परंतु यासाठी सदस्यापैंकी तीन-पंचमांश इतक्या सदस्यांनी संमती देणे आवश्यक आहे.

**१७) दस्तऐवजांचे निरीक्षण** - कोणतीही व्यक्ती या कायद्याच्या आधारे निबंधकाकडे उपलब्ध असलेल्या दस्तऐवजांचे निरीक्षण करू शकेल. परंतु प्रत्येक निरीक्षणाच्या वेळी शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे निश्चित केलेली फी भरणे आवश्यक आहे.

**१८) कोणत्या सोसायट्यांना हा अधिनियम लागू होतो** - या कायद्यान्वये खालील प्रकारच्या सोसायट्यांची नोंदणी होऊ शकेल. यामध्ये धर्मादाय सोसायट्या सैनिकी अनाथ बालक निधी किंवा सोसायट्या, विज्ञान, साहित्य किंवा ललित कला यांच्या अभिवृध्दीसाठी, शिक्षण, उपयुक्त ज्ञानाचा प्रसार, राजकीय शिक्षणाचा प्रसार, ग्रंथालये किंवा वाचनालये, सार्वजनिक वस्तुसंग्रहालये, रंगचित्रे व इतर कलाकृती यासाठी स्थापन करण्यात आलेल्या सोसायट्यांचा समावेश होतो.

**परिशिष्ट**

**सोसायटीच्या नोंदणीसाठी आवश्यक कागदपत्रे सोसायटी नोंदणी कायदा, १८६०.**
**स्वतंत्रपणे स्कॅन पाहिजे (ओळख सोडून कार्ड)** 150 DPI **सह आणि काळा आणि गडद पार्श्वभूमीसह**

| **संस्था नोंदणी अधिनियम, १८६०अन्वये संस्था नोंदणी करिता खालीलप्रमाणे कागदपत्र आवश्यक आहे.** | |
|---|---|
| **Societies Registration Act, 1860**<br>**संस्था नोंदणी अधिनियम, १८६०** | |
| १ अग्रेषण पत्र | परिशिष्ट 'अ' |
| २ ज्ञापन | परिशिष्ट 'ब' |
| ३ नियम आणि नियमावली | परिशिष्ट 'क' |

| | |
|---|---|
| ४ संमती पत्र, १८६० | परिशिष्ट 'ड' |
| ५ अधिकार पत्र | परिशिष्ट 'ई' |
| ६ स्वंयघोषणापत्र | प्रपत्र - अ |
| ७ परिशिष्ट १,२, व ६ | |
| ८ ठरावाची प्रत | |
| ९ कार्यालयाचे पत्याबाबत ना हरकत प्रमाणपत्र | |
| १० कार्यालयाचे पत्त्याबाबत पुरावा | |
| ११ सर्व सदस्यांचे ओळखपत्र | |

**A List of Documents to establish identity of members for Welfare societies/Trust (NGO)**

1. Aadhar Card
2. PAN Card
3. Voter Identity Card
4. Sr. Citizen ID
5. Passport up-to valid dtd
6. Driving license up-to valid dtd.

(Above anyone every persons. Two set xerox copies on self attested each one.)

**B List of Documents to establish address proof of Welfare societies/Trust (NGO)**

7. The Latest electricity bill & pan card individual name of anyone person for office address. Two set Xerox copies on self attested.

**C List of other Documents for registration of Welfare Societies/Trust (NGO)**

8. Application one passport size original photo.
9. List of e-mails , mobile numbers, occupation.

## १.३ सारांश

प्रस्तुत प्रकरणामध्ये आपण सर्वप्रथम बिगर शासकीय संघटनांची संकल्पना, स्वरूप अभ्यासले. त्यानंतर ऐच्छिक संघटनेची संकल्पना अभ्यासली तसेच समुदाय संघटनेची संकल्पना अभ्यासली त्यानंतर आपण भारतातील ऐच्छिक संघटनांची वाढ कशी होत गेली हे सविस्तरपणे आपण या प्रकरणामध्ये अभ्यासले आहे.

ज्या संस्था धर्मादाय स्वरूपाच्या असतील अशा सर्व संस्थाना मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० प्रमाणे सक्तीने नोंदणी करून घ्यावी लागेल. ज्या संस्था नोंदणी अधिनियम, १८६० अन्वये नोंदविलेल्या असतात व त्या संस्था सार्वजनिक न्यासाकडे नोंदविल्या जातात अशा सर्व संस्था व त्यांची प्रकरणे मा. धर्मादाय आयुक्तापासून सहाय्यक आयुक्ता पर्यंत चालविली जातात. परंतु या मध्ये १८६० च्या तरतुदी पूर्ण पणे दुर्लक्षित होत असतात पर्यायाने संस्था नोंदणी अधिनियम, १८६० हा केंद्रिय अधिनियम असून तो राज्यशासनावर व जनतेवर बंधनकारक असतो.

थोडक्यात, ज्या संस्था, संस्था नोंदणी अधिनियम, १८६० अन्वये नोंदविल्या नंतर अशा संस्थाच मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० प्रमाणे नोंदविल्या जाणे गरजेचे आहे. ज्यामुळे अशा सर्व संस्थांची प्रकरणे व चौकशी संस्था नोंदणी अधिनियम, १८६० मधील तरतुदींना प्राध्यान देऊन आवश्यक तेथे मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५०चा अवलंब करणे गरजेचे आहे. तरच या संस्था नोंदणी अधिनियम, १८६०चा योग्य तो वापर होऊन सोसायटी व समाजाला त्याचा फायदा होईल.

## १.४ सरावासाठी प्रश्न

बिगर शासकीय संघटना आणि भारतातील ऐच्छिक संघटनांचे कार्य समजून घेण्यासाठी आपल्या भागामध्ये असणाऱ्या स्वयंसेवी संघटनेस भेट देऊन त्या संघटनेची कार्यप्रणाली समजून घेणे.

**अ) रिकाम्या जागा भरा.**

१. ऐच्छिक संघटना या ........... चा समूह असतात.

२. ऐच्छिक संघटना या .................. संघटना असतात.

३. ऐच्छिक संघटना ........... असतात.

४. ऐच्छिक संघटनांचे सदस्यत्व हे ............. असते.

५. भारतामध्ये सर्वप्रथम धार्मिक व सामाजिक सुधारणेचा पाया ......... त्यांनी घातला.

६. ब्राम्हो समाजाची संघटना .......... यांनी स्थापन केली.

७. ब्राम्हो समाजाची स्थापना ........... साली झाली.

८. आर्य समाजाची स्थापना ........ साली झाली.

९. रामकृष्ण मिशनची स्थापना ......... साली झाली.

१०. महात्मा फुले यांनी मुलींची पहिली शाळा ............. साली सुरू केली.

११. भारतातील पहिली स्वयंसेवी संघटना ...... ही होय.

**ब) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. एन. जी. ओ. चे पूर्ण रूप लिहा.

२. समुदाय संघटनांना सामान्यपणे सर्वत्र कोणत्या नावाने संबोधले जाते.

३. समुदाय संघटनांचा उदय हा कोठे झाला.

४. समुदाय संघटनांना काय संबोधिले जाते.

५. आर्य समाजाची स्थापना कोणी केली.

६. भारतीय स्वयंसेवी संघटनेच्या इतिहासातील अत्यंत महत्त्वपूर्ण घटना कोणती.

७. बी. टी. लावणी यांच्या पुस्तकाचे नाव लिहा.

८. संस्था अधिनियम केंव्हा पारित करण्यात आला?

**क) टिपा लिहा.**

१. स्वयंसेवी संघटनांचे प्रकार.

२. स्वयंसेवी संघटना.

**ड) दीर्घोतरी प्रश्न.**

१. स्वयंसेवी संघटना म्हणजे काय सांगून स्वयंसेवी संघटनेची संकल्पना स्पष्ट करा.

२. ऐच्छिक संघटना म्हणजे काय सांगून ऐच्छिक संघटनेची संकल्पना स्पष्ट करा.

३. समुदाय संघटनेची संकल्पना स्पष्ट करा.

४. भारतातील स्वयंसेवी संघटनांची ऐतिहासिक वाढ स्पष्ट करा.

**सरावासाठी प्रश्नांची उत्तरे**

**अ) रिकाम्या जागा भरा.**

१. लोकांचा

२. नोंदणीकृत किंवा अनोंदणीकृत

३. अनौपचारिक

४. पूर्णत: ऐच्छिक

५. राजा राममोहन रॉय

६. राजा राममोहन रॉय

७. १८२८

८. १८७५

९. १८९६

१०. १८४८

११. Friend-in-Need-Society

**ब) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. Non-Governmental Organization

२. Community Based Organization

३. विकसनशील देशांमध्ये

४. Bottom-up-Organizations

५. स्वामी दयानंद सरस्वती

६. १८६० साली झालेला Societies Regulation Act

७. NGOs in Development

## १.८ अधिक वाचनासाठी पुस्तके


१. डॉ. डी. एन. धनागरे – संकल्पनांचे विश्व आणि सामाजिक वास्तव.

२. S. N. Pawar, J. B. Ambekar and D. Shrikant - NGOs and Development, The Indian Scenario.

३. R. Sooryamoorthy and K. D. Gangarde - NGOs in India, A Cross Sectional Study.

४. B. T. Lawani - NGOs in Development.

५. संस्था नोंदणी अधिनियम, १८६०, श्री. वा. दातार. चौधरी लॉ पब्लिशर्स, जळगाव.

६. सोसायटी नोंदणी अधिनियम, १८६०, महाराष्ट्र विशोधनांसहित, १ जून, १९९३ संचालक, मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र शासन यांनी भारत सरकारच्या वतीने मुद्रित व प्रकाशित केले १९९४

३. The Societies Registration Act, 1860-Published, Amit Nanda, Current Publications, Marine Line (Mumbai

4. The Socieeties Registration Act 1860 By B. R. Kale संस्था नोंदणी अधिनियम १८६० Aurangabad Maharashtra.


❑❑❑

# घटक : २

# प्रकल्प आणि कार्यक्रम व्यवस्थापन

## (Projects and Programmes Management)

**अनुक्रमणिका :**


२.० उद्दिष्ट्ये

२.१ प्रस्तावना

२.२ विषय विवेचन

  २.२.१ प्रकल्प व्यवस्थापणाचे स्वरूप व संकल्पना

  २.२.२ प्रकल्प प्रस्तावाची तयारी

  २.२.३ प्रकल्प व कार्यक्रमाची अंमलबजावणी

  २.२.४ प्रकल्प निरीक्षण, पर्यवेक्षण आणि मुल्यमापन

२.३ सारांश

२.४ स्वंय अध्ययन प्रश्नांची उत्तरे

२.५ सरावासाठी प्रश्न

२.६ चिंतन आणि कार्य

२.७ अधिक वाचनासाठी पुस्तके


### २.० उद्दिष्ट्ये (Objectives)

या घटकाचा अभ्यास केल्यानंतर तुम्हाला

१. प्रकल्प व्यवस्थापन म्हणजे काय समजेल.

२. प्रकल्प व्यवस्थापनाचे स्वरूप व संकल्पना समजेल.

३. प्रकल्पाच्या प्रस्तावाची तयारी कशी असेत ते समजेल.

४. प्रकल्पाची अंमलबजावणी कशी केली जाते ते समजेल.

५. प्रकल्पावर सतत लक्ष ठेवणे, त्याची पाहणी करणे व त्याचे मुल्यमापन करणे या सर्व बाबी समजतील.

## २.१ प्रस्तावना

सर्वसाधारणपणे 'प्रकल्प' या संज्ञेला फार मोठा अर्थ आहे. प्रकल्प म्हणजे वेगवेगळ्या कृतींचा संच असतो उदा. एखाद्या घराचे बांधकाम करणे म्हणजे प्रकल्प होय. पण घराच्या बांधकामासाठी बऱ्याच गोष्टी अंतर्भूत असतात ते म्हणजे पाया खोदणे, पाया भरणी, भींती बांधणे, छप्पर बांधणे, दरवाजे व खिडक्या बसवणे इत्यादी. अशा प्रकारे घराचे बांधकाम करणे म्हणजे बऱ्याच कृतींचा संच असतो. प्रकल्प पूर्ण होण्यासाठी महत्त्वाच्या गोष्टी म्हणजे, माणसे, साधने, वेळ व पैसा प्रकल्प करण्यासाठी साधने मर्यादित असायला हवीत. प्रकल्प म्हणजे असे संघटन की जे उद्दिष्ट पूर्तीच्या दिशेने जात असते. प्रकल्पाच्या संदर्भात भाष्य करताना हॅरिसन असे म्हणतात. प्रकल्प म्हणजे नियमिततेचा भाग आहे, त्यासोबतच तो पुन्हा पुन्हा केला जाणारा आहे म्हणजेच एखादी गोष्ट करण्यासाठी त्याचे योग्य व्यवस्थापन असल्यास त्यामध्ये चूका होत नाहीत व प्रकल्प पूर्ण होण्याच्या दिशेला गती मिळते. प्रकल्पाच्या संदर्भात, प्रकल्प व्यवस्थापन संस्था (यु.एस.ए.) यांचे असे मत आहे की, प्रकल्प ही एक व्यवस्था आहे की ज्यामध्ये वेगवेगळ्या विभागांचा सहभाग असतो हे सर्व विभाग प्रकल्प योग्य दिलेल्या वेळेमध्ये पूर्ण करण्यासाठी सतत प्रयत्नशील असतात. प्रकल्प व्यवस्थापनाच्या संदर्भात व्यवस्थापनाच्या विश्वकोषामध्ये (Encyclopedia of Management) अशी व्याख्या केली आहे की, 'प्रकल्प हा एक संघटीत घटक आहे की जे ध्येय पूर्तीच्या दिशेने जात असते. व्यवस्थापनामध्ये या सर्व गोष्टी पार पाडत असताना प्रकल्पाच्या प्रस्तावाची तयारी योग्य पद्धतीने करणे गरजेचे आहे, एखाद्या प्रकल्पाच्या प्रस्तावाची तयारी उत्तमरित्या केली असेल तर तो प्रस्ताव सहजासहजी मान्य होत असतो. थोडक्यात प्रस्ताव म्हणजे प्रकल्पासाठी आर्थिक सहकार्याची मागणी होय. एखाद्या प्रकल्पाचा प्रस्ताव फक्त मान्य होणे म्हणजे यश नव्हे तर त्या प्रकल्पाची योग्य प्रकारे अंमलबजावणी करणे अत्यंत महत्त्वाचे आहे, इतक्या गोष्टींची पूर्ती झाल्यानंतर पूर्ण झालेल्या प्रकल्पाचे मुल्यमापन, पाहाणी, त्याची देखरेख इ. गोष्टी महत्त्वाच्या मानल्या जातात. या सर्व बाबींची पाहाणी या प्रकरणामध्ये केली जाणार आहे.

## २.२ विषय विवेचन (Presentation of Subject Matter)

आधुनिक युगामध्ये प्रत्येक क्षेत्रामध्ये असणारी ध्येये व ती पूर्ण करण्यासाठी असणारे व्यवस्थापन अत्यंत महत्त्वाचे असते. प्रकल्प आणि कार्यक्रम व्यवस्थापनामध्ये त्याचे स्वरूप व संकल्पना, प्रकल्पासाठी प्रस्ताव तयार करून अर्थसहाय्य मिळवणे व उद्दिष्टांच्या दिशेने जात असताना प्रकल्पाची अंमलबजावणी योग्य पद्धतीने करणे अत्यंत महत्त्वाचे असते, हाती घेतलेला प्रकल्प पूर्ण करणे म्हणजे अंतीम कार्य नव्हे तर त्याची सतत देखभाल करणे, त्याचे योग्य मुल्यमापन करणे. या बाबी सुद्धा अत्यंत महत्त्वाच्या आहेत. या सर्व गोष्टींची मांडणी या घटकामध्ये करण्यात आलेली आहे.

### २.२.१ प्रकल्प व्यवस्थापनाचे स्वरूप व संकल्पना

### (Nature and Concept of Project Management)

प्रकल्प व्यवस्थापनाचे स्वरूप व संकल्पना पाहत असताना एक गोष्ट लक्षात येते ती म्हणजे 'प्रकल्प' या संज्ञेला फार मोठा अर्थ आहे. अनेक केल्या जाणाऱ्या कृतींचा संच प्रकल्प असतो. उदा. एखादे घर

बनवणे, एखादी मोटार बनवणे, आणखीन कोणतीही वस्तू जर बनवायची असेल तर यामध्ये व्यवस्थापन लावणे अत्यंत महत्त्वाचे आहे, व्यवस्थापन का महत्त्वाचे आहे कारण ध्येय पूर्तीच्या दिशेने कमी वेळेत पोहोचायचे असेल तर व्यवस्थापन करणे महत्त्वाचे आहे, यामध्ये वेळ, पैसा आणि योग्य मनुष्यबळ अत्यंत महत्त्वाचे मानले गेले आहे या मध्ये एखादी गोष्ट महत्त्वाची नाही तर, सर्व बाबी अत्यंत महत्त्वाच्या आहेत. कारण प्रकल्प म्हणजे अनेक प्रकारच्या कृतींचा संच आहे. 'प्रकल्प म्हणजे सर्व गोष्टीचे व्यवस्थापन करण्याची एक कला आहे आणि यामध्ये शास्त्रीय रचनात्मक गोष्टींच्या पद्धतीचा वापर करणे महत्त्वाचे आहे' प्रकल्प ही संकल्पना कोणत्याही प्रकारच्या परिश्रमाची व्याख्या करण्यासाठी वापरली जाऊ शकते. मग तो प्रकल्प तात्पुरता स्वरूपाचा सुद्धा किंवा त्याची सुरूवात व त्याचा शेवट देखील असू शकतो. प्रकल्प असा असावा की त्या प्रकल्पाच्या माध्यमातून कांहीतरी विशेष निर्माण व्हायला हवे मग ती एखादी वस्तू असेल, सेवा असेल व हे सर्व प्रगतीच्या दिशेने पुढे जायला हवे. व्याख्येमध्ये नमूद केल्या प्रमाणे प्रत्येक कार्याचा समावेश प्रकल्पामध्ये होऊ शकत नाही. विशिष्ट उद्दिष्ट समोर ठेवून ते पूर्ण करण्याच्या दिशेने केले जाणारे प्रयत्न म्हणजे प्रकल्प होय. प्रकल्प असे कांहीतरी अद्वितीय वस्तू, सेवा किंवा उत्पत्ती करत असते. वर नमुद केल्याप्रमाणे प्रत्येक कामाचा समावेश प्रकल्पामध्ये केला जाऊ शकत नाही. एकंदरीतच वर नमूद केलेल्या प्रकल्पाच्या व्याख्येवरून एखाद्याला प्रकल्प म्हणजे काय कळेल.

प्रकल्प व्यवस्थापन म्हणजे असा विभाग की जिथे प्रकल्प व्यवस्थापनाच्या सर्व गोष्टी केंद्रित असतात. प्रकल्पाच्या प्रगतीची माहिती अधिकाऱ्याला पुरविल्यामुळे प्रकल्प व्यवस्थापन सेवा सुरळीत चालते.

प्रकल्प व्यवस्थापन अधिकाऱ्याची (PMO) भूमिका म्हणजे प्रकल्प हे आर्थिक दृष्ट्या तडीस जातील याची खात्री करून घेणे व आर्थिक दृष्ट्या प्राप्त करून घेण्यासाठी प्रकल्पाच्या बाबतीत जागृत करणे म्हणजे प्रकल्पाच्या बाबतीत आर्थिक मुद्दा फार महत्त्वाचा आहे. तसेच प्रकल्पाच्या संदर्भात एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे प्रकल्प व्यवस्थापन अधिकारी हा बिलांच्या व इतर प्रकल्पांशी संबंधीत गोष्टीवर बोट ठेऊ शकतो म्हणजेच त्याला प्रकल्प व्यवस्थापनामध्ये सर्वच अधिकार असतात. अशा प्रकारे प्रकल्प व्यवस्थापन अधिकाऱ्याचे कर्तव्य हे त्याच्या अधिपत्याखाली येणाऱ्या प्रकल्पांचे देखरेख करणे व त्यांच्यासाठी एजंटासारखे काम करणे. अलीकडच्या प्रवाहामध्ये प्रकल्पाच्या यशस्वीतेसाठी योग्य दृष्टी असणाऱ्या प्रतिनिधीची गरज आहे आणि प्रतिनिधीत्व मुख्य माहिती अधिकाऱ्याच्या साहाय्याने असायला हवे, सोबतच तांत्रिक प्रतिनिधित्व असायला हवे.

प्रकल्प व्यवस्थापन अधिकाऱ्याने अशा गोष्टीची खात्री करणे गरजेचे असते की, प्रकल्पाची सर्व उद्दिष्ट्ये प्रकल्पामध्ये कार्यरत असलेल्या सर्व व्यक्तिंच्या सहभागाशिवाय प्राप्त करता येऊ शकत नाहीत आणि यासाठी प्रकल्प व्यवस्थापन अधिकाऱ्याने सर्वोतोपरी प्रयत्न करणे गरजेचे असते. प्रकल्पामध्ये सहभागी असणाऱ्या सर्व सदस्यांची नकारात्मकता दूर करून त्यांच्यामध्ये सकारात्मक भावना तयार करणे व प्रकल्प पूर्तीच्या दिशेने पुढे जाण्याची मानसिकता बनवणे आवश्यक असते. या सर्व गोष्टी विचारात घेतल्यास असे जाणवते की प्रकल्प अधिकारी हा एक उत्तम नेतृत्व करणारा असायला हवा.

अलीकडच्या प्रवाहामध्ये मानवनिर्मित प्रकल्प ही कांही नवी संकल्पना नाही, पण नवीन संकल्पना तयार करून प्रकल्प राबवणे ही गोष्ट अधिकाऱ्यांसाठी फार आव्हानात्मक आहे, कारण वाढती स्पर्धा, नवीन तंत्रज्ञान, नवे औद्योगिक धोरण, आर्थिकतेचा ताण या सर्व बाबी विचारात घेतल्यास उत्तम प्रकारे कौशल्यपूर्वक काम करणे म्हणजे प्रकल्प पूर्ण यशस्वी करण्याच्या दिशेने वाटचाल असते.

सर्व प्रकल्पामध्ये एक समान वैशिष्ट्य असते, ते म्हणजे कल्पनामधून पुढे येणारी गोष्ट आणि कृती या नवीन स्वरूपाचे प्रयत्न असतात. सतत उपस्थित असणारे धोक्याचे घटक व अनिश्चित साधने ही प्रकल्प यशस्वीतेमध्ये अडथळे निर्माण करत असतात. अशा गोष्टीमुळे फार गुंतागुंतीचे व आधुनिक प्रकल्प यशस्वीपणे पूर्ण होतील याची शंका निर्माण होते. प्रकल्प व्यवस्थापनाचा उद्देश हा असतो की, प्रकल्प राबवत असताना निर्माण होणारे अडथळे आणि धोके यांचे भाकित करणे आणि ते अडथळे व धोके निर्माण होऊ नयेत यासाठी योग्य नियोजन व्यवस्थापन, कृतींचे नियंत्रण या सर्व गोष्टी प्रकल्प यशस्वीपणे पार पाडण्यासाठी मदत करत असतात. प्रकल्प व्यवस्थापनाचे यश म्हणजे ज्या उद्दिष्ट पूर्तीसाठी निर्माण केले आहे ते उद्दिष्ट लवकरात लवकर गाठणे. प्रकल्पामध्ये समाविष्ट असणारी साधने आणि क्रिया याच्या वापराचे नियोजन व नियंत्रण सहाजिकच होणे आवश्यक आहे. म्हणून प्रकल्प व्यवस्थापकाने हे समजून घेणे गरजेचे आहे की, वेगवेगळे सहभागी लोक कशापद्धतीने प्रकल्प हाताळतात व त्यांच्या कौशल्याचे कौतुक करणे, त्यांच्या कामाच्या पद्धती समस्या या सर्व गोष्टी जाणून घेणे आवश्यक असते.

### २.२.२ प्रकल्प प्रस्तावाची तयारी (Preparation of Project Proposal)

प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी आर्थिक सहकार्याची मागणी करणे म्हणजे प्रस्ताव असतो. प्रकल्प प्रस्ताव अनेक बाह्यरेखा निर्माण करत असतो जसे की, प्रकल्पाविषयीचे नियोजन, प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी उद्देशाला अनुसरून अधिक माहिती प्राप्त करून देणे, ज्याद्वारे व्यवस्था करणे आणि योग्य मार्ग प्राप्त होतो. खालील मार्गदर्शक तत्वे प्रकल्प प्रस्ताव तयार करण्यासाठी उपयुक्त ठरू शकतात.

प्रकल्प प्रस्ताव म्हणजे वेगवेगळ्या प्रकारच्या समस्या सोडवण्यासाठी निर्माण करण्यात आलेली संपूर्ण वर्णन माला होय.

- संशोधन कल्पनांची तर्कशुद्धता पुरवणे.
- कल्पनेचे महत्त्व स्पष्ट करणे.
- पाठीमागील कृतीशी कल्पनांच्या संबंध दर्शवणे.
- प्रस्तापित प्रकल्पासाठी क्रियाकल्पांची मांडणी करणे.

प्रकल्प प्रक्रियेच्या आराखड्यामध्ये दोन घटकांचा समावेश असतो, हे दोन्हीही सारख्या पद्धतीने महत्त्वाचे असतात आणि उत्तम प्रकारे प्रस्ताव तयार करण्यासाठी अती महत्त्वाचे असतात ते म्हणजे –

- प्रकल्प नियोजन (प्रकल्प घटकांची स्वच्छ मांडणी)
- प्रस्तावाचे लिखाण (नियोजनाचे रूपांतर प्रकल्पाच्या दस्तऐवजामध्ये करणे)

**प्रकल्प प्रस्ताव**

**१) उद्देशाच्या माध्यमातून प्रस्ताव**

प्रस्ताव तयार करत असताना पहिली पायरी म्हणजे समस्या काय आहे हे निश्चित केले पाहिजे आणि त्यानुसार एक कच्चा आराखडा तयार करून ही समस्या कशी सोडवली जाऊ शकते याचा विचार करणे महत्त्वाचे असते. हाच उद्देश कालांतराने कल्पनेमध्ये रूपांतरीत होऊ शकतो, की जिथे विशिष्ट प्रल्पाचा प्रस्ताव तयार केला जाऊ शकतो.

प्रस्ताव तयार करत असताना तर्कशुद्ध चौकट कल्पनांची रचना करण्यासाठी योग्य पद्धतीने मदत करू शकते, त्याच्या ही पुढे ही तर्कशुद्ध चौकट प्रस्तावाचा उद्देश स्पष्ट मांडू शकते. त्याचे फायदे काय आहेत ते दाखवू शकते, त्याची साधने, क्रियाकल्प, किमंत आणि पद्धतीच्या माध्यमातून निरिक्षण व मुल्यमापन या गोष्टी प्रकल्प प्रस्तावाच्या तयारीसाठी मुलाधार असतात.

**कुवतीच्या निधी पर्यायांची ओळख**

अत्यंत महत्त्वाची गोष्ट म्हणजे निधी मिळवण्यासाठी कोणकोणते मार्ग उपलब्ध आहेत याचा शोध घेणे. उदा. शासनाच्या माध्यमातून, अंतरराष्ट्रीय सहकार्य संस्था, अंतरराष्ट्रीय बिगर शासकीय संस्था आणि खाजगी संस्था इ.

**प्रकल्प प्रस्ताव संघ तयार करणे**

प्रकल्पाचे नेतृत्व करणारी व्यक्ती प्रस्ताव कशा पद्धतीने कार्यक्षम तयार करता येईल याची खंत असणारी असायला हवी आणि मगच प्रस्ताव पुढे घेऊन जाणे सोपे होते. प्रतिनिधीत्व करणारी व्यक्ती पुढे जाऊन पूर्णपणे प्रस्तावाच्या विकासासाठी जबाबदार असते. ही जबाबदार व्यक्ती निधी मिळवून देणाऱ्या संस्थांशी संभाषण करून योग्य प्रकारे निधी उपलब्ध करून घेऊन त्याची पुढील वाटचाल सकारात्मक पद्धतीने पुढे नेण्याची ग्वाही ही जबाबदार व्यक्ती देऊ शकते. नेतृत्व करणारी व्यक्ती संघामध्ये समाविष्ट असणाऱ्या प्रत्येक व्यक्तिला समान महत्त्व देणारी असणे महत्त्वाचे असते. घडणाऱ्या आणि सिद्ध होणाऱ्या प्रत्येक गोष्टी सर्वांना सूचित करणे महत्त्वाचे असते. तांत्रिक ज्ञान अधिक असणारी व्यक्ती संघामध्ये असणे आवश्यक असते. वित्त विभागाच्या सहकार्याने अंदाजपत्रक संकलीत केल्यास समजून घेण्यास साधे सोपे होऊ शकते.

**प्रकल्प प्रस्तावाचे प्रस्तावित स्वरूप (Proposal Format for Project Proposal)**

प्रस्तावाचे पूर्ण स्वरूप तयार असण्याचे विभाग खालील प्रमाणे.

**१) शीर्षक पान (Title Page)**

तीन किंवा चार पानापेक्षा अधिक शीर्षक पाने प्रस्तावामध्ये असायला हवे. शिर्षक पानावर प्रकल्पाचे शिर्षक असायला हवे, त्यामध्ये ज्या संस्थेच्या माध्यमातून प्रकल्प राबवला जाणार आहे त्याचे नाव, संयुक्त संस्थेचे नाव, तारीख, ठिकाण, देणगी दाराचे नाव, कोणाकडून प्रस्ताव मंजुर करण्यात आलेला आहे इ. गोष्टी असणे आवश्यक आहे.

### २) प्रकल्पाचे शिर्षक (Project Title)

प्रकल्पाचे शिर्षक कमी शब्दामध्ये केलेले असावे. जेणेकरून शिर्षकामधून अर्थबोध होणे आवश्यक आहे. अती लांब असणारे शिर्षक वाचकांना गोंधळात टाकणारे व अर्थबोध न होणारे असते. मोजक्या शब्दामध्ये तयार केलेले शिर्षक हे आतील मतीतार्थ जाणून घेण्यास सहज सोपे असते.

### ३) सारांश (Executive Summary / Abstract)

बऱ्याच वेळी अनेक वाचकांना संपूर्ण प्रकल्प प्रस्ताव वाचणे वेळेअभावी अशक्य असते, म्हणून कमी वेळेत समजून घेण्यायोग्य प्रकल्पाचा प्रस्ताव कमी शब्दामध्ये सारांश रूपाने मांडणे आवश्यक असते. सारांश मध्ये समस्येचे सूत्रण, प्रकल्पाची उद्दिष्ट्ये, प्रकल्प आमंलात आणणाऱ्या संस्था, प्रकल्पाची मुख्य कार्ये आणि संभाव्य प्रकल्पाचा एकूण अर्थसंकल्प असायला हवा. छोट्या प्रकल्पाचा प्रस्ताव हा दहा ओळीपेक्षा अधिक असावा आणि मोठ्या प्रकल्पाचा प्रस्ताव हा जास्त करून दोन पाना इतका असावा.

### ४) संदर्भ (Context)

प्रकल्पाचा संदर्भ हा भाग सामाजिक, आर्थिक आणि राजकीय पार्श्वभूमी स्पष्ट करतो की जेंव्हा या प्रकल्पाची सुरूवात झालेली असते. यामध्ये प्रकल्पाची आखणी ज्या ठिकाणाहून करण्यात आलेली आहे त्या ठिकाणची सर्व माहिती मिळण्याची शक्यता असते.

### ५) प्रकल्प समर्थन (Project Information)

प्रकल्पासाठीचा युक्तिवाद प्रकल्प समर्थनाच्या माध्यमातून पुरविला जाऊ शकतो. अशा गोष्टीमुळे हा विभाग चार प्रभागामध्ये विभागला गेला आहे.

### अ) समस्या विधान (Problem Statement)

समस्या विधान विशिष्ट अशा समस्येचे वर्णन करते की जिथे प्रकल्पाच्या माध्यमातून सोडवले जाऊ शकते आणि यालाच क्रमपद्धतीने समस्या एक घटना मानली जाते. पुढे जाऊन प्रकल्प प्रस्ताव असे शोध घेतो की एखादी घटना समाजासाठी समस्या का बनली आहे, त्या पाठीमागची कारणे शोधण्याचा प्रयत्न केला जातो. तसेच एखाद्या लक्ष गटावर (target group) नकारात्मक गोष्टी कशा परिणाम करतात हे पाहाणे महत्त्वाचे असते.

### ब) गरजांचे प्राधान्य (Priority of needs)

लक्ष समुहाच्या (Target group) गरजा ज्या नकारात्मक स्वरूपामध्ये निर्माण झाल्या आहेत, त्या समस्या सोडवण्यासाठी प्राधान्य देण्यात यावे, या नकारात्मक स्वरूपातील निर्णय लक्ष समुहापर्यंत कशा पद्धतीने पोहोचल्या याचे स्पष्टीकरण व्हायला हवे.

### क) प्रस्तावित दृष्टिकोण (The Proposal Approach)

समस्या सोडवण्यासाठी प्रकल्प प्रस्तावामध्ये ज्या क्लुप्त्या (strategy) वापरण्यात आल्या आहेत त्यांचे वर्णन करण्यात यावे आणि त्या क्लुप्त्या पुढे पूर्णत्वाच्या दिशेने जाण्यासाठी महत्त्वाची आहे हे नमुद

करावे.

**अंमलबजावणी करणारी संस्था (Implementing Organization)**

या घटकाच्या माध्यमातून तुम्हाला तुमच्या संस्थेच्या क्षमतांचे वर्णन करता येईल त्या सोबतच पाठीमागील कामाचा अहवाल मांडता किंवा वर्णन करता येईल. आपली संस्था एखादा प्रकल्प समाजाकरिता राबवण्यासाठी उपयुक्त कसा आहे, इतरांपेक्षा आपण कोणकोणत्या बाबीमध्ये सरस आहोत, कोणकोणत्या प्रकारच्या सुविधा आपण जनतेसाठी किंवा समुहासाठी देऊ शकतो. ज्या इतर संस्था आपल्या सोबत काम करू इच्छितात त्यांची देखील ठळक वैशिष्ट्ये मांडण्याचा प्रयत्न करा व त्यांची क्षमता देखील नमुद करण्याचा प्रयत्न महत्त्वाचा ठरेल.

**इ) प्रकल्पाचा उद्देश (Project Aims)**

एखादा प्रकल्प राबवत असताना त्याची उद्दिष्ट्ये ठळक पद्धतीने मांडणे महत्त्वाचे असते. प्रकल्प राबवत असताना त्या ठिकाणच्या समस्या कोणत्या आहेत व त्या समस्या सोडवण्यासाठी आपला प्रकल्प कसा महत्त्वाचा आहे हे पटवून देणे गरजेचे असते. त्यासोबतच अधिक कालावधीसाठी प्रकल्पाचे महत्त्व पटवून द्यावे व या प्रकल्पाचे उपभोक्ते आहेत त्यांना या प्रकल्पाचा उपभोग कसा करावयाचा व त्यातून उपभोगत्यांचे कल्याण कसे साधणार आहे याचे विश्लेषण प्रकल्प प्रस्तावामध्ये असणे आवश्यक आहे.

**६) लक्ष समूह (Target Group)**

लक्ष समुह म्हणजे काय त्याची व्याख्या स्पष्ट करा व त्या लक्ष समुहाला प्रकल्पापासून कसे व कोणत्या प्रकारचे फायदे मिळणार आहेत याची मांडणी करा. प्रकल्पाच्या माध्यमातून प्रस्तावामध्ये लक्ष समुहाची संख्या, त्यांची वैशिष्ट्ये आणि प्रत्यक्षात असणारे उपभोक्ते यांचा समावेश करणे आवश्यक आहे.

**७) प्रकल्प अंमलबजावणी (Project Implementation)**

प्रकल्प अंमलबजावणीच्या आराखड्यामध्ये करण्यात येणाऱ्या कार्याची व साधनांची मांडणी व वर्णन शक्य तेवढ्या प्रमाणात करणे आवश्यक आहे. प्रकल्पाची अंमलबजावणी कोण, कुठे करणार आहे त्याचे विहंगावलोकन (overview) मांडणे महत्त्वाचे आहे. अंमलबजावणीचा आराखडा दोन घटकांनमध्ये विभागला जावा एक म्हणजे कृती आराखडा व दुसरा म्हणजे साधन आराखडा (activity plan and resource plan) कृती आराखड्यामध्ये प्रकल्पाच्या नियोजित कामाची मांडणी व स्पष्टीकरण करण्यात यावे. प्रकल्पाचा कालावधी स्पष्टपणे प्रस्तावामध्ये नमूद करावा व तो पुर्ण माहितीसह सुरूवाती पासून शेवटपर्यंत कोणत्या पद्धतीने राबवला जाणार आहे याची मांडणी करावी. साधन आराखड्याच्या माध्यमातून प्रकल्प राबवण्यासाठी आवश्यक असणाऱ्या साधनांची माहिती द्यावी. प्रकल्प राबवण्यासाठी लागणारी साधने व त्यांच्या किंमतीचा समावेश आराखड्यामध्ये करण्यात यावा.

**८) अंदाजपत्रक (Budget)**

अंदाजपत्रकामध्ये संस्थेचे अपेक्षित उत्पन्न व ठराविक काळामधील खर्च क्रमवारी पद्धतीने सारांश रूपात मांडण्यात यावा.

**९) निरीक्षण व मूल्यमापन (Monitoring and Evaluation)**

प्रकल्प अंमलबजावणीची सूचना अंतिम निर्णयासाठी निर्माण केल्यानंतरच निरीक्षणाचा मुलाधार तयार करण्यात यावा, प्रकल्प व्यवस्थापन संघ कुठे व कशा प्रकारे आपले कार्यक्रम राबवणार आहे जेणेकरून प्रकल्प विकासासाठी या सर्व बाबी प्रकल्प प्रस्तावामध्ये नमूद कराव्यात तसेच यामध्ये प्रकल्पाच्या निरीक्षण व मुल्यमापनासाठी कोणती पद्धत व मूल्यमापन कोण करणार आहे या गोष्टी प्रकर्षाने नमूद कराव्यात.

**१०) अहवाल सादर करणे (Reporting)**

प्रकल्पाच्या प्रस्तावामध्ये कामाच्या गतीचे स्वरूप व आर्थिक अहवाल यांचे वेळापत्रक तयार करण्यात यावे. जरी ही कर्तव्ये सहाय्य करणाऱ्या संस्थेकडून ठरविण्यात आलेली असली तरी प्रकल्प अहवालाची वेगवेगळ्या आवृत्ती मध्ये जुळणी करण्यात यावी.

**११) व्यवस्थापन आणि वैयक्तिक (Management and Personnel)**

प्रकल्प प्रस्तावामध्ये सारांश रूपात प्रकल्प वर्णन व त्यामध्ये समाविष्ट असणाऱ्या प्रत्येकाची भूमिका आणि प्रकल्पामध्ये असणाऱ्या व्यक्तिमध्ये संपर्क यंत्रणा (Communication Mechanism) कशा प्रकारे अस्तित्वात आहे या सर्व बाबी नमूद करून अधिक माहिती अंतिम भागात परिशिष्टाच्या स्वरूपामध्ये जोडण्यात यावे.

### २.२.३ प्रकल्प व कार्यक्रम अंमलबजावणी

### (Implementation of Programme and Projects)

अंमलबजावणीचा अर्थ कामाच्या नियोजनामध्ये आखण्यात आलेल्या गोष्टी पार पाडणे होय. प्रकल्प अंमलबजावणी हा एक मुलाधार असतो की जिथे दृष्टी आणि नियोजन यांचे रूपांतर वास्तवामध्ये होत असते. एखाद्या प्रकल्पाची अंमलबजावणी करणे तसे गुंतागुंतीचे असते, त्यामुळे वेगवेगळ्या कामामधील समन्वय, विविध संस्थात्मक व्यवस्थापन व वेगवेगळ्या वेळांचे नियोजन आवश्यक मानले जाते. अमंलबजावणी करत असताना कामाचे स्वरूप रचनात्मक असायला हवे. समाजउपयोगी प्रकल्पाची अंमलबजावणी करत असताना वेगवेगळे मुद्दे मांडले जातात. उदा. सामाजिक विकास, आरोग्य, पर्यावरण संतुलन, संस्थात्मक ताकद / बळ, यांत्रिक अंमलबजावणी, सेवेची उपलब्धता आणि क्षमतेची उभारणी इत्यादी प्रकल्पाचे स्वरूप व त्याची व्याप्ती अंमलबजावणीच्या काळात विचारात घेणे महत्त्वाचे आहे. प्रकल्प प्रस्तावामध्ये नमूद केलेल्या आराखड्याच्या विचार केल्यास अंमलबजावणीच्या कालखंडामध्ये थोड्या स्वरूपात बदल होणे स्वाभाविक असते.

**प्रकल्प अंमलबजावणीच्या टप्प्यातील उद्दिष्ट्ये**

**(Objectives of the Implementation Phase)**

प्रकल्प अंमलबजावणीच्या टप्प्यातील उद्दिष्ट्ये खालील प्रमाणे -

- कृती आराखडा कार्यान्वित करणे.

- स्पष्ट व निश्चित बदल आणि सुधारणा करणे.
- नवीन परिसर, नवीन संस्था आणि नवीन साधने प्रत्येक पैलू मध्ये शाश्वत आहेत याची खात्री करणे.
- आर्थिक बाबींच्या संदर्भात पारदर्शीपणा राखणे.
- गरिबांसाठीचे फायदे समाजातील उच्च वर्गाकडून उपभोगले जाणार नाहीत हे सुनिश्चित करणे.

प्रकल्प अंमलबजावणीसाठी महत्त्वाची सुरूवात म्हणजे कामाचे नियोजन योग्य पद्धतीने असणे होय, यामध्ये सर्व घटक समाविष्ट असणे आवश्यक आहे. तांत्रिक, बिगर तांत्रिक, गोष्टीची मागणी योग्य पद्धतीने करण्यात यावे तसेच आर्थिक व संख्यात्मक चौकटी प्रकल्पाला अनुसरून असणाऱ्या स्थानिक पातळीवरील गोष्टींचा विचार करून तयार करण्यात याव्यात. प्रकल्प अंमलबजावणी करणाऱ्या संघाने त्यांच्याकडे असणाऱ्या सकारात्मक व नकारात्मक गोष्टी व संधी या सर्व बाबी दर्शवाव्यात. प्रकल्पातील संघाकडे असणारी ताकद व कमतरता या दाखविण्याचा प्रयत्न करणे म्हणजे प्रकल्पाची अंमलबजावणी परिणामकारकरित्या करणे होय अंमलबजावणीसाठी महत्त्वाची गरज म्हणजे आर्थिक, भौतिक व मानवी साधने पूर्णपणे उपलब्ध असणे.

कामाच्या अंमलबजावणी अगोदर घ्यावयाची दक्षता खालील प्रमाणे -

- कामाचे वेळापत्रक करणे व संभवनीय अडथळ्यांची गोष्टी ओळखणे.
- संघामध्ये समाविष्ट असणाऱ्या लोकांच्या संपर्कात राहणे व सर्वांना आपआपली कामे व जबाबदाऱ्या याची जाणीव झाले असल्याची खात्री करणे.
- प्रकल्प प्रक्रियेचा समन्वय साधण्यासाठी प्रकल्प व्यवस्थापन साधनांचा पुरवठा करणे.

**सामाजिक प्रकल्पांची अंमलबजावणी (Implementation of Social Projects)**

वरील भागात नमूद केल्याप्रमाणे सामाजिक प्रकल्प सामान्य स्वरूपाचे असतात. समाजातील लक्ष घटक (Target Group) केंद्रीत करून प्रकल्पाची अंमलबजावणी केली जाते. असे प्रकल्प मुख्यत्वे वर्तनातील बदल करणे, क्षमता बलवान करणे या गोष्टी जनजागृतींच्या माध्यमातून व प्रशिक्षणाच्या माध्यमातून राबवल्या जातात अशा प्रकारचे प्रकल्प फार मोठा भाग व्यापतात की ज्यांमध्ये बऱ्याच कृतींचा संच असतो. प्रकल्पाच्या अंमलबजावणीचे यश हे व्यवस्थापनाचे डावपेच व समन्याची मार्गदर्शक तत्वे योग्य पद्धतीने मांडण्यावर अवलंबून असते. प्रकल्पाची अंमलबजावणीत असताना त्याची उद्दिष्ट्ये त्याचे परिणाम, कोणकोणती कामे विकसीत केली जाणार आहेत, तसेच उपलब्ध आर्थिक अंदाज मांडण्यात यावा. प्रकल्पाचे उद्दिष्ट गाठण्यासाठी प्रत्येक व्यक्तिला त्याची कर्तव्ये पार पाडण्यासाठी देणे, विभाग किंवा संस्था यांचा देखील यामध्ये समावेश असणे आवश्यक आहे. स्थानिक पातळीवरील लोक जेणेकरून स्थानिक भाषा बोलणारे यांना प्रकल्पामध्ये समावेश करून घेण्यास प्राधान्य द्यावे, कारण अंमलबजावणी करत असताना स्थानिक भाषा व संस्कृतीची माहिती घेऊन परिणामकारक पणे अंमलबजावणी करणे योग्य ठरते. प्रकल्पाच्या अंमलबजावणीची सुरूवात करण्यापूर्वी आर्थिक साधने उपलब्ध असणे आवश्यक आहे, जेणे करून संघामध्ये समाविष्ट असणाऱ्या सदस्यांना कामाची सुरूवात करण्यासाठी व लागणारा खर्च

करण्यासाठी योग्य होईल व काम नियोजित वेळेमध्ये पुढे नेता येईल. अंमलबजावणीच्या सुरूवातीच्या टप्प्यामध्ये संचालक, संचालक मंडळ, संस्थेचे सर्व घटक उपस्थित असणे आवश्यक आहे जेणेकरून स्थानिक प्रतिनिधी, स्थानिक लोक प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी सहकार्य करतील व हा प्रकल्प पूर्णत्वास नेण्यास मदत होईल.

योग्य प्रकल्प अंमलबजावणीसाठी कामाची रूरपेषा व आर्थिक अहवाल सुव्यवस्थीत तयार करण्यात यावेत. या बाबींची अंमलबजावणीची सुरूवात झाल्यापासून नोंदी असणे गरजेचे आहे. अंमलबजावणीसाठी केलेले खर्च कशा पद्धतीचे आहे हे पाहून वरील खर्चाची भरपाई करून घेण्यात यावी. अंमलबजावणीची साधी रचना असणे महत्त्वाचे आहे जेणेकरून इतरांना देखील सहजासहजी वाचून समजावून घेणे सोईचे होईल यामध्ये मुख्यत्वे साधे तक्ते आणि किंमतीचा अहवाल देण्यासाठी योग्य साचा, क्षेत्रिय निवड, मुलाखत, कार्यशाळा, बैठक अहवाल इत्यादी गोष्टींचा समावेश असतो. ज्या क्षेत्रीय परिसरामध्ये प्रकल्प राबवला जाणार आहे त्या ठिकाणी नियंत्रण ठेवण्यासाठी यंत्रणा विकसित करण्यात यावी. निर्णय घेण्याच्या प्रक्रियेसाठी लागणाऱ्या यंत्रणेची योग्य पद्धतीने रचना करण्यात यावी यामध्ये जबाबदार व्यक्तिचा समावेश असणे आवश्यक आहे, यामध्ये समावेश असणे आवश्यक आहे, यामध्ये कार्यप्रणालीची साखळी पुढील प्रमाणे असावी.

क्षेत्रावर (field) काम करणारे कामगार – कामगार प्रतिनिधी – काम संकुल प्रतिनिधी (Package leader) प्रकल्प व्यवस्थापक – प्रकल्प समन्वयक – मुख्य समिती अशा प्रकारे अस्तित्वात असणारी कामाच्या ठिकाणची श्रेणी रचना कामाच्या ठिकाणातील किंवा स्वरूपातील बदल व सूचना देईल तसेच उपयुक्त साधनांच्या वापरासाठी परवानगी देईल. संपर्काची वेगवेगळी साधने, कामगारांसाठी व व्यवस्थापन संघासाठी खुली ठेवण्यात यावीत. उदा. दुरध्वनी, भ्रमणध्वनी, संगणक इ. कामाच्या बाबतीत पूर्णपणे नोकरशाही तत्वावर आधारित काम करण्यापेक्षा कामगारांचा थोडीशी मोकळीक व कामामध्ये थोडीशी सुट देण्यात यावी, अन्यथा अती शिस्त कामामध्ये अडथळे निर्माण करू शकते. या शिवाय प्रत्येक महिन्यास कामगारांची बैठक बोलावून कामाचा अहवाल व लेखा जोखा सादर करून घ्यावे जेणेकरून एकमेकांचे कामाचे अनुभव व निर्माण होणाऱ्या अडचणी समजावून घेऊन त्यावर मात करणे सोपे होईल व लवकरात लवकर प्रकल्पाचे यश गाठता येईल.

### २.२.४ प्रकल्प निरीक्षण, पर्यवेक्षण आणि मूल्यमापन

### (Monitoring, Supervision and Evaluation)

#### अ) निरीक्षण (Monitoring)

प्रकल्प अंमलबजावणीमध्ये दररोजच्या किंवा नियमीत चालणाऱ्या कामाचे निरीक्षण करणे फार महत्त्वाचे असते. निरीक्षण ही प्रकल्पातील दैनंदिन कामाची माहिती एकत्र करण्याची प्रक्रिया होय. प्रकल्प नियंत्रकाने दररोज चालणाऱ्या कामावर नियंत्रण ठेवून काम कशा पद्धतीने पुढे जात आहे याची माहिती हेतू पुरस्पर ठेवणे गरजेचे असते. तसेच निरीक्षकाने प्रकल्पामधील कामाचा अहवाल जे अंमलबजावणी करणार आहेत व जे उपभोक्ते आहेत त्याना वेळोवेळी पुरवणे महत्त्वाचे असते. वेळोवेळी अहवाल दाखल करणे म्हणजे संकलीत झालेल्या माहितीनुसार प्रकल्प पुढे पूर्ण करण्यास व त्यामध्ये सुधारणा करण्यास मदत होते.

### निरीक्षणाचा हेतू (Purpose of Monitoring)

प्रकल्पाच्या अंमलबजावणीमध्ये व नियोजनामध्ये निरीक्षण हा फार महत्त्वाचा घटक असतो. निरिक्षण म्हणजे सततचे लक्ष ठेवणे. एखादी गाडी रूळावरून योग्य पद्धतीने धावते की नाही यावर लक्ष केंद्रीत करणे जेणेकरून गाडीची दिशा चुकणार नाही, आणि मग आपल्याला खात्री होते की आपण योग्य मार्गाने जात आहोत.

निरीक्षणाच्या माध्यमातून जी माहिती पुरविली जाते ती प्रकल्प अंमलबजावणीसाठी अत्यंत उपयुक्त असते, ती खालील प्रमाणे,

१. समुदाय व समुदायाच्या परिस्थितीचे विश्लेषण.

२. प्रकल्पातील समाविष्ट कच्चा मालाचा किंवा वस्तूंचा योग्य वापर झाल्याचे ठरवणे.

३. प्रकल्प अंमलबजावणीतील अडथळे शोधणे व त्यावर उपाय सुचविणे.

४. प्रकल्पामधील सर्व कार्ये योग्य लोकांच्या सहभागाने योग्य वेळेत पूर्ण होत आहेत की नाही याची खात्री करणे.

५. एका प्रकल्पाच्या अनुभवाचे धडे दुसऱ्या प्रकल्पांमध्ये वापरणे.

६. प्रकल्प ज्या पद्धतीने नियोजित केला आहे तो उपयोजित किंवा (appropriate) योग्य मार्गाने समस्या सोडवण्यासाठी कार्यान्वित आहे की नाही हे ठरवणे.

निरीक्षण म्हणजे एक प्रकारे मोजमाप होय याचा उद्देश भागधारकांना प्रकल्पाबद्दलच्या घडामोडी, प्रकल्पाची प्रगती व वेगळी कार्ये कशा पद्धतीने चालू आहेत याची माहिती पुरवणे. निरीक्षणाच्या कालावधीमध्ये प्रकल्पाच्या घडणाऱ्या प्रत्येक कृतीमध्ये समाविष्ट होऊन त्या पूर्णत्वास नेण्याचा प्रयत्न करणे व निरीक्षण हे व्यवस्थापनाचे साधन आहे.

### ब) पर्यवेक्षण (Supervision)

पर्यवेक्षण हा सेवा पुरविणारे व संस्था यांच्यातील महत्त्वाचा व्यक्तिगत दुवा आहे. पर्यवेक्षण ही परस्पर क्रिया घडवून आणणारी प्रक्रिया आहे की ज्यामध्ये संस्थेची ध्येये व उद्दिष्ट्ये एकत्र काम करण्यासाठी कळवली जातात. सेवा पुरविणाऱ्यांच्या मदतीने प्रत्येकाने त्यांची जबाबदारी ओळखणे, त्यानुसार त्यांच्यामध्ये सुधारणा घडवून आणणे आणि त्यांना सहकार्य करण्यासाठी साधनांची जुळवाजुळव करणे प्रकल्पाच्या दृष्टीने फायद्याचे असते. आधारात्मक पर्यवेक्षण प्रकल्पातील लोकांना सक्षम बनण्यास मदत करते. पर्यवेक्षणाच्या प्रक्रियेमध्ये संस्थेसोबतची बांधिलकी आणि समाधान निर्माण होत असते.

पर्यवेक्षण करण्यासाठी पर्यवेक्षणाकडे आवश्यक असणाऱ्या गोष्टी खालील प्रमाणे -

१) व्यवसायाचे / नोकरीचे संपूर्ण विश्लेषण.

२) व्यवसाय कृतीमध्ये आखण्यासाठी आवश्यक कौशल्ये.

३) क्रिया/प्रक्रिया क्षमता सुधारण्याचे नियोजन.

४) लाभांश व अभिप्रायसाठी व्यवस्था.

५) योग्य साधने.

६) समुदायासोबत बांधिलकी.

**पर्यवेक्षक बनण्यासाठीचे निकष**

प्रभावी पर्यवेक्षक बनवण्यासाठी आवश्यक असणारे निकष खालील प्रमाणे -

१) संभाषण करणे, ऐकणे व निरीक्षण करणे.

२) मार्गदर्शन व शिकवणे.

३) आत्मविश्वास निर्माण होण्यास प्रेरणा देणे.

४) अंतर्गत समस्या व संघर्ष यांची हाताळणी करणे.

५) योग्य साधनांची प्राप्ती करणे.

६) योग्य प्रशिक्षण राबवणे.

७) जबाबदाऱ्यांचे प्रतिनिधित्व करणे.

८) निरीक्षण केलेल्या गोष्टींचा पुरवठा करणे.

९) सल्लामसलत करणे.

१०) ध्येये निश्चीत करणे.

११) गुणवत्ता टिकवणे.

१२) निरीक्षण व मूल्यमापन करणे इ.

**मूल्यमापन (Evaluation)**

मुल्यमापन ही एक आर्थिक, सामाजिक, पर्यावरणीय आणि प्रकल्पावरील आर्थिक परिणामांचे मुल्यांकन करण्याचे पद्धतीशास्त्र आहे. प्रकल्पाशी संबंधीत असणारे सर्व परिणाम यांची माहिती घेणे व त्यानुसार आर्थिक बाबींचा आधार घेऊन त्याचे मुल्यमापन करणे. मुल्यमापन ही प्रकल्पाची सुव्यवस्थित व हेतुपुरस्पर मुल्यांकन करण्याची प्रक्रिया आहे. यामध्ये खालील घटकांचा समावेश होतो.

१) सर्वसाधारण रचना

२) अंमलबजावणी

३) क्षमता

४) प्रभाविपणा

५) परिणाम

६) टिकाव

मुल्यमापणाची प्रक्रिया एखाद्या राबवलेल्या प्रकल्पामधून निर्माण होणाऱ्या सकारात्मक गोष्टींचे मूल्यांकन करते.

**मूल्यमापनाची तत्वे (Norms of Evaluation)**

एप्रिल २००५ मध्ये संयुक्त राष्ट्रसंघाने मुल्यमापनाची कांही तत्वे निर्माण केल्या आहेत. जेणेकरून प्रकल्प यशस्वी राबवण्यासाठी व मुल्यमापणामध्ये एकसंघता निर्माण होण्यासाठी फायद्याचे आहे ते खालील प्रमाणे –

- हेतूपुरस्करता (Intentionality)
- नि:पक्षपातीपणा (Impartiality)
- स्वतंत्रता (Independence)
- गुणवत्ता (Quality)
- लायक (Competence)

प्रकल्पाचे मूल्यमापन करण्यासाठी जर वरील सर्व तत्वे (Norms) असतील तर मुल्यमापनाचे काम यशस्वी होते व प्रकल्पाला एका वेगळ्या सकारात्मक उंचीवर नेणे शक्य होते आणि यश संपादन करणे सोपे होते. ही वर नमूद केलेली तत्वे मुल्यमापन प्रक्रियेमधील गुणवत्ता व ताकद टिकवून ठेवण्याचे कार्य करते.

प्रकल्प मुल्यमापनामध्ये आर्थिक घटक हा महत्त्वाचा मानला गेला आहे. प्रकल्प, प्रकल्पाची अंमलबजावणी, प्रकल्पाचे पर्यवेक्षण, प्रकल्पाचे मुल्यमापन या सर्व गोष्टी समाजासाठी व समाज हा एक केंद्रबिंदू माणून या सर्वगोष्टींचा व प्रकल्पाचा फायदा राबवल्या जाणाऱ्या समुहासाठी कसा होईल हे पाहणे महत्त्वाचे आहे पण हे सर्व करत असताना आर्थिक घटकाशिवाय कार्याची सीमा पार करणे शक्य होत नाही. प्रकल्प राबवत असताना त्या प्रकल्पाचा येणारा खर्च किती असणार, निधी कसा उभा करायचा तो खर्च कोणत्या स्वरूपात करायचा या सर्व गोष्टींचा अंदाज मुल्यमापनाच्या प्रक्रियेशिवाय घालता येत नाही. एखाद्या प्रकल्पाला येणारा अंदाने खर्च मूल्यमापनाच्या माध्यमातून मांडता येतो. मुल्यमापनाच्या माध्यमातून प्रकल्पातील कार्यरचनेत विकास व बदल करणे शक्य होते. मूल्यमापनाच्या माध्यमातून प्रकल्प अंमलबजावणी करताना ज्या चूका घडून आल्या आहेत त्यांच्यामध्ये सामाजिक, पर्यावरणीय व अंदाजपत्रकाच्या मुद्यानुसार प्रकल्पाशी संबंधीत असणाऱ्या गोष्टींमध्ये सुधारणा घडवून आणणे शक्य होते. या कारणासाठीच आर्थिक मुल्यमापनाची चर्चा इतर गोष्टीपेक्षा अधिक स्वरूपात करणे महत्त्वाचे आहे. सामाजिक व पर्यावरणीय विश्लेषण यातून प्रकल्पाचा परिणाम समाजातील वेगवेगळ्या घटकांवर कसा झाला आहे हे मांडणे शक्य होते. उदा. सामाजिक समुह, बेरोजगारी, प्रांतिक विकास (regional development) तसेच प्रकल्पाचा परिणाम नैसर्गिक गोष्टीवर कसा झाला याचे देखील मुल्यमापन करणे महत्त्वाचे असते. उदा. पर्यावरण, प्रदूषण, ऐतिहासिक वास्तू इत्यादीवर कसा होतो हे पाहणे महत्त्वाचे असते. तसेच मुल्यमापनामुळे या

घडणाऱ्या किंवा परिणाम झालेल्या गोष्टी कशा सोडवाव्या याचे देखील मार्गदर्शन होते.

**प्रकल्प मूल्यमापनाचा हेतू** (Purpose of Project Evaluation)

प्रकल्प मूल्यमापनाचे वेगवेगळे हेतू म्हणजेच सेवेची गुणवत्ता सुधारणे, पैशाच्या मूल्याची खात्री व प्रकल्पासाठी प्राधान्याने दिलेली कामे पूर्ण करणे या सर्व गोष्टी प्राप्त करणे खालील रचनात्मक गोष्टीमुळे शक्य होते.

- प्रकल्पाची उद्दिष्ट्ये स्वच्छपणे मांडणे किंवा स्पष्ट करणे व ती उद्दिष्ट्ये पूर्ण होण्यासाठी योग्य दिशा मिळवणे.
- प्रकल्पाचा संबंध शासनाच्या उद्दिष्टासोबत जोडणे.
- आर्थिक, सामाजिक, पर्यावरणीय आणि अंदाजपत्रकातील स्पष्टीकरण मुख्य यंत्रणेपर्यंत पोहचवणे.
- प्रकल्पाचे समाजासाठी होणारे फायदे व राज्यशासनावर आर्थिक परिणाम कसा होतो याचे स्पष्टीकरण करणे.

**स्वयं अध्यायनासाठी प्रश्न**

१) प्रकल्प म्हणजे काय ?

२) प्रकल्प राबवण्यामध्ये महत्त्वाचा घटक कोण असतो ?

३) प्रकल्प राबवताना पाहिली जाणारी पहिली गोष्ट कोणती ?

४) प्रकल्प प्राधान्याने कोणासाठी राबवला जातो ?

५) निरीक्षण व मुल्यमापन कशाचे करणे आवश्यक आहे ?

६) प्रकल्प अंमलबजावणीमधील महत्त्वाची पायरी कोणती ?

## २.३ सारांश (Conclusion)

प्रकल्प आणि कार्यक्रम व्यवस्थापनाला आधुनिक काळामध्ये फार महत्त्व येऊ लागले आहे, कारण एखादी गोष्ट रचनात्मक पणे पार पाडावयाची असेल तर त्याचे आयोजन व व्यवस्थापन योग्य पद्धतीने करणे गरजेचे असते. प्रकल्पाची अंमलबजावणी करत असताना जो लक्ष समुह आहे (Target Group) त्या लक्ष समुहाचा सर्वांगीण विचार करणे गरजेचे आहे, अंमलबजावणी करताना प्रकल्प अधिकाऱ्याची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते, तो आपल्या तत्वाशी व कार्याशी बांधील असणे प्रकल्प पूर्ण होण्यासाठी महत्त्वाचे असते. या सर्व बाबी विचारात घेऊन प्रकल्प पूर्णतेसाठी त्याची योग्य मांडणी प्रस्तावनाच्या माध्यमातून करणे आवश्यक असते, प्रस्ताव पाठवत असताना सर्व बाबींचा सर्वानुमते विचार करून तो पाठवण्यात यावा, प्रकल्प पूर्ण करण्यासाठी प्रस्तावामध्ये प्राधान्य क्रम द्यावा जेणेकरून प्रस्ताव वेळीच मंजूर होईल व पुढील उद्दिष्ट गाठणे सोपे होईल. प्रकल्पाचे समर्थन करताना गरजांचे प्राधान्य, दृष्टीकोण, अंमलबजावणी करणारी संस्था, पूर्णपणे प्रकल्पाचा उद्देश, त्यामध्ये असणारा लक्ष समुह (target group) या सर्व बाबींची नोंद ठेवून राबवणे व प्रस्तावनामध्ये नमूद करणे महत्त्वाचे असते. प्रकल्प अंमलबजावणीची उद्दिष्ट्ये प्रकल्प

मान्यतेसाठी महत्त्वाची भूमिका पार पाडतात. प्रकल्पाची अंमलबजावणी करत असताना प्रकल्पाचे निरीक्षण, पर्यवेक्षण आणि मुल्यमापन या अत्यंत महत्त्वाच्या गोष्टी आहेत कारण या बाबीनंतर प्रकल्पाचे यश अपयश अवलंबून असते.

## २.४ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

१) प्रकल्प म्हणजे अनेक कामांचा संच होय.

२) प्रकल्प राबवण्यामध्ये प्रकल्प अधिकारी हा महत्त्वाचा घटक असतो.

३) प्रकल्प प्राधान्यमागे लक्ष समुहासाठी (Target Group) राबवला जातो.

४) प्रकल्प राबवताना पाहिली जाणारी पहिली गोष्ट म्हणजे समस्या.

५) निरीक्षण व मुल्यमापन प्रकल्पाच्या अंमलबजावणीचे करणे आवश्यक आहे.

६) प्रकल्प अंमलबजावणीमधील महत्त्वाची पायरी म्हणजे आराखडा होय.

## २.५ सरावासाठी प्रश्न

१) प्रकल्प व्यवस्थापनाचे स्वरूप व संकल्पना स्पष्ट करा ?

२) प्रकल्प प्रस्तावाचे प्रस्तावित स्वरूप स्पष्ट करा ?

३) प्रकल्प निरीक्षण, पर्यवेक्षण आणि मुल्यमापन स्पष्ट करा ?

## २.६ चिंतन आणि कार्य

१) जवळच्या एखाद्या सामाजिक प्रकल्पाला भेट द्या आणि त्या ठिकाणी प्रकल्प राबवण्यासाठी चालणाऱ्या गोष्टीचे निरीक्षण करून तुमची निरीक्षणे नोंदवा.

२) प्रकल्पामध्ये समाविष्ट असणारे अधिकारी व कर्मचारी यांच्या मुलाखती घेऊन त्याची माहिती लिहून काढा.

## २.७ अधिक वाचनासाठी पुस्तके


1) Maylor Hwnvey, 1999 : Project Management, Mac Millan India Ltd., New Delhi.

2) Gray C.F., 2000 : Project Management, Mac Graw Hill Higher Education Boston.


❑❑❑

# घटक : ३

# आर्थिक स्त्रोत आणि वित्तीय संस्था

**(Financial Sources and Funding Organization)**

**अनुक्रमणिका**

३.० उद्दिष्ट्ये

३.१ प्रस्तावना

३.२ विषय विवेचन

३.२.१ निधीच्या स्त्रोतांची गरज आणि संकल्पना

३.२.२ शासकीय संस्थाच्या माध्यमातून आर्थिक स्त्रोत

३.२.३ बिगर शासकीय संस्था व स्वायत्त संस्थांच्या माध्यमातून मिळणारे आर्थिक स्त्रोत

३.२.४ आंतरराष्ट्रीय वित्तीय संस्था

३.२.५ परदेशी निधी आणि FCRA च्या तरतूदी

स्वयं अध्ययनासाठी प्रश्न

३.३ सारांश

३.४ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

३.५ सरावासाठी प्रश्न

३.६ संदर्भ ग्रंथ

## ३.० उद्दिष्ट्ये (Objectives)

१. बिगर शासकीय संस्थाना आवश्यक असणाऱ्या निधी संकलन या संकल्पनेची माहिती व महत्त्व समजून येईल.

२. बिगर शासकीय संस्थांना आवश्यक असणारे विविध प्रकारचे आर्थिक स्त्रोत समजून घेणे.

३. शासकीय संस्था कडून मिळणारे आर्थिक सहकार्य अनुदान.

## ३.१ प्रस्तावना (Introduction)

बिगर शासकीय संस्था या कायदेशीर प्रक्रियेच्या माध्यमातून स्थापन केलेल्या असतात. ज्यांचे नियम आणि नियमने शासकीय पातळीरून केले जाते. प्रांतनिहाय या संस्थांच्या नोंदणीचे नियम वेगवेगळे असू शकतात. या संस्थाना विविध माध्यमातून निधी स्विकारण्याची परवानगी आहे. अशा स्वरूपाचा निधी स्विकारताना त्यांना शासकीय नियम व नियमावली लागू असते त्याचबरोबर या सर्व प्रक्रियेची ताळेबंद त्यांना मांडणे आवश्यक असते.

बिगर शासकीय संस्था वेगवेगळे कार्यक्रम व उपक्रम राबवत असतात ते राबविण्यासाठी त्यांना आर्थिक पाठबळ आवश्यक असते. हे आर्थिक स्त्रोत राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर तसेच शासकीय पातळीवर कसे उपलब्ध होतात त्याची माहिती आपण या प्रकरणामध्ये करणार आहोत.

पर्यावरण ही समस्या स्थानिक पातळीवरची न राहता ही जागतिक समस्या बनलेली आहे. म्हणून या समस्येकडे गांभीर्याने पाहीले पाहीजे. पर्यावरण समस्यांमध्ये वृक्षतोड, वणवा, पाणी प्रदूषण, हवा प्रदूषण, जमिनीची धुप, पाण्याची कमतरता, विविध साथीचे रोग या सारख्या गंभीर समस्या निर्माण झाल्या आहेत. या समस्यांवरती मात करण्यासाठी शासकीय पातळीवरती प्रयत्न सुरू आहेतच पण केवळ शासकीय प्रयत्न अपुरे पडल्यामुळे स्वयंसेवी संस्थांचा फार मोठ्या प्रमाणावरती सहभाग पर्यावरण संरक्षणामध्ये निर्माण झाला असून या अशासकीय स्वयंसेवी संस्था पर्यावरण संरक्षणामध्ये खारीचा हात उचलत आहे. पण हे काम करत असताना आर्थिक घटकाशिवाय त्याची परिपूर्ती होऊ शकत नाही.

## ३.२ विषय विवेचन

१. मानवी दु:ख, दैन्य व दारिद्र्य दूर करण्यासाठी बिगर शासकीय संस्था सातत्याने प्रयत्नशील आहेत. ते काम करत असताना त्यांना लागणारा आर्थिक निधी हा ते अनेक माध्यमातून उभा करत असतात. उपेक्षित वर्गाच्या विकासासाठी लागणारा निधी या संस्था शासनाकडून, खाजगी कंपन्याकडून मोठ्या उद्योगपतीकडून, व्यक्तीगत पातळीवर व स्वयंसेवी संस्थांच्या मदतीवर उभा करत असतात.

२. स्वयंसेवी संस्था हे अनुदान कांही वेळा संस्थांर्तगत पातळीवर उभा करत असतात. तर कांहीवेळा इतर निधी देणगीरूपाने इतर संस्थाकडून उभा करतात. बिगर शासकीय संस्थांना प्रकल्प राबविण्यासाठी वरील संस्थांच्या बरोबरच शासकीय संस्थादेखिल अर्थ सहाय्य करतात.

३. विकसनशिल देशांमध्ये शासन हा बिगर शासकीय संस्थांना विविध समाजोपयोगी प्रकल्प राबविण्यासाठी मोठ्या प्रमाणात शासकीय अनुदानावरच अवलंबून रहावे लागते. १९९०-१९९५ नंतर मात्र या देशाांमध्ये आंतरराष्ट्रीय पातळीवर कार्यरत असणाऱ्या विविध संस्थांच्या माध्यमातून समाजोपयोगी प्रकल्प राबविण्यासाठी मोठ्या प्रमाणात अर्थसहाय्य पुरविले जाऊ लागले आहे.

४. 'पर्यावरण' ही समस्या दिवसेंदिवस गंभीर होत असून जर त्यावर उपाय शोधले नाही तर मानवी जीवनात गंभीर स्वरूपाच्या समस्या निर्माण होतील. सद्यस्थितीत जर उपाययोजना केल्या नाही तर भावीपिढी आपणाला माफ करू शकणार नाही. यासाठी शासकीय संस्थांकडून अथवा स्वत: हा निधी उभारून पर्यावरण संरक्षण करणे ही काळाची गरज आहे.

### ३.२.१ निधीच्या स्त्रोताची गरज आणि संकल्पना

**(Concept and Need of Financial Resources)**

पर्यावरण हे समस्या भविष्यकाळात गंभीर स्वरूप धारण करणार असून सर्व मानव जातीचा अस्तित्वाचा प्रश्न निर्माण होणार आहे. म्हणून काळाची पावले वेळीच ओळखून पर्यावरण संरक्षण व संवर्धन केले पाहिजे. पर्यावरण समस्येमध्ये वृक्षारोपन, वृक्ष संवर्धन, जलस्त्रोत्रांचे संवर्धन, पाणी आडवा पाणी जिरवा मोहिम प्राणी संरक्षण व संवर्धन, प्लास्टिकचा वापर टाळणे, जंगलतोड थांबवणे, सौरऊर्जाचा वापर करणे, जमिनीची धूप थांबवणे, रसायन मुक्त शेती, या गोष्टींचा अवलंब केला पाहिजे.

स्वातंत्र्यपूर्व काळात महात्मा गांधी समाज विकासाठी विविध प्रकारच्या योजना राबवल्या. हरिजन सेवक संघ, येटावा प्रकल्प, गुरगाव प्रयोग अशा प्रकल्पातून समाजाचा विकास घडवून आणण्याचा प्रयत्न महात्मा गांधीनी केले. लोक सहभागातून ग्रामीण विकास ही संकल्पना त्यांनी राबवली. आज स्वयंसेवी संस्थाच्या माध्यमातून समाज विकासाची संकल्पना स्वातंत्र्योत्तर काळात राबवली जात आहे.

भारत सरकारने १९९१ नंतर खाजगीकरण, उदारीकरण व जागतिकीकरणाची संकल्पना स्वीकारली. या प्रक्रियेमध्ये शासनाने कालानुरूप आपल्या जबाबदाऱ्या कमी करण्यास सुरूवात केली व बिगर शासकीय संस्थांना आपल्या कामामध्ये सहयोगी करून घेतले. या प्रक्रियेमुळे समाजाच्या विकासासाठी आमलात येणारे विविध प्रकल्पांची अंमलबजावणी बिगर शासकीय संस्थांच्या माध्यमातून होऊ लागली. या कालावधीमध्ये देशभरामध्ये मोठ्या प्रमाणात बिगर शासकीय संस्थांचे जाळे फार मोठ्या प्रमाणात विणले गेले. उपेक्षित समाजाच्या विकासापासून ते नैसर्गिक आपत्ती व्यवस्थापनापर्यंत तर दुसऱ्या बाजूला मानवाच्या मूलभूत गरजापासून ते त्यांच्या विविधांगी विकासापर्यंत घेवून जाण्याचे काम या बिगर शासकीय संस्था करू लागल्या.

नैसर्गिक आपत्तीत सापडलेल्यांची मुलांची शिक्षण, आपत्तीग्रस्तांचे पुनर्वसन, शारिरीक व मानसिक विकलांग समाज घटकांचे विकास व पुनर्वसन, ग्रामीण युवकांची रोजगार निर्मितीसाठी प्रशिक्षण किंवा त्यांना वित्तीय अर्थसहाय्य असो या सर्व उपक्रमांसाठी मोठ्या प्रमाणात निधीची आवश्यकता असते. हा निधी उभा करणे, त्याचा योग्य विनियोग करणे हे बिगर शासकीय संस्थांचे महत्त्वाचे कार्य आहे.

परदेशामधील बिगर शासकीय संस्थांना लोकोपयोगी कार्य करण्यासाठी अनेक माध्यमे उपलब्ध आहेत. बहुतेकवेळा या कामासाठी लागणारा निधी हा त्या संस्थांचा लाभार्थी समूह उपलब्ध करून देत असतो. भारतामध्ये मात्र अशी संकल्पना अजून रूजलेली नाही म्हणून बिगर शासकीय संस्थाना आपले अनेक लोकोपयोगी उपक्रम राबविताना आर्थिक चणचणीला सामोरे जावे लागते. ही आर्थिक चणचण दूर करण्यासाठी या संस्थांना वेगवेगळ्या माध्यमातून मदत करणाऱ्या संस्था, व्यक्तीवर अर्थसहाय्यासाठी अवलंबून राहावे लागते. आजघडीला भारतामध्ये बिगर शासकीय संस्था त्यांच्या विविध उपक्रमामध्ये आर्थिक सहाय्य करणाऱ्या घटक म्हणून शासनाच्या विविध विभागावर अवलंबून राहावे लागते.

भारतामध्ये बिगर शासकीय संस्थांची विभागणी ढोबळमानाने दोन गटात करता येईल.

१. एक गट हा पुर्णत: शासकीय निधीच्या सहाय्याने आपले समाजोपयोगी प्रकल्प राबवत असतो.

२. दुसरा गट हा मात्र आपले समाजोपयोगी प्रकल्प राबविण्यासाठी आंतरराष्ट्रीय पातळीवर कार्यरत असणाऱ्या बहुराष्ट्रीय आर्थिक सहाय्य करणाऱ्या संस्थांच्या सहकार्यातून आपले प्रकल्प राबवित असतो.

भारतामध्ये कार्यरत असणाऱ्या बिगर शासकीय संस्था या खालील तीन प्रकारच्या स्त्रोतातून आपणाला आवश्यक असणारा निधी उभा करत असतात.

**१) Funding (निधी) :**

भारतामध्ये कांही प्रमुख धर्मादाय देणगी देणाऱ्या संस्था कार्यरत आहेत ज्या बिगर शासकीय संस्थाना त्यांचे विविध उपक्रम राबविण्यासाठी प्रकल्पनिहाय निधी उपलब्ध करून देतात. बहुतेकवेळा हा निधी लोककल्याणासाठी दिलेला असतो.

**२) निधी संकलन (Fund Generation) :**

कांही बिगर शासकीय संस्था या आपल्या शेतीच्या उत्पन्नातून, शेतीपूरक व्यवसायातून, उदा. दूध संकलन केंद्र किंवा प्रशिक्षण कार्यक्रमाच्या माध्यमातून, कार्यशाळांच्या माध्यमातून किंवा बँक ठेवीच्या व्याजातून आपले उपक्रम राबविण्यासाठी निधी उभा करत असतात. हा संस्थांतर्गत असणारा निधी असतो.

**३) निधी उभारणे (Fund Raising) :**

या वर्गवारीतील बिगर शासकीय संस्था या सर्वसामान्य नागरिकांना, दानशूर व्यक्तींना आपल्या उपक्रमांची माहिती देवून त्यांच्याकडून अर्थसहाय्याची अपेक्षा करतात. कांही बिगर शासकीय संस्था या वेगवेगळ्या मोहिमांच्या माध्यमातून लोकांमध्ये जाणीव जागृती करून निधी उभा करतात.

### ३.२.२ शासकीय संस्थांच्या माध्यमातून आर्थिक स्त्रोत

### (Financial Sources from the Government Organization)

शासकीय संस्थाच्या माध्यमातून आर्थिक निधी उभारून शासकीय पातळीवर स्वयंसेवी संस्था किंवा अशासकीय संस्था यांचे सहकार्य घेऊन नव समाज उभारणीचे व विकासाचे काम केले जाते. लोकांचा सहभाग वाढवणे व जी कामे शासकीय पातळीवर शक्य नाहीत ती लोकांचा सहभाग वाढवून ती पूर्ण करणे व लोकांना चांगल्या जीवनमनाचा दर्जा प्राप्त करून देणे. हे काम मिळणाऱ्या शासकीय अनुदानातून केले जाते. आर्थिक घटकाशिवाय समाज उभारणीच काम शक्य होत नाही. म्हणून शासकीय अर्थसाह्य व लोकांचा सहभाग/श्रमदान यामुळे नविन कामाची उभारणी होत असते.

बहुतेक स्वयंसेवी संस्था या मानवतावादी दृष्टीकोन ठेवूनच सामाजिक कार्य करत असतात. कितीही उदात्त हेतूने प्रेरित होवून काम करावयाचे ठरविले तरीही उद्दिष्टपूर्तीसाठी या संस्थांनी आर्थिक गरज निर्माण होते. भारताच्या बाबतीत केंद्र व राज्य शासनाच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात लोकोपयोगी कार्य करणाऱ्या बिगर शासकीय संस्थांना निधी उपलब्ध करून दिला जातो. हा निधी उपलब्ध करून देत असताना बिगर शासकीय संस्थांना शासनाच्या त्या त्या विभागाने घालून दिलेल्या नियम व नियमावलीचे पालन करणे बंधनकारक असते. शासकीय पातळीवरून अर्थसहाय्य करणाऱ्या कांही मंत्रालयातील विविध विभागलेली

नावे खालील प्रमाणे -

१. सांस्कृतिक मंत्रालयाच्या योजना

२. महिला व बालविकास मंत्रालयाच्या योजना

३. आदिवासी विभागाच्या योजना

४. युवक कल्याण आणि क्रिडा विभागाच्या योजना

५. अल्पसंख्यांक विभागाच्या योजना

६. कामगार मंत्रालयाच्या योजना

७. विज्ञान आणि तंत्रज्ञान विभागाच्या योजना

८. कृषी विकासाच्या योजना

९. ग्रामीण विकासाच्या योजना

१०. ऊर्जा विभागाच्या विविध योजना.

### ३.२.३ बिगर शासकीय संस्था व स्वायत्त संस्थांच्या माध्यमातून मिळणारे आर्थिक स्त्रोत

### (Funding Sources from the NGOs and Autonomous Bodies)

बिगर शासकीय संस्था या वेगवेगळ्या मध्यमातून निधी संकलन करत असतात कांही संस्था या संस्थातर्गत असणाऱ्या साधन सामुग्रीचा वापर करून निधी संकलन करत असतात, तर कांही संस्था या बहिस्थ साधन सामुग्रीचा वापर करून निधी संकलन करत असतात. १९९१ नंतर भारताबाहेरून ही निधी संकलनाची प्रक्रिया सुरू झालेली आहे.

**अ) संस्था अंतर्गत स्त्रोत**

काही अशासकीय संस्था कोणत्याही प्रकारचे शासकीय अथवा वित्तीय संस्थाकडून फंड न घेता स्वत:च्या आर्थिक स्त्रोतातून समाज उपयोगी कामे करत असतात. उदा. सभासदांकडून दरमहा वर्गणी, कामावर श्रद्धा असणाऱ्या आश्रयदात्या कडून देणगी तसेच संस्थेचा जमा झालेला फंड त्या फंडाच्या कायम ठेवीवर मिळणारे व्याज तसेच संस्थेनी समाज उपयोगी केलेले काम पाहून उस्फूर्तपणे दिलेले देणग्या इतर समाज उपयोगी संस्थाकडून मिळालेल्या देणग्या तसेच समाजातील मोठमोठ्या धर्मादाय संस्था किंवा संस्थेच्या स्थावर जंगम मालमत्तेच्या उत्पादनातून येणारी रक्कम समाज उपयोगी कार्यासाठी वापरली जाते. थोडक्यात या संस्था दुसऱ्याच्या मदतीवर अवलंब न रहाता स्वत:च मदत निधी तयार करत असतात.

१. सभासदांची वर्गणी

२. आश्रय दात्याकडून वर्गणी

३. ठेवी वरील व्याजाच्या माध्यमातून

४. व्यक्तीगत व सामाजिक देणग्या

५. धर्मादाय संस्थाकडून

६. संस्थां अंतर्गत उत्पादनाच्या मालाच्या विक्रीतून

**ब) संस्था बहिर्गत स्त्रोत**

विविध शासकीय योजना राबवण्यासाठी अनुदान दिले जाते. त्या अनुदानातून समाज उपयोगासाठी छोटे-छोटे प्रकल्प उभे केले जातात. काही वेळेला संस्था स्मरपीका व जाहिराती देऊन आर्थिक उत्पन्न निर्माण करण्याचा प्रयत्न करत असते. तसेच समाजातील औद्योगिक संस्था समाज उपयोगी कार्यासाठी काही निधी मदत म्हणून देत असतात.

१. विविध शासकीय अनुदानित प्रकल्पांच्या माध्यमातून आर्थिक निधीची उभारणी केली जाते.

२. स्मरणिका, जाहिरातीच्या माध्यमाद्वारे आर्थिक निधीची उपलब्धता.

३. औद्योगिक समूहांकडून देणग्या.

४. वस्तूरूपात मिळालेल्या देणग्या.

**क) भारता बाहेरील स्त्रोत**

१. Non Resident Indians (NRI) - अनिवासी भारतीय.

२. आंतरराष्ट्रीय देणगी देणाऱ्या स्वायत्त संस्था - युनीसेफ (UNICEF), यु.एन.डी.पी. (UNDP), क्राय (CRY) इत्यादी.

मानवी कल्याणासाठी व उपेक्षित वर्गाच्या विकासासाठी अनेक माध्यमातून निधी संकलन करता येतो व अजूनही मोठ्या प्रमाणात व्यक्तीगत पातळीपासून राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर लोक अशा लोकोपयोगी प्रकल्पाला लोकांच्याकडून चांगला प्रतिसाद मिळू शकतो हे करत असताना बिगर शासकीय संस्था व स्वायत्त संस्थांनी देखिल आपले कार्य प्रामाणिकपणे व कर्तव्यदक्ष पद्धतीने करणे अपेक्षित आहे.

### ३.२.४ आंतरराष्ट्रीय वित्तीय संस्था (International Funding Organization)

उपेक्षित व दुर्बल घटकांच्या विकासासाठी समाजातील मोठ्या प्रमाणात आंतरराष्ट्रीय प्रतिष्ठाने, लोकांनी एकत्र येवून स्थापन केलेली सामाजिक प्रतिष्ठाने, औद्योगिक संस्थानी स्थापन केलली प्रतिष्ठाने कार्यरत आहेत. समाजातील रचनात्मक बदलासाठी कार्य करणाऱ्या लोकांना मदत करण्यासाठी निधीची कधीच कमतरता पडत नाही.

अशा स्वरूपाची कार्यरत असलेल्या कांही प्रतिष्ठानांची नांवे नमूद केलेली आहे. या संस्था स्वत: तयार केलेल्या नियम, नियमावलीप्रमाणे व मार्गदर्शक तत्वानुसार अर्थसहाय्य पुरवितात.

**अ) आंतरराष्ट्रीय पातळीवर कार्यरत असणारी कांही प्रमुख प्रतिष्ठाने खालील प्रमाणे**

1. सिलीकॉन व्हॅली कम्युनिटी फाऊंडेशन

2. The David and Lucile Packrd Foundation (CA)
3. The Robert Wood Johason Foundation (NJ)
4. Bill and Nelinda Gates Foundation (WA)
5. The Ford Foundation (NY)
6. Astrazeaeca Foundation (DE)
7. The William and Flora Hewlett Foundation (CA)
8. Glarco Smith Kline Potieat Access Progress Foundation (NC)
9. Lilly Endowment Inc. (IN)
10. The Andrew W. Mellon Foundation (NY)

**ब) सामाजिक प्रतिष्ठाने (Community Foundation)**

1. California community Foundation
2. Greater Koasas City Community Foundation
3. The New York Community Trust
4. The Chicago Community Trust
5. The Columbo Foundation and Atlitiaved Organization
6. Foundation for the Carolinas
7. The San Francisco Foundation
8. The Coasecceaity Foundation National Capital Region
9. Tuloa Community Foundation

**क) औद्योगिक गृहे (Corporate Houses)**

1. The Bank of America Charitable Foundation
2. Sanofi Aveatis Potient Assistance Foundation
3. Wat Mart Foundation
4. The Wachovia Foundation'
5. Citi Foundation
6. GE Foundation
7. The GP Morgan Chase Foundation
8. Exxonmobil Foundation
9. Well Fargo Foundation
10. Johnson and Johnson Companies Contribution Fund

## ३.२.५ परदेशी निधी आणि एफ.सी.आर.ए. च्या तरतूदी

### (Foreign Funds and FCRA Provisions)

एफ.सी.आर.ए. अंतर्गत ज्या संस्थांना निधी उपलब्ध करून घ्यावयाचा असेल त्यांना एफ.सी.आर.ए. कायद्यांतील आपल्या संस्थांची नोंदणी करणे अपरिहार्य असते. एफ.सी.आर.ए. नोंदणीसाठी स्वयंसेवी संस्थांना त्यांचे नोंदणीकृत दस्तऐवज आणि आर्थिक ताळेबंदाचे हिशोब सादर करणे बंधनकारक असते. सामाजिक उपक्रमांसाठी उपलब्ध झालेला परकीय निधी हा एफ्.सी.आर.ए. कायद्यांतर्गत नियंत्रणात ठेवला जातो. असे असले तरी कांही आंतरराष्ट्रीय पातळी वरून मिळालेल्या देणग्यांना सूट देण्यात आलेली आहे. अशा देणग्यांच्या स्वीकृतीसाठी फार मोठ्या प्रमाणात कागद पत्रांची देवाण-घेवाण करणे फार गरजेचे नसते. केंद्रिय गृह मंत्रालयाच्या माध्यमातून या कायद्याचे नियंत्रण आणि नियमन केले जाते. केंद्रिय गृह मंत्रालयाच्या परवानगीशिवाय कोणत्याही स्वयंसेवी संस्थेला परकीय निधी स्वीकारता येत नाही. या कायद्याच्या अंमलबजावणीमुळे ज्या संस्था परकीय निधी स्वीकारतात त्यांना जबाबदारीने व काळजीपुर्वक व्यवहार करावा लागतो. राजकीय प्रक्रिये पासून तसेच विविध प्रकारच्या वादग्रस्त मुद्यापर्यंत या संस्थांनी स्वत:ला अलिप्त ठेवणे गरजेचे असते.

एफ.सी.आर.ए. च्या कायद्यांतर्गत देशांतर्गत येणाऱ्या परदेशी निधीचे नियमन आणि निग्रानी केली जाते. अशा स्वरूपात झालेला परकीय निधी हा लोकोपयोगी कामासाठीच वापरला जातो की नाही हे तपासले जाते.

**मूल्यमापन (Conclusion)**

या घटकाचा अभ्यास केल्यानंतर विद्यार्थ्यांना स्वयंसेवी संस्थांनी लोक कल्याणास्तव तयार केलेल्या प्रकल्पासाठी निधी कोठून व कसा मिळवायचा याची माहिती होते. स्वयंसेवी संस्थांना व्यक्तीगत पातळीवरून शासकीय पातळीवरून, औद्योगिक संस्थाकडून तसेच विविध आंतरराष्ट्रीय पातळीवरील संस्था व प्रतिष्ठांनाकडून निधी उपलब्ध होतो. आंतरराष्ट्रीय पातळीवरून उपलब्ध होणाऱ्या निधीचे नियंत्रण करण्यासाठी एफ.सी.आर.ए-२०१० हा कायदा बहुमुल्य मदत करतो.

पर्यावरण ही समस्या गंभीर असून वेळीच त्यावर उपाययोजना केली नाही तर मानवाच्या अस्तित्वास धोका निर्माण होईल. म्हणून काळाची गंभीर पावले ओळखून मानवाने निसर्गाचे जे अव्याहतपणे नाश सुरू केले आहे तो थांबवला पाहिजे व त्यासाठी समाजामध्ये जनजागृतेची आवश्यकता आहे. शाळा, महाविद्यालये, विश्वविद्यालयामध्ये या समस्येची तीव्रता लक्षात घेऊन शासनाने सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार सबरवाल कमिटीने हा विषय शाळा, महाविद्यालयात हा विषय सक्तीचा केलेला दिसून येतो. नव्या पिढीमध्ये पर्यावरण संबंधी गांभीर्य निर्माण झाले असून पर्यावरण प्रदूषण कमी करून सजीव व निर्जिव सृष्टीवर होणारे परिणाम थांबविता येतील. सृष्टीच्या किंवा जगाचा नाश होण्यापासून वाचविता येईल. पर्यावरण प्रदूषणाची वेळीच दखल घेतली नाही तर मानवी समाजाला गंभीर परिणामांना सामोरे जावे लागेल. पर्यावरणाची समस्या गंभीर स्वरूप धाारण करून मानव समाजाची प्रचंड हानी होऊ शकेल. म्हणून नव्या पिढीत पर्यावरण संरक्षणासंबंधी जनजागरण करण्याची गरज आहे. केवळ शासनाला हे शक्य नसून सर्व समाजातील लोकांचा सहभाग आवश्यक आहे. तरच भावी पिढी आपणाला माफ करू शकेल. लोकांच्या

सहभागानेच आपण पर्यावरणीय संकट आपण दूर करू शकतो. म्हणूनच समाजामध्ये गेल्या दोन दशकात स्वयंसेवी संस्थांचे जाळे निर्माण होऊ लागले आहे.

स्वयं अध्ययनासाठी प्रश्न

**अ) रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा.**

१. पर्यावरणाची समस्या ही ......... समस्या बनली आहे.

२. स्वातंत्र्यपूर्व काळात समाज विकासासाठी ......... यांनी विविध प्रकारच्या योजना राबविल्या.

३. खाजगीकरण, उदारीकरण व जागतिकीकरणाची संकल्पना भारताने ........ नंतर स्विकारली.

४. संस्था अंतर्गत स्त्रोतामध्ये समाजकार्य करणाऱ्या आर्थिक स्त्रोत ......... निर्माण करतात.

५. ज्या संस्थाना निधी उपलब्ध करून घ्यावयाचा असेल त्या संस्थानी ......... नोंदणी करणे गरजेचे आहे.

६. परकीय निधी स्वीकारण्यासाठी ........... गृह मंत्रालयाची परवानगी आवश्यक असते.

७. आंतरराष्ट्रीय पातळीवरून उपलबब्ध होणाऱ्या निधीचे नियंत्रण करण्यासाठी .... हा कायदा मदत करतो.

८. ........ कमिटीने पर्यावरण हा विषय शाळा, महाविद्यालय पातळीवर सक्तीचा केला.

**ब) एक वाक्यात उत्तरे लिहा.**

१. १८६० च्या कोणत्या कायद्यान्वये निधीचा उपयोग बंधनकारक केला आहे.

२. कोणकोणत्या मार्गांनी निधी संकलन केला जातो.

३. शासकीय संस्थाच्या माध्यमातून आर्थिक स्त्रोत निर्माण करणाऱ्या दोन योजनांची नावे सांगा.

४. संस्था अंतर्गत निधी संकलनाचे दोन मार्ग सांगा.

५. परदेशी निधी संकलनाचे दोन मार्ग सांगा.

**क) चूक की बरोबर ते सांगा.**

१. पर्यावरण ही समस्या स्थानिक पातळीवरची आहे.

२. स्वयंसेवी संस्था ह्या शासनाला सहकार्य करत असतात.

३. आर्थिक निधी उपलब्ध करण्यासाठी स्वयंसेवी संस्था नोंदणीकृत असणे आवश्यक आहे.

४. लोकसहभागामुळे पर्यावरण समस्येवर मात करता येईल.

५. स्वयंसेवी संस्थांची वाढ १६ व्या शतकात झपाट्याने झाली.

## ३.४ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे :

अ) १) जागतिक
२) महात्मा गांधी
३) १९९१
४) स्वत:च
५) एफ्.सी.आर.ए.
६) केंद्रिय
७) एफ्.सी.आर.ए. - २०१०
८) सबरवाल

ब) १. Public Trust Act
२. शेती पूरक व्यवसाय, बँक ठेवी, कार्यक्रम इत्यादी.
३. सांस्कृतिक मंत्रालयाच्या योजना, आदिवासी विखास योजना.
४. सभासद वर्गणी, व्यक्तीगत व सामाजिक देणग्या.
५. अनिवासी भारतीय, युनीसेफ.

क) १) चूक
२) बरोबर
३) बरोबर
४) बरोबर
५) चूक

## ३.५ सरावासाठी प्रश्न (Broad Questions)

**अ) सविस्तर उत्तरे लिहा.**

१. स्वयंसेवी संस्थांना देणगीची गरज का असते ? है स्पष्ट करा.
२. बिगर शासकीय संस्था व स्वायत्त संस्थांच्या माध्यमातून मिळणारे आर्थिक स्त्रोत स्पष्ट करा.
३. आंतरराष्ट्रीय देणगी देणाऱ्या संस्था स्पष्ट करा.
३. एफ.सी.आर.ए. कायद्याचा उद्देश काय आहे ते स्पष्ट करा.

**ब) टिपा लिहा.**

१. निधीच्या स्त्रोताची गरज
२. आंतरराष्ट्रीय वित्तीय संस्था
३. बिगर शासकीय संस्था
४. परदेशी निधी
५. एफ.सी.आर.ए. च्या तरतुदी.

## ३.६ संदर्भ ग्रंथ


1. Bhide, Asha A. and Kanitkar - Principle of Population Studies, Bombay.
2. Sekhar, T. V. - Migration and Social Change.
3. Kaul, Ravendra Kumar - Migration and Society.
4. Sivarankrushna, K.C. Kunda Amitabh and Singh - Oxford Handbook of Urbanization in India.
5. Rao, M.S.A. (1981) - Some Aspects of Sociology of Migration, Sociological Bulletin.
6. Lee, Event - A Theory of Migration in Heer.
7. Ravenstein - The Law of Migration, Journal of Royal Statistical Society.
8. Datta - Human Migration : A Social Phenomenon.
9. Mukherji, Shekhar - Mechanisms of Under Development Labour.
10. Mukherji, Shekhar - Mechanisms of Under Development Labour.
11. Cherunilam, Francis - Migration : Causes, Correlates Consequences, Trends and Policies.
12. Jorden and Duvell - Migration Policy, Publication, London.


❑❑❑

# घटक : ४

# बिगर शासकीय संघटनांची विकासातील भूमिका

## (Role of NGOs in Development)

**अनुक्रमणिका**

४.० उद्दिष्ट्ये

४.१ प्रस्तावना

४.२ विषय विवेचन

- ४.२.१ ग्रामीण विकासातील बिगर शासकीय संघटनांची (एन. जी. ओं.) भूमिका
- ४.२.२ बिगर शासकीय संघटना (एन.जी.ओं.) आणि दुर्बल घटकांचे कल्याण
- ४.२.३ स्त्री विकासातील बिगर शासकीय संघटनांची (एन.जी.ओं.) भूमिका
- ४.२.४ मुलांच्या विकासातील बिगर शासकीय संघटनांची (एन.जी.ओं.) भूमिका
- ४.२.५ बिगर शासकीय संघटना आणि वृद्ध

४.३ सारांश

४.४ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

४.५ सरावासाठी प्रश्न

४.६ अधिक वाचनासाठी पुस्तके

## ४.० उद्दिष्ट्ये

या घटकाच्या अभ्यासानंतर आपणास,

१. ग्रामीण विकासातील बिगर शासकीय संघटनांची भूमिका समजण्यास मदत होईल.

२. दुबळ्या लोकांच्या कल्याणामधील बिगर शासकीय संघटनांची भूमिका समजावून घेता येईल.

३. स्त्री विकासातील बिगर शासकीय संघटनांची भूमिका समजून घेता येईल.

४. बिगर शासकीय संघटनांचे मुलांच्या विकासातील कार्य समजून घेता येईल.

५. वृद्धांच्या विकासातील बिगर शासकीय संघटनांची भूमिका व कार्य समजून घेता येईल.

## ४.१ प्रस्तावना :

जगातील प्रत्येक देशातील नागरिकांच्या कल्याणाची जबाबदारी ही त्या-त्या देशातील शासन यंत्रणेची असते. शासन यंत्रणेद्वारे लोकांच्या विकासाच्या व कल्याणाच्या विविध योजना आखल्या जातात व त्या प्रभावीपणे राबविण्याचा देखील प्रयत्न केला जातो. परंतु जेव्हा शासनयंत्रणा लोकांचा विकास साधण्यास तसेच लोकांच्या मुलभूत गरजा भागविण्यामध्ये कमी पडतात तेव्हा समाजातील लोकांचा व प्रामुख्याने संपूर्ण समाजाचाच विकास खुंटतो. अलिकडच्या काळामध्ये लोकांच्या विकासासाठी तसेच त्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी अनेक बिगर शासकीय संघटना पुढे आल्या आहेत. प्रस्तुत प्रकरणामध्ये आपण या बिगर शासकीय संघटनांची विकासातील भूमिका सविस्तरपणे अभ्यासणार आहोत.

## ४.२ विषय विवेचन :

या घटकामध्ये आपण ग्रामीण विकासातील बिगर शासकीय संघटनांची भूमिका, बिगर शासकीय संघटना आणि दुर्बल घटकांचे कल्याण, स्त्री विकासातील बिगर शासकीय संघटनांची भूमिका, मुलांच्या विकासातील बिगर शासकीय संघटनांची भूमिका आणि बिगर शासकीय संघटना आणि वृद्धांसाठीचे कार्य आपण या प्रकरणात सविस्तरपणे अभ्यासणार आहोत.

### ४.२.१ ग्रामीण विकासातील बिगर शासकीय संघटनांची (एन.जी.ओं.) ची भूमिका

**(Role of NGOs in Rural Development)**

**प्रस्तावना (Introduction) :**

भारतातील बिगर शासकीय संघटनांनी (NGOs) एकत्रित येऊन एका फेडरेशनची स्थापना केली आहे. या फेडरेशनच्या माध्यमातून या बिगर शासकीय संघटना ग्रामीण भागातील लोकांच्या समस्या, प्रश्न व समाज कारणांसंबंधी एकत्रित येऊन चर्चा करतात. या फेडरेशनच्या माध्यमातून सर्व बिगर शासकीय संघटना, की ज्या ग्रामीण भागातील लोकांच्या विकासासाठी काम करतात त्या एकमेकांना सहकार्य करतात व एकमेकांबरोबर समन्वय साधून काम करतात.

ग्रामीण विकासाच्या क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या भारतातील बिगर शासकीय संघटनांचे फेडरेशन हे अॅवॉर्ड (Award) या नावाने ओळखले जाते. अॅवॉर्ड चे पूर्ण रूप "Association of Voluntary Agencies in Rural Development" हे असून त्याचे मुख्य कार्यालय दिल्ली येथे आहे. अॅवॉर्ड या फेडरेशनची स्थापना ही सोसायटीज् अॅक्ट १८६० नुसार १९५८ साली झाली आहे. अॅवॉर्ड या फेडरेशनचे एकूण १२ संस्थापक सदस्य आहेत.

#### ४.२.१.१ अॅवॉर्ड (Award) फेडरेशनची प्रमुख उद्दिष्ट्ये

अॅवॉर्ड फेडरेशनची प्रमुख उद्दिष्ट्ये ही पुढील प्रमाणे आहेत.

१. बिगर शासकीय संघटनांच्या सहकार्याने ग्रामीण भागाचा विकास करणे.

२. ग्रामीण भागाच्या जलद विकासासाठी प्रयत्न करणे.

३. ग्रामीण विकासासंबंधीची माहिती लोकांपर्यंत पोहचविणे.

४. सेमिनार व कॉन्फरन्स्चे आयोजन करून ग्रामीण समस्येसंबंधी सर्व बिगर शासकीय संघटनांना एकत्रित करून या समस्या सोडविण्याबाबत त्यांच्यासोबत चर्चा करणे.

५. ग्रामीण समाजाच्या विकासासाठी निधीची उभारणी करणे.

६. ग्रामीण विकास क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या भारतातील व विदेशातील संघटनांबरोबर समन्वय साधून त्यांच्या बरोबर संपर्क प्रस्थापित करणे.

### ४.२.१.२ ग्रामीण विकासासाठी बिगर शासकीय संघटना (NGOs) ज्या क्षेत्रामध्ये काम करतात ती प्रमुख क्षेत्रे :

भारतामध्ये ग्रामीण विकासासाठी बिगर शासकीय संघटना (NGOs) या अनेक क्षेत्रामध्ये काम करीत असून ग्रामीण विकासामध्ये बिगर शासकीय संघटनांची भूमिका ही अत्यंत महत्त्वाची मानली जात आहे. बिगर शासकीय संघटना (NGOs) ग्रामीण विकासाच्या ज्या क्षेत्रामध्ये प्रामुख्याने काम करीत आहेत ती क्षेत्रे पुढीलप्रमाणे आहेत.

१. अतिमागास ग्रामीण भाग.

२. ग्रामीण भागातील साधन संपत्ती.

३. ग्रामीण भागातील लोकांच्या मानवी हक्कांसाठी.

४. ग्रामीण भागातील लोकांना मानवी हक्कांचे प्रशिक्षण देणे.

५. ग्रामीण भागातील लोकांना घरे बांधण्यासाठी मार्गदर्शन करणे.

६. ग्रामीण भागामध्ये संघटनांची स्थापना तसेच सामाजिक कृती गटाची (सोशल ॲक्शन ग्रुपची) स्थापना करणे.

७. सामाजिक कृती गटाच्या (सोशल ॲक्शन ग्रुपच्या) माध्यमातून शासकीय व बिगर शासकीय संघटनांमध्ये समन्वय साधणे.

८. ग्रामीण विकासामध्ये लोकांचा सहभाग वाढविणे.

९. ग्रामीण भागाच्या संपूर्ण विकासासाठी शासन यंत्रणा व लोकांना प्रेरित करणे व प्रोत्साहन दणे.

१०. ग्रामीण भागातील लोकांच्या मनामध्ये राष्ट्रीय एकात्मता रूजविणे.

११. ग्रामीण लोकांमध्ये शांतता व एकता प्रस्थापित करणे.

१२. ग्रामीण भागातील तळागाळातील युवकांमध्ये नेतृत्वगुण निर्माण करण्यासाठी प्रयत्न करणे.

१३. ग्रामीण लोकांचा सामाजिक व आर्थिक स्तर उंचावण्यासाठी प्रयत्न करणे.

१४. ग्रामीण भागातील सुशिक्षित बेरोजगारांना नोकरीच्या संधी उपलब्ध करून देणे.

१५. ग्रामीण भागामध्ये साक्षरता वाढविण्यासाठी प्रयत्न करणे.

१६. कुपोषण समस्येसंबंधी ग्रामीण भागील लोकांना सहकार्य करणे.

१७. ग्रामीण भागातील अशिक्षितपणा कमी करणे.

१८. ग्रामीण भागातील लोकांचा आर्थिक दर्जा उंचावण्यासाठी प्रयत्न करणे.

१९. लोकसंख्या वाढीस आळा घालण्यासाठी प्रबोधन करणे.

२०. बिगर शासकीय संघटना या ग्रामीण भागातील बेकारी दूर करण्यासाठी प्रयत्न करीत आहेत. ग्रामीण बेकारी दूर करण्यासाठी अनेक बिगर शासकीय संघटनांनी ग्रामीण उद्योगांची निर्मिती तसेच गृहोद्योगांची निर्मिती करून बेकार तरूणांना उद्योगांचे प्रशिक्षण देण्याचे कार्य हाती घेतले आहे.

२१. अनेक बिगर शासकीय संघटना या सामाजिक कल्याणासाठी प्रामुख्याने काम करीत आहेत. त्यामध्ये ग्रामीण लोकांचे आरोग्य, स्वच्छता, पोषण आहार, शिक्षण, कुटुंब कल्याण, बालकांचा विकास, स्त्रियांचा विकास, दुर्बल घटकांच्या उन्नतीसाठी प्रयत्न तसेच त्यांच्या रोजगारासाठीचे कार्य बिगर शासकीय संघटना करीत आहेत.

### ४.२.१.३ ग्रामीण भागाच्या शाश्वत विकासासाठी बिगर शासकीय संघटनांचे (NGOs) योगदान :

ग्रामीण भागाच्या शाश्वत विकासासाठी बिगर शासकीय संघटनांद्वारे (NGOs) पुढील क्षेत्रामध्ये प्रामुख्याने काम केले जाते. ती क्षेत्रे पुढीलप्रमाणे आहेत.

१. शेती आणि जमीन विकास संबंधीच्या क्रिया.

२. पाणी व्यवस्थापन व्यवस्था (लहान व मध्यम स्वरूपाची)

३. शेतीमध्ये नवीन तंत्रज्ञानाचा अवलंब करणे.

४. शेतीसंबंधीचे शिक्षण.

५. कुटुंब कल्याण आणि आरोग्य.

६. अनुसूचित जाती व जमातीतील महिलांच्या विकासासाठी प्रयत्न.

७. ग्रामीण भागातील दरिद्री लोकांची माहिती घेऊन त्यांच्या समस्या सोडविण्यासाठी संशोधन प्रकल्प राबविणे.

८. ग्रामीण पर्यावरणाचे रक्षण करणे, प्रदूषण नियंत्रण व सामाजिक वनीकरणाचे उपक्रम राबविणे इ.

## ४.२.२ बिगर शासकीय संघटना (NGOs) आणि दुर्बल घटकांचे कल्याण

## NGOs and Welfare of the Disables

### ४.२.२.१ शारिरीकदृष्ट्या दुर्बल घटकांची संकल्पना (The Concept of Disabled)

दुबळ्या (disabled) लोकांमध्ये समानार्थी किंवा एकजिनसीपणा दिसून येत नाही. दुर्बल लोकांमध्ये

मानसिकदृष्ट्या दुर्बल लोक, दृष्टी दुर्बलता असणारे लोक, ऐकणे व बोलण्यामध्ये असमर्थता असणारे लोक आणि सामान्य व्यक्तीप्रमाणे आपली गतिशीलता करण्यास असमर्थ असणाऱ्या लोकांचा समावेश हा वैद्यकीयदृष्ट्या दुर्बल (medical disabilities) लोकांमध्ये होतो की त्यांना विविध प्रकारच्या शारिरीक, मानसिक अडथळ्यांना सामोरे जावे लागते त्यांचा समावेश हा दुर्बल घटकांमध्ये होतो.

[The disabled people do not form a homogenous group. They include the mentally retarded, visually impaired, also hearing and speech impaired and those with restricted mobility or with so called "medical disabilities" and they all encounter different barriers, of different kinds, which have to be overcome in different ways.]

### ४.२.२.२ दुर्बल घटकांचे प्रकार (Types of Disability)

दुर्बल लोकांचे वर्गीकरण प्रामुख्याने दोन प्रमुख प्रकारामध्ये केले जाते. पहिल्या प्रकारामध्ये शारिरीकदृष्ट्या दुर्बल लोक (Physically disabled) व दुसऱ्या प्रकारामध्ये मानसिकदृष्ट्या दुर्बल लोक (Mentally disabled) या दोन प्रकारांचा समावेश होतो. शारिरीकदृष्ट्या दुर्बल लोकांमध्ये पाठीचे दुखणे (Spinal chord), दुखापत (Injury), शरिराचा एखादा अवयव कापून काढणे (Amputed limbs), दृष्टी दुर्बल असणे (Visual impairment), ऐकण्याची क्षमता दुर्बल असणे (Hearing impairment) यांचा समावेश होतो तर मानसिकदृष्ट्या दुर्बल लोकांमध्ये (Mentally disabilities) मानसिक आजार (Mental illness) व अडथळा (Mental retardation) असणाऱ्या लोकांचा समावेश होतो.

### ४.२.२.३ दुर्बल घटकांचा विस्तार (The Extent of Disability)

भारतामध्ये जवळ जवळ ७० मिलीयन लोक हे शारिरीकदृष्ट्या दुर्बल प्रवर्गामध्ये येतात. २००१ च्या जनगणनेनुसार एकूण लोकसंख्येच्या २.१३ टक्के लोक हे दुर्बल प्रवर्गामध्ये मोडतात. त्यापैकी ७५ टक्के लोक हे ग्रामीण भागामध्ये राहतात. दुर्बल लोकांपैकी फक्त ४९ टक्के लोक हे शिक्षित आहेत व ३४ टक्के लोकांना रोजगार उपलब्ध आहे. जगातील इतर देशातील दुर्बल लोकांचे त्या त्या देशातील एकूण लोकसंख्येपैकी प्रमाण पुढील सारणीवरून स्पष्ट होते.

**सारणी १**

**जगातील दुर्बल लोकांचे प्रमाण व देशाचे नाव**

| अ.नं. | देशाचे नाव | दुबळ्या घटकांचे प्रमाण |
|---|---|---|
| १. | ऑस्ट्रेलिया | १८ टक्के |
| २. | युनायटेड किंगडम | १४.१२ टक्के |
| ३. | युनायटेड स्टेटस् | ९ टक्के |
| ४. | चीन | ५ टक्के |
| ५. | नेपाळ | ५ टक्के |
| ६. | पाकिस्तान | ४.९ टक्के |

वरील सारणी क्रमांक १ वरून असे दिसून येते की, ऑस्ट्रेलियामध्ये एकूण लोकसंख्येच्या १८ टक्के लोक हे दुर्बल प्रवर्गामध्ये मोडतात तर युनायटेड किंगडम मध्ये १४.१२ टक्के लोक, युनायटेड स्टेटस् मध्ये ९ टक्के लोक, चीनमध्ये ५ टक्के लोक, नेपाळमध्ये ५ टक्के लोक, तर पाकिस्तानमध्ये एकूण लोकसंख्येच्या ४.९ टक्के लोक हे दुबळ्या प्रवर्गामध्ये मोडतात.

### ४.२.२.४ विकसनशील राष्ट्रांमधील दुर्बल घटकांचा विस्तार

विकसनशील राष्ट्रांमधील दुर्बल घटकांचा विस्तार हा पुढीलप्रमाणे दिसून येतो.

१. जवळ जवळ १०० मिलीयन लोक हे कुपोषित आहेत.

२. 'अ' जीवनसत्वा अभावी २,५०,००० मुले ही प्रत्येक वर्षी अंध बनत आहेत.

३. आयोडिनच्या अभावाने ८०० मिलीयन लोक हे विविध रोगांना बळी पडत आहेत.

४. मुलांना जन्मास घालतेवेळी १ लाख स्त्रिया मृत्युमुखी पडत आहेत.

५. विकसनशील देशातील ४० टक्के मुले ही ऐकण्याची क्षमता गमावत आहेत.

६. सन १९९४ मध्ये पोलिओच्या १ लाख नवीन केसेस दिसून आल्या.

### ४.२.२.५ दुर्बल घटकासंबंधीचे राष्ट्रीय धोरण (National Policy for the Disabled)

The National Policy for persons with disability, announced (February, 2006). The National Policy of persons with disability includes : extending rehabilitation services to rural areas; increasing trained personnel to meet needs; emphasizing education and training; increasing employment opportunity; focusing on gender equality; improving access to public services; encouraging state governments to develop a comprehensive social security policy; ensuring equal opportunities in sports, providing service to persons with disability and their families.

फेब्रुवारी २००६ मध्ये दुर्बल (disable) लोकांसाठीचे राष्ट्रीय धोरण जाहीर करण्यात आले या धोरणामध्ये पुढील बाबींचा समावेश करण्यात आला आहे. त्या बाबी पुढीलप्रमाणे आहेत.

१. ग्रामीण भागातील पुनर्वसन सेवांचे विस्तारीकरण करणे.

२. प्रशिक्षित लोक तयार करणे.

३. रोजगारामध्ये वाढ करणे.

४. लिंग समानता प्रस्थापित करणे.

५. लोक सेवांमध्ये वाढ करणे.

६. राज्य सरकारांना सामाजिक सुरक्षा धोरणाची अंमलबजावणी करण्यास भाग पाडणे.

७. खेळामध्ये सर्वांना समान संधी उपलब्ध करणे.

८. दुर्बल लोक (Disable people) व त्यांच्या कुटुंबियांसाठी सेवा पुरविणे.

#### ४.२.२.६ सन १९९५ चा दुर्बल घटकांसाठीचा कायदा (The Disability Act 1995)

दुर्बल लोकांसाठी समान संधी व त्यांच्या अधिकारांचे रक्षण करण्यासाठी सन १९९५ साली भारतीय पार्लमेंट मध्ये कायदा केला गेला.

#### ४.२.२.७ दुर्बल घटकांचे पुनर्वसन व विकासातील बिगर शासकीय संघटनांची (NGOs) भूमिका :

सन १८१० मध्ये कलकत्यामध्ये लेप्रसीने ग्रस्त असणाऱ्या लोकांना बिगर शासकीय संघटनांद्वारे (NGOs) सर्वप्रथम मदत केली गेली. सन १८२६ मध्ये अंध लोकांसाठी राजा काली शंकर घोसाल यांनी ईस्ट इंडिया कंपनीकडून निधी घेऊन त्यांच्यासाठीचे महत्त्वपूर्ण कार्य केले. दुर्बल (Disabled) लोकांच्या पुनर्वसन कार्यामध्ये बिगर शासकीय संघटनांची भूमिका ही अत्यंत महत्त्वाची मानली जाते. अलिकडच्या काळामध्ये आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय संस्था या दुर्बल व्यक्तींच्या सहकार्यासाठी आर्थिक मदत देत आहेत. आंतरराष्ट्रीय संस्थांमध्ये जागतिक बँक (World Bank), जागतिक आरोग्य संघटना (World Health Organization), युनिसेफ (UNICEF), आंतरराष्ट्रीय कामगार संघटना (International Labour Organization), इत्यादी प्रमुख संस्थांचा समावेश होतो.

सामाजिक न्याय मंत्रालय हे बिगर शासकीय संघटनांच्या मदतीने दीन दयाल पुर्नवसन योजनेअंतर्गत दुर्बल (disable) लोकांच्या कल्याणासाठी निधी उपलब्ध करून देत आहे. ही योजना यशस्वीरित्या राबविण्यासाठी शासन बिगर शासकीय संघटनांना उत्तेजन देत आहे. दुर्बल व्यक्तीसाठीच्या कल्याणासाठी असणाऱ्या विभागाद्वारे व बिगर शासकीय संघटनांचा सहकार्याने दुर्बल लोकांच्या समुदायाच्या कल्याणासाठी व विकासासाठी सेमिनार व वर्कशॉपचे आयोजन केले जात आहे. या विभागाद्वारे बिगर शासकीय संघटनांसाठी राज्य स्तरावर विविध कार्यक्रमांचे नियोजन केले जाते.

#### ४.२.२.८ ग्रामीण भागातील दुर्बल घटकांसाठीचे बिगर शासकीय संघटनांचे कार्य

#### (NGOs Working for the Rural Disabled)

बिगर शासकीय संघटना (NGOs) या ग्रामीण भागातील दुर्बल (disable) लोकांसाठी शिक्षण, व्यावसायिक प्रशिक्षण, आणि रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याचे अत्यंत महत्त्वपूर्ण कार्य करीत आहेत. ग्रामीण भागातील लोकांना लागणाऱ्या वस्तू व सेवा तसेच वैद्यकीय सेवा या मोफत पुरविण्याचे काम एन.जी.ओं. द्वारे केले जात आहे.

#### ४.२.२.९ स्वयंसाहाय्यता बचत गटांद्वारे दुर्बल घटकांचे सक्षमीकरणातील एन.जी.ओं. ची भूमिका

#### (NGOs and Empowerment of the Disabled Through SHGs)

भारतातील एन.जी.ओं. नी सेल्फ हेल्प ग्रुपच्या माध्यमातून १९९० च्या मध्यापासून दुर्बल लोकांसाठीचे कार्य सुरू केले आहे. दक्षिण भारतातील अनेक एन.जी.ओं. या सेल्फ हेल्प ग्रुपच्या माध्यमातून दुर्बल (disable) लोकांसाठी कार्य करीत आहेत. दुर्बल लोकांनी ग्रामीण भागामध्ये अनेक सेल्फ हेल्प ग्रुप सुरू करून या ग्रुपच्या माध्यमातून दुर्बल लोकांना कमी व्याजदरातील कर्ज देणे, आरोग्य सेवा पुरविणे, शिक्षणाच्या सोयी उपलब्ध करून देणे, व्यावसायिक प्रशिक्षण देणे इ. बाबीसंबंधीच्या सेवा पुरविल्या जात आहेत.

### ४.२.३ स्त्री विकासातील बिगर शासकीय संस्थांची भूमिका

### (Role of NGOs in the Development of Women)

स्त्री-मुक्ती, स्त्री-पुरूष समानता आणि स्त्री शक्ती या संकल्पना आज आपणास नव्या नाहीत. स्त्री संघटना, महिला आघाडी, स्त्री आधार केंद्र, स्त्री मुक्तीची चळवळ, स्त्रियांचे सबलीकरण, सक्षमीकरण, स्त्रियांच्या स्वयंसेवी संस्था, स्त्रियांसाठीचे आरक्षण या सर्व विषयांशी लोक सध्या परिचित होताना दिसून येत आहेत. मात्र स्त्री प्रश्नाविषयीची जाण ही संयुक्त राष्ट्रांनी (United Nation) १९७५ हे वर्ष आंतरराष्ट्रीय महिला वर्ष म्हणून घोषित केल्यानंतरच वाढली आणि वर उल्लेख केलेल्या संकल्पनांचा मोठ्या प्रमाणात प्रसार झाला. याचाच परिणाम म्हणून आज स्त्रीशक्ती, स्त्रीमुक्ती आणि स्त्री-पुरूष समानतेची चळवळ ही अर्थकारण, समाजकारण आणि राजकारणाच्या चर्चा विश्वाच्या केंद्रस्थानी येऊन ठेपली आहे.

स्वातंत्र्यपूर्व काळात भारतीय समाजातील स्त्री-जीवनाशी संबंधित महत्त्वाच्या प्रश्नांवर या काळात चर्चा सुरू झाली. राजा राममोहन रॉय, केशवचंद सेन, ईश्वरचंद विद्यासागर, लोकहितवादी गोपाल हरी देशमुख, भाऊ दाजी, महात्मा जोतिबा फुले, गोपाल गणेश आगरकर, महादेव गोविंद रानडे, पंडिता, रमाबाई रानडे, काशिबाई कानिटकर, डॉ. आनंदीबाई जोशी, लक्ष्मीबाई टिळक, महात्मा गांधी आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कृतिशील योगदानामुळे भारतीय समाजामध्ये प्रबोधनाची परंपरा समृद्ध झाली.

१८२९ मध्ये सती प्रथेवर कायदेशीर बंदी घालण्यापासून ब्रिटीश शासनाने स्त्रियांच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नांना हात घालण्यास सुरूवात केली. तसेच विवाहाच्या संमतीचे वय काय असावे हा प्रश्न चर्चिला गेला त्यामागे बालविवाह प्रथेला रोखण्याचा हेतू होता. विधवांचे केशवपन आणि परंपरेने त्यांच्या पुर्नविवाहावर लादलेली बंदी, हे देखील ब्रिटीशकाळात कळीचे प्रश्न होते. स्त्रियांना शिक्षणाचा अधिकार असावा त्यांच्यामध्ये शिक्षणप्रसार व्हावा याचाही आग्रह समाजसुधारकांनी धरला.

स्त्रीशक्तीला भारतामध्ये खऱ्या अर्थाने जागे करून त्यांच्यात आत्मभान निर्माण करण्याला प्रारंभ १९ व्या शतकात झाला परंतु या काळात स्त्रियांची चळवळ उभी राहिली नाही. १८८५ मध्ये काँग्रेसची स्थापना झाली. १९१५ पर्यंत म्हणजे पहिल्या ३० वर्षात अपवाद वगळता, महिला उपस्थित नसायच्या. काँग्रेसच्या अधिवेशन सभा मंडपातच सुरवातीस काही काळ सामाजिक परिषद भरविल्या जात. या सभांमध्ये न्या. महादेव गोविंद रानड्यांचा पुढाकार असे अशा परिषदांमधून समाजातील स्त्रियांचा दर्जा, त्यांचे प्रश्न मांडले जात. पण राजकारण आणि समाजकारणाचे हे प्रारंभीचे सख्य फार काळ टिकले नाही. त्याबाबत काँग्रेसजनांमध्ये मतभेद होते. संमती वय प्रश्नावर टिळक-आगरकर वाद होता. वसाहतवादी ब्रिटीश सत्तेशी लढताना त्या स्वातंत्र्य चळवळीत, म्हणजे काँग्रेस व्यासपीठावर आणि संघटनेत, स्त्रियांचे प्रतिनिधित्व नसणे महात्मा गांधीजींना खटकले आणि त्यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेसच्या संघटनेत आणि चळवळीत स्त्रियांचा सहभाग प्रयत्नपूर्वक वाढविण्यात आला.

समाजातील ५० टक्के घटक असलेल्या स्त्रियांच्या प्रश्नांचा फारसा विचार न करताच स्वातंत्र्यानंतरच्या पहिल्या २५ वर्षातील आर्थिक विकासाचे धोरण तयार केले गेले होते. परंतु स्त्रियांच्या वाट्याला दु:खच आल्याचे दिसून येते. भारतीय संविधानाने सार्वत्रिक प्रौढ मताधिकार पुरूषांप्रमाणे स्त्रियांनाही दिला. सध्या मतदानाचा अधिकार १८ वर्षानंतर प्राप्त होतो. मात्र राजकीय सत्ता संरचनेत स्त्रियांना आजदेखील स्थान

मिळाले नाही. या सर्व प्रक्रियेतील त्यांचा सहभाग हा अत्यंत कमी असल्याचे दिसून येते.

संघटित पद्धतीने स्त्री-जागृती केल्याशिराय स्त्रियांच्या वाट्याला येणारे अन्याय, अत्याचार, छळ त्यांना दिली जाणारी विषम वागणूक दूर होणार नाही आणि संघटित चळवळीचे अंतिम उद्दिष्ट स्त्री-पुरूष समानतेचा आग्रह धरून गरज पडल्यास संघर्ष करून, सत्ता-संरचनेत बदल घडवून आणणे हेच आहे. अशा प्रकारची जाणीव जागृती आंतरराष्ट्रीय महिला वर्षापासून अधिक प्रकर्षाने वाढू लागली. त्याच सुमारास स्त्री अभ्यास अशा स्वतंत्र ज्ञानक्षेत्राला मान्यता देऊन विद्यापीठ अनुदान आयोगाने अशा निवडक अभ्यास केंद्राना पायाभूत सुविधांसाठी आणि संशोधनासाठी अर्थसाहाय्य देणे सुरू केले हे सर्व स्त्रीयांच्या संघटित लढ्याचे प्रमुख यश होते.

आज वेगवेगळे वैचारिक अधिष्ठान आणि उद्दिष्ट स्वीकारून असंख्य बिगर शासकीय संघटना (NGOs) महिलांसाठी काम करीत आहेत. यापैकी काही बिगर शासकीय संघटना या स्त्री साक्षरतेचे काम करीत आहेत. काही संघटना या पाणी, निवारा व स्त्रियांच्या रोजगाराच्या प्रश्नासंबंधी लढा देत आहेत. काही संघटना व स्त्री चळवळी पर्यावरणाच्या प्रश्नावर काम करीत आहेत. तसेच विकास प्रकल्पातून होणारे विस्थापन व या विस्थापनातून निर्माण होणारे विस्थापितांचे प्रश्न यासंबंधी स्त्रियांमध्ये सामूहिकरित्या जाणीव जागृती करण्याचे काम करीत आहेत. या सर्वांचा एकत्रित परिणाम झालेला दिसून येतो. या लढ्यामुळे आज प्रसारमाध्यमे, साहित्य क्षेत्र, कला क्षेत्रामध्ये तसेच विविध राजकीय पक्षांच्या आघाडीमध्ये महिलांची स्वतंत्र आघाडी निर्माण केली जात आहे आणि यावरून समाजामध्ये लिंगविषमाधिष्ठीत विषमता हळूहळू कमी होताना दिसून येते.

अलिकडच्या काळामध्ये एन.जी.ओं. ची भूमिका ही स्त्रियांच्या उन्नतीसाठी अत्यंत महत्त्वाची मानली जात आहे. एन.जी.ओं. द्वारे स्त्रीयांच्या सामाजिक-आर्थिक प्रगतीसाठी आरोग्य, जाणीवेसंदर्भात, शिक्षणासंदर्भात तसेच त्यांच्या कुटुंबातील दर्जासंदर्भात आज एन.जी.ओं. महत्त्वाची भूमिका बजावत आहेत. आज महिलांसंबंधी कार्य करणाऱ्या अनेक एन.जी.ओं. द्वारे महिलांसाठी घरे, स्वच्छतेच्या सवयी, आरोग्य सेवा, शिक्षण, पोषण आहार, या सर्व बाबींसंबंधी अत्यंत महत्त्वपूर्ण कार्य केले जात आहे. स्त्रियांच्या प्रश्नासंबंधी काम करणाऱ्या अनेक एन.जी.ओं. चे ध्येय हे गरिब सत्ताहिन स्त्रियांच्या हितासाठी त्यांच्या विकासासाठी काम करणे हे आहे.

स्त्रियांच्या प्रश्नासंदर्भात काम करणाऱ्या एन.जी.ओं. मध्ये सन १९२७ साली स्थापन झालेली ''ऑल इंडिया वुमन कॉन्फरन्स'' (All India Women's Conference - AIWC) या संघटनेचा प्रामुख्याने उल्लेख करता येईल. ही संघटना गांधी व पाश्चात्य उदारमतवादी विचारांनी प्रेरित आहे. या संघटनेचे प्रमुख उद्दिष्ट हे स्त्रीयांचे कल्याण करणे हे आहे. सध्या या संघटनेचे एक लाख सदस्य व संपूर्ण भारतभर या संघटनेच्या ४०० शाखा आहेत. ही संघटना प्रामुख्याने कुटुंबनियोजन, बालकल्याण, स्त्रीयांसाठी आवश्यक असणारी वसतीगृहे आणि अपारंपारिक उर्जा स्त्रोत या क्षेत्रामध्ये प्रामुख्याने काम करीत आहे. या संघटनेचे प्रमुख उद्दिष्ट हे स्त्रियांचा समाजातील दर्जा उंचावणे व त्यांची विविध प्रश्नांपासून सोडवणूक करणे हे आहे.

श्रमिक महिला संस्था ही संघटना देखील महिलासंबंधी कार्य करणारी महत्त्वाची संघटना आहे. या संघटनेची स्थापना ही सन १९७१ मध्ये झाली. ही संघटना मार्क्सवादी विचारांनी प्रेरित आहे. ही संघटना प्रामुख्याने मध्यमवर्गीय व श्रमीक महिलांसाठी अत्यंत महत्त्वाचे कार्य करते.

''सेल्फ एम्प्लॉइड वुमन्स् असोसिएशन'' (Self Employed Women's Assocaition - SEWA) ही गुजरात राज्यातील अहमदाबाद येथे स्त्रीयांसंबंधी कार्य करणारी संघटना आहे. ही संघटना प्रामुख्याने असंघटित क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या महिलांसंबंधी काम करते. या संघटनेद्वारा लक्षावधी महिलांना स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्या आहेत.

### ४.२.४ मुलांच्या विकासातील बिगर शासकीय संघटनांची भूमिका :

### (Role of NGOs in the Development of Children)

मुले (Children) ही प्रत्येक राष्ट्रांची संपत्ती असतात कारण या मुलांवरच त्या राष्ट्राचे भवितव्य अवलंबून असते. अनेक कारणांमुळे विकसित व अविकसित राष्ट्रांमधील मुलांचे भवितव्य हे सुरक्षित नसल्याचे दिसून येते. विकसनशील राष्ट्रांमध्ये प्रत्येक वर्षी सुमारे १५ मिलीयन मुले ही मृत्युमुखी पडतात तर सुमारे १२० मुले ही प्रत्येक मिनीटास जन्म घेतात. भारतामध्ये पाच वर्षाखालील ७५ मिलीयन मुले ही कुपोषित आहेत. तसेच जन्मलेल्या तीन मुलांपैकी एक मूल हे कमी वजनाचे जन्मते. पाच वर्षाखालील मुलांमध्ये प्रत्येकी सात मुलांपैकी एकाचा मृत्यू होतो असे प्रत्येक वर्षाला ३ मिलीयन मुले मृत्युमुखी पडतात.

जन्मास येणाऱ्या प्रत्येक मुलास आरोग्य, योग्य पोषण आहार, शिक्षण आणि संरक्षण मिळत नाही. दरिद्री अवस्थेमध्ये अनेक लोक राहत असलेने ते आपल्या मुलास घर, कुटुंबाचे संरक्षण तसेच ते आपली पालकत्वाची जबाबदारी नीटपणे पेलू शकत नाहीत. अतिशय दारिद्रयामधील मुले ही रसत्यावर (Streets), बस स्टेशन, रेल्वे स्टेशन, मार्केट आणि इतर ठिकाणे याठिकाणी वावरतात व या वातावरणात त्यांच्या नैसर्गीक वाढीमध्ये अडथळे निर्माण होतात. ८० मिलीयन मुले ही शाळेपासून वंचित आहेत. तसेच ०४ मिलीयन मुले ही बालकामगार म्हणून काम करतात. दि नॅशनल प्लॅनिंग कमिशन नुसार भारतामध्ये १४ वर्षाखालील ०.५ टक्के मुले ही अनाथ आहेत.

चौधरी यांनी १९८९ मध्ये केलेल्या अभ्यासामध्ये निराप्रित व दरिद्री मुलांना ओळखण्याच्या कसोट्या (Criteria to identify a destitute children) पुढीलप्रमाणे सांगीतल्या आहेत.

१. ज्या मुलांचे वडील, आई यांचे निधन झाले आहे ती मुले निराश्रीत व दरिद्री मुले (destitute children) म्हणून ओळखली जातात.

२. ज्या कुटुंबाची प्रमुख ही महिला आहे व मुलाचे वडील मुलाला सोडून गेले आहेत त्या मुलांचा समावेश दरिद्री मुलांमध्ये होतो.

३. ज्या मुलास फक्त आई आहे, परंतु ती त्या मुलाचे संरक्षण करण्यास, त्यास शिक्षण आणि विविध प्रकारचे प्रशिक्षण देण्यास कमी उत्पन्नामुळे असमर्थ आहे अशा मुलांचा समावेश दरिद्री मुलांमध्ये होतो.

४. एकट्या पालक कुटुंबातील मुले.

५. पालकांच्या दीर्घकालीन आजारामुळे दरिद्री बनलेली मुले.

६. विचलित वर्तनामुळे दरिद्री बनलेली मुले.

**मुलांच्या विकासातील बिगर शासकीय संघटनांची भूमिका :**

**(Role of NGOs in the Development of Children)**

मुलांच्या विकासामध्ये एन.जी.ओं. ची भूमिका अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. मुलाच्या विकासासाठी शासकीय पातळीवर देखील प्रयत्न केले जातात. त्याबरोबरच स्वयंसेवी संघटना देखील मुलांचे कल्याण व विकासासाठी प्रयत्नशील आहेत. अतिशय दारिद्र्यामध्ये जीवन जगणाऱ्या मुलांच्या (destitute children) पुनर्वसनासाठी एन.जी.ओं. अत्यंत महत्त्वपूर्ण कार्य करत आहेत. भारतातील एन.जी.ओं. ची सामाजिक कार्यातील भूमिका अत्यंत महत्त्वपूर्ण मानली गेली आहे. परोपकारी लोक (Philanthropists), मिशनरी साधू (Missionaries Saints), आणि राजा यांचे मुलांच्या कल्याणासंबंधीचे कार्य महत्त्वपूर्ण मानले गेले आहे.

पूर्वी गरीब ब्राम्हण, विद्यार्थी हे आपल्या अभ्यासादरम्यानच्या कालावधीमध्ये गावातील लोकांच्या घरामधून अन्न गोळा करीत असत तसेच अन्नछत्र व मठ जे दानशूर व्यक्तींद्वारे चालविले जात होते यामधून गरिब मुलांच्या जेवणाची व राहण्याची व्यवस्था केली जात असे. भारतामध्ये मध्ययुगीन कालखंडात, समुदायाद्वारे चालविल्या गेलेल्या मठांमधून व आश्रमांमधून मुलांना शिक्षण दिले जात होते.

मिशनरीज् व दानकार्य करणाऱ्या संस्थांनी अनाथ मुलांसाठी शिक्षणाची केंद्रे, वाचनालये व शैक्षणिक संस्था या सेवाभावी वृत्तीतून सुरू केल्या. रामकृष्ण मिशन, मुस्लीम वक्फ बोर्ड, मुस्लीम शैक्षणिक ट्रस्ट, आर्य समाज आणि हिंदू, शीख, जैन व पारसी यांच्या चॅरीटेबल ट्रस्ट यांनी भारतातील विविध भागातील गरजू, अनाथ मुलांसाठीच्या कल्याणामध्ये अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावली आहे.

ख्रिश्चन मिशनऱ्यांनी अनाथ मुलांच्या कल्याणामध्ये महत्त्वाची भूमिका पार पाडली आहे त्यांनी देशामध्ये अनेक ठिकाणी अनाथ मुलांच्यासाठी निवासस्थाने उभारली आहेत. या सर्व प्रयत्नांमुळे बालकांच्या विकासासाठी देशभरामध्ये अनेक स्वयंसेवी संघटना उभारल्या गेल्या त्यामध्ये मुंबई येथील १९२० मध्ये स्थापन झालेली Balkan-Ji-Bari संस्था, १९२६ मध्ये स्थापन झालेली All India Women's Conference देखील मुलांच्या विकासासाठी प्रयत्न करणारी संस्था आहे. तसेच कस्तुरबा गांधी मेमोरियल ट्रस्ट (१९४२), आंध्र महिला सभा (१९३७), भारतीय ग्रामीण महिला संघ (१९५५) आणि महाराष्ट्रातील नूतन बाल शिक्षण संघ या सर्व संघटनांनी आपले लक्ष हे मुलांच्या कल्याणाकडे व विकासाकडे वळविल्याचे दिसून येते.

**४.२.५ बिगर शासकीय संघटना आणि वृद्ध (NGOs and the Aged)**

संपूर्ण जगामध्ये तसेच भारतात वृद्धांची संख्या वाढतच आहे आणि वृद्धांच्या वाढीचे प्रमाण सर्वसाधारण लोकसंख्येच्या वाढीच्या प्रमाणापेक्षा जास्त आहे. वृद्धांच्या वाढत्या संख्येमुळे या शतकात

अनेक समस्या निर्माण होणार आहेत. या शतकात अनेक वृद्ध वयाची शंभरी गाठलेले असणार आहेत. वाढत्या वृद्धांच्या संख्येची वृद्धापकाळात जबाबदारी घेण्यासाठी वेळीच समायोजन केल्यास या शतकातील वृद्धांचे प्रश्न सुकर होणार आहेत. वृद्धांच्या वाढत्या संख्येचे व्यवस्थापन केवळ कुटुंब अगर शासन किंवा एखादी स्वयंसेवी संस्था अशा एखाद्या घटकाने करून भागणार नाही तरी सुद्धा ज्येष्ठोपयोगी सामाजिक संस्थांचे समाजातील स्थान लक्षात घेता वृद्धांच्या वाढत्या समस्या या स्वयंसेवी संघटना योग्य रितीने सोडवू शकतील असे दिसून येते.

मागील काही वर्षापासून भारतात वृद्धांच्या प्रश्नाने अधिक गंभीर स्वरूप धारण केले आहे. त्यापूर्वी वृद्ध वडीलधाऱ्यांच्या पालनपोषणाची व्यवस्था ही मुख्यत्वे त्यांच्या कुटुंबातूनच होत असे. आजदेखील कुटुंबसंस्था हाच वृद्धांच्या निर्वाहाचा मुख्य आधार आहे.

पूर्वीच्या काळी निराधार वृद्धांना सामान्यत: धर्मशाळा, मठ, मंदिरे अशा धार्मिक स्थळी आश्रय मिळत असे. विशेषत: तीर्थक्षेत्रांच्या ठिकाणी वृद्धांची भोजन-निवासाची सोय होत असे. काही खेड्यांमध्ये ग्रामपंचायतीमार्फत अशी व्यवस्था केली जात असे. अरूणाचल प्रदेशातील 'केबांग' या ग्रामपरिषदेमार्फत अपंग व वृद्ध व्यक्तींच्या निर्वाहाची व्यवस्था, त्यांची तशी इच्छा असल्यास कायम अतिथी म्हणून अजूनही केली जाते. भारतात वृद्ध कल्याण कार्यक्रमाची योजनाबद्ध सुरवात १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात झाली. काही सेवाभावी संघटनांनी या काळात वृद्धांसाठी मदत कार्य सुरू केले. भारतात पहिल्यांदा १८४० मध्ये बेंगलोर येथे 'दि फ्रेंड इन नीड सोसायटी' ही वृद्ध विकलांगासाठी कार्य करणारी अशा स्वरूपाची पहिली संस्था स्थापन झाली.

स्वातंत्र्यपूर्व काळापासून भारतात वृद्धांसाठी काही विशेष संस्था उभ्या राहू लागल्या. १८६५ मध्ये पुणे येथे ''डेव्हीड ससून इन्फर्म असायलम'' ही संस्था स्थापन झाली. तिच्यामार्फत वृद्धांना अन्न, वस्त्र, निवारा पुरविला जात असे. ही संस्था ''निवारा'' या नावाने आजही वृद्धांसाठी मदत कार्य करीत आहे.

१८८२ पासून ''लिटल सिस्टर्स ऑफ द पुअर'' या कोलकत्ता येथील संस्थेने वृद्धांना निवारा, वस्त्रे व वैद्यकीय सेवा पुरविण्याचे कार्य हाती घेतले. याच संस्थेने गोरगरीब वृद्धांसाठी अशी सेवाकेंद्र चेन्नई, बेंगलोर, सिकंदराबाद येथेही उभारली, गुजरात मध्ये सुरत येथे १९१२ मध्ये ''अशक्त आश्रय'' सुरू झाला. तर, १९६१ मध्ये नागपूर येथे मातृसेवा संघातर्फे 'पंचवटी' वृद्धाश्रम सुरू झाला.

इंग्लंडमध्ये दुसऱ्या महायुद्धानंतर 'लेनर्ड चेशर' याने अपंग व वृद्ध व्यक्तींसाठी अनेक निवारागृहे स्थापन केली होती. त्याने १९५५ मध्ये भारताला भेट दिली व नंतर वृद्धांसाठी मुंबई, पुणे, डेहराडून, दिल्ली, जमशेदपूर, कोलकत्ता, श्रीरामपूर अशा अनेक शहरांमध्ये निवारागृहे स्थापन केली.

'इंटरनॅशनल फेडरेशन ऑफ एजिंग' या जागतिक संघटने अंतर्गत भारतात ''हेल्प एज इंडिया १९७६ पासून वृद्धांच्या संदर्भात सेवाकार्य करीत आहे. या संस्थेचे मध्यवर्ती कार्यालय दिल्लीत आहे तर देशभरात चोवीस विभागीय कार्यालये आहेत.

भारतातील वृद्धांची वाढती संख्या आणि त्याचबरोबर वृद्धांच्या वैयक्तिक, कौटुंबिक, सामाजिक, आर्थिक, शारिरीक व मानसिक समस्या विचारात घेऊन त्यांचे सर्वांगीण निरसन, समाजप्रबोधन व पुनर्वसन

करण्याच्या उद्देशाने ही संस्था अस्तित्वात आली. याबरोबरच इतर सेवाभावी संस्थाना आर्थिक साहाय्य करणे, समाजोपयोगी कार्यात वृद्धांचा सहभाग वाढविण्यासाठी प्रयत्नशील राहणे, ही देखील या संस्थेची उद्दिष्टे आहेत.

'हेल्प एज इंडिया' या संस्थेच्या वतीने जयपूर येथे १९९३ मध्ये पहिली अखिल भारतीय वृद्ध परिषद भरविण्यात आली होती. तसेच पहिली जागतिक वृद्ध परिषदही भारतातच १९९४ मध्ये भरविण्यात आली. त्यानंतर १९९५ मध्ये दुसरी जागतिक वृद्ध परिषद 'जेरूसेलम' येथे पार पडली.

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न**

**अ) रिकाम्या जागा भरा**

१. ग्रामीण विकासाच्या क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या भारतातील एन.जी.ओं. चे फेडरेशन हे ........ नावाने ओळखले जाते.

२. ॲवार्ड फेडरेशनची स्थापना .......... साली झाली.

३. दुर्बल लोकांसाठीचे राष्ट्रीय धोरण ........... साली जाहीर करण्यात आले.

४. संयुक्त राष्ट्रांनी आंतरराष्ट्रीय महिला वर्षे ............ साली घोषित केले.

५. ऑल इंडिया वुमन कॉन्फरन्स् या संघटनेची स्थापना ........ साली झाली.

६. श्रमिक महिला संस्था या संघटनेची स्थापना ......... साली झाली.

७. सेल्फ एम्प्लॉइड वुमन्स् अयोसिएशन ही संघटना प्रामुख्याने ......... क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या महिलांसंबंधी काम करते.

८. वृद्ध विकलांगासाठी कार्य करणाऱ्या भारतातील पहिली संघटना ........ या नावाने ओळखली जाते.

९. .......... या संस्थेच्या वतीने जयपूर येथे पहिली अखिल भारतीय वृद्ध परिषद भरविण्यात आली.

१०. पहिली जागतिक वृद्ध परिषद ......... देशामध्ये भरविण्यात आली.

**ब) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. ग्रामीण क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या भारतातील एन.जी.ओं. चे ॲवार्ड फेडरेशनचे पूर्ण रूप लिहा.

२. ॲवार्ड फेडरेशनचे मुख्य कार्यालय कोठे आहे.

३. ॲवार्ड फेडरेशनची दोन प्रमुख उद्दिष्टे लिहा.

४. भारतातील एन.जी.ओ. नी कोणत्या वर्षापासून दुर्बल लोकांसाठी कार्य सुरू केले.

५. स्त्रीयांच्या प्रश्नांसंदर्भात काम करणाऱ्या दोन एन.जी.ओं. ची नावे लिहा.

६. स्त्री प्रश्नांसंबंधी काम करणाऱ्या सेवा (SEWA) या संघटनेचे पूर्ण रूप लिहा.

७. AIWC या एन.जी.ओ. चे पूर्ण रूप लिहा.

८. सेल्फ एम्प्लॉइड वुमन्स् असोसिएशन (SEWA) या एन.जी.ओ. ची स्थापना कोठे झाली.

९. दुसरी जागतिक वृद्ध परिषद कोणत्या देशामध्ये पार पडली.

१०. कोणत्या साली पहिली अखिल भारतीय वृद्ध परिषद भरविण्यात आली होती.

## ४.३ सारांश :

प्रस्तुत प्रकरणामध्ये सर्वप्रथम आपण ग्रामीण विकासातील बिगर शासकीय संघटनांची (NGOs) भूमिका अभ्यासत असताना भारतातील बिगर शासकीय संघटनांनी एकत्रित येऊन स्थापन केलेल्या 'ॲवार्ड' या फेडरेशनच्या माध्यमातून एन.जी.ओं. या ग्रामीण भागातील लोकांच्या समस्या, त्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी एकत्रित येऊन त्यावर चर्चा करतात. तसेच या फेडरेशनच्या माध्यमातून सर्व एन.जी.ओ. की ज्या ग्रामीण भागातील लोकांच्या विकासासाठी काम करतात त्या सर्व एकमेकांना सहकार्य करतात व एकमेकांबरोबर समन्वय साधून काम करतात. यानंतर आपण ॲवार्ड या फेडरेशनची प्रमुख उद्दिष्ट्ये, ग्रामीण विकासासाठी एन.जी.ओ. ज्या क्षेत्रामध्ये काम करतात त्या प्रमुख क्षेत्रांचा सविस्तर आढावा घेतला. तसेच ग्रामीण भागाच्या शाश्वत विकासासाठी एन.जी.ओ. चे योगदान आपण अभ्यासले. त्यानंतर आपण, दुर्बल लोकांची संकल्पना अभ्यासताना दुर्बल लोकांचे वर्गीकरण हे प्रामुख्याने दोन प्रमुख प्रकारामध्ये केले जाते हे अभ्यासले. त्यानंतर आपण, दुर्बल लोकांचा विस्तार कसा होत गेला, दुर्बल लोकांसाठीचे राष्ट्रीय धोरण, सन १९९५ चा दुर्बल लोकांसाठीचा कायदा, दुर्बल लोकांच्या पुनर्वसन व विकासातील एन.जी.ओ. ची भूमिका, ग्रामीण भागातील दुर्बल लोकांसाठीचे एन.जी.ओ. चे कार्य, तसेच एन.जी.ओं. ची स्वयंसाहय्यता बचत गटाद्वारे दुर्बल लोकांच्या सक्षमीकरणातील भूमिकेचे आपण सविस्तर विवेचन अभ्यासले. याबरोबरच आपण स्त्री विकासातील मुलांच्या विकासातील व वृद्धांसाठीचे एन.जी.ओं. चे कार्य व भूमिका याविषयीचे सविस्तर विवेचन आपण या प्रकरणात अभ्यासले आहे.

## ४.४ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

**अ) रिकाम्या जागा भरा**

१. ॲवार्ड २. १९५८ ३. २००६ ४. १९७५

५. १९२७ ६. १९७१ ७. असंघटित

८. दि फ्रेंड इन नीड सोसायटी ९. हेल्प एज इंडिया

१०. भारत

**ब) एका वाक्यात उत्तरे लिहा**

१. Association of Voluntary Agencies in Rural Development

२. दिल्ली

३. १) एन. जी.ओं. च्या साहाय्याने ग्रामीण भागाचा विकास करणे.

   २) ग्रामीण विकास क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या भारतातील व विदेशातील एन.जी.ओं. बरोबर समन्वय साधून त्यांच्याबरोबर संपर्क प्रस्थापित करणे.

४. १९९०

५. १) All India Women's Conference (AIWC)

   २) Self Employed Women's Association (SEWA)

६. Self Employed Women's Association - SEWA

७. All India Women's Conference - AIWC

८. अहमदाबाद (गुजरात)

९. जेरूसेलम

१०. १९९३

## ४.५ सरावासाठी प्रश्न

**अ) टिपा लिहा.**

१. ग्रामीण विकास व एन.जी.ओ.

२. एन.जी.ओं. चे स्त्री विकासातील कार्य

३. वृद्धांच्या विकासातील एन.जी.ओं. चे कार्य

४. दुर्बल लोक आणि एन.जी.ओ.

**ब) दीर्घोत्तरी प्रश्न**

१. ग्रामीण विकासातील एन.जी.ओं. च्या भूमिकेचे सविस्तर विवेचन करा.

२. दुर्बल घटकांच्या कल्याणामधील एन.जी.ओं. ची भूमिका स्पष्ट करा.

३. स्त्री प्रश्नांसंबंधीचे एन.जी.ओं. चे कार्य सांगा.

४. मुलांच्या विकासातीग एन.जी.ओं. ची भूमिकेचे सविस्तर विवेचन करा.

५. वृद्धांच्या कल्याणामधील एन.जी.ओं. च्या भूमिकेचे विवेचन करा.

**क)** बिगर शासकीय संघटना (NGOs) व त्यांचे कार्य समजून घेण्यासाठी आपल्या भागामध्ये स्वयंसेवी प्रेरणेचे काम करणाऱ्या संघटनेस भेट देऊन त्या संघटनेची कार्यप्रणाली समजून घेणे.

## ४.६ अधिक वाचनासाठी पुस्तके.


१. डॉ. डी. एन. धनागरे - संकल्पनांचे विश्व आणि सामाजिक वास्तव.

2. Asok Kumar Sarkar (Ed.) - 'NGOs and Globalization, Developmental and Organizational Facets'.

3. R. Sooryamoorthy and K. D. Gangarde - NGOs in India A Cross Sectional Study.

4. S. N. Pawar, J. B. Ambekar and D. Shrikant - NGOs and Development, The Indian Scenario.


❑❑❑